वासुदेव रंगनाथ शिरवळकरकृत

भक्तिरसपर नाटक.

श्रीनामदेव.

जगामधील इतिहास, धर्म व तत्वज्ञान यांजवर हिंदुस्थानदेशाचा जेवढा परिणाम झाला आहे तेव्हढा दुसऱ्या कोणत्याही देशाचा झालेला नाहीं.

लॉर्ड कर्झन (दिल्लीदरबार)

१९०४

किंमत १ रुपया.

(शाहूनगरवासी नाटकमंडळीकरितां रचलेलें)

श्रीनामदेव

(भक्तिरसपर व ऐतिहासिक नाटक.)

ऐकूनि पंढरिनाथ बोले रुक्माईशीं ॥
तूं काय नेणशी गुज माझें ॥ १ ॥
काया वाचा मनें सर्व निरंतरीं ॥
आहे नाम्यावरी लोभ माझा ॥ २ ॥
तीर्थावळीचे अभंग.

वासुदेव रंगनाथ शिरवळकर,

असिस्टंट मास्तर पूना नेटिव इन्स्टिट्यूशन, पानपतचा मुकाबला श्रीतुकाराम, श्रीएकनाथ नाटकांचा कर्ता व मौनयौवना, श्रीविक्रमादित्य भाग १ ला व २ रा व राणा भीमदेव या पुस्तकांच्या कर्त्यांपैकीं एक.

यांनीं रचिलें

तें

पुणें येथें

"आर्यभूषण" छापखान्यांत रा. हरि नारायण गोखले यांनीं छापून रा. वासुदेव रंगनाथ शिरवळकर यांनीं प्रसिद्ध केलें.

सन १९०४.

किंमत एक रुपया.

Received 2 Aug 1905
Reg. No. 13 Aug 1905

हा ग्रंथ

नामदार श्रीमंत मेहेरबान सरदार

नारायणराव बाबासाहेब घोरपडे

सरकार, संस्थान इचलकरंजी

यांचे

असामान्य गुणग्राहकत्व, विद्यावृद्धीविषयीं उत्कंठा, औदार्य, प्रजेच्या कल्याणाविषयीं व शिक्षणाविषयीं अश्रांत परिश्रम व देशभाषेच्या उन्नतीकरितां पराकाष्ठेची कळकळ, इत्यादि

अनेक सद्गुण

मनांत आणून त्यांच्यां सेवेशीं परमादरपूर्वक त्यांच्याच परवानगीनें

अर्पण केला आहे.

श्रीमंतांचा नम्रसेवक

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

> " Lives of great men all remind us
> We can make our lives sublime ;
> And departing, leave behind us,
> Foot-prints on the sands of time. "
>
> *Longfellow.*

सिंपियाचा पोर एक खेळिया नामा । तेणें विठ्ठल बसवंत केलारे ॥ आपुल्या संवगडिया सिकवूनि घाईं । तेणें सतंतर फड जागविलारे ॥ एक घाईं खेळतां तो न चुकेचि कोठें । तया संत जन मानवलेरे ॥

टिपरीचे अभंग–तुकाराम.

शतकोटी अभंग प्राकृत ॥ वदोनी स्थापिला भक्तिपंथ ॥ तो नामदेव प्रेमळ भक्त ॥ तयासी प्रणिपात सद्भावें ॥ १ ॥

संतलीलामृत–महिपती.

रुसलासे नामा उभा गरुडपारीं ॥ पितांबरधारी पाळवीतो ॥ १ ॥ आपुले सुखाचा तुज देईन वांटा ॥ जरी येसी वैकुंठा याची वेळे ॥ २ ॥ आपुले निजपदीं तुज बैसवीन ॥ उभा मी राहीन मागें पुढें ॥ ३ ॥ पितांबरछाया धरीन तुजवरी ॥ तुज मी क्षणभरीं न विसंबे ॥ ४ ॥ नामा ह्मणे ऐसें नाहीं माझे चित्तीं ॥ मज आहे विश्रांती तुझे पायीं ॥ ५ ॥

जो सनत्कुमार, प्रऱ्हाद, अंगद, उद्धव, इत्यादिकांचा अवतार; जो सर्व भक्तसमुदायांत पांडुरंगाचा अत्यंत आवडता, केवळ कुलदैवत इतकेंच नाहीं, परंतु ज्याचा कल्पांतींही पांडुरंगाबरोबर वियोग होणार नाहीं; ज्यानें आपल्या निष्कलंक भोळ्या भक्तीनें पांडुरंगाला वेडा करून आपला देवपणा विसरावयास लावून आपल्या प्रेमळ कीर्तनांत स्वानंदसुखानें नृत्य करावयास लाविलें; ज्यानें पांडुरंगाबरोबर ऐक्यभाव करून भक्तिसाम्राज्याची स्थापना करून वैराग्याचा ध्वज उभारला; ज्याच्या संगतिसुखाची इच्छा प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनीं करून तीर्थाटणाच्या मिषानें जगाचा ज्यानें उद्धार केला; ज्यानें आपल्या भक्तिरूपी पुरुषार्थानें संसार जिंकून मदमत्सर देशोधडीला लावून दुर्धर कामक्रोध व लोभ बंदीवासांत घालून,

पांडुरंगाला आपला दास बनविलें; ज्यानें केलेली शतकोटी अभंगांची प्रतिज्ञा पांडुरंगानें शेवटास नेली; ज्यानें कमळाकर भटाच्या पुत्राचें संजीवन केलें, मारवाड देशांतील कूपोदकाचें संवर्धन केलें, जगन्नाथाच्या देवालयाचें परावर्तन केलें, गोरा कुंभाराच्या छिन्न हस्तांचें प्ररोहण करून, ज्यानें परशुराम भागवताच्या एका परिसाच्या खड्याबद्दल चंद्रभागेच्या वाळवंटांतील प्रत्येक कण परीसमय केला; जो स्वतः तर पांडुरंगाचा विसावाच, परंतु ज्याचें चरित्र श्रवण केलें असतां अथवा ज्याच्या चरित्राचें वर्णन केलें असतां पांडुरंगाला आपण प्राणापलीकडे प्रिय होतों; अशा श्रीनामदेवमहाराजांचें चरित्र नाटकरूपानें मार्मिक जनापुढें मांडण्यास त्याच्यासारखाच थोर मनाचा आणि कुशाग्र बुद्धीचा साधुपुरुष पाहिजे होता. परंतुः—

आणि बाप पुढां जाये ॥ ते घेत पाउलाची सोये ॥
बाळ ये तरि न लाहे ॥ पावों कांहीं ॥ १ ॥
तरि लोह एके अंशें ॥ झगटलिया परिसें ॥
येरीकडे आपैसें ॥ सुवर्ण होय ॥ २ ॥
बाळकातें वोरसें ॥ माया जैं जेवऊं बैसे ॥
तैं तया ठाकती तैसे ॥ घांस करी ॥ ३ ॥
कां अफाटा समीरणा ॥ आपैतें-पण शाहाणा ॥
केलें जैसें विंजणा ॥ निर्मूनियां ॥ ४ ॥
श्रीगुरुचेनि नांवें माती ॥ डोंगरीं जयापासी होती ॥
तेणें कोळियें त्रिजगती ॥ येकवद केली ॥ ५ ॥
तेवि तुम्हा संतांचा पाढियावो ॥ कैतनि तरी आह्मावरी हो॥
या बहुवा आळुकिया जी आहों ॥ सलगी करित ॥ ६ ॥
वांचूनि माझिये बोलतिये योग्यते ।। सर्वज्ञ भवादृश श्रोते॥
काय धड्यावरी सारस्वतें ॥ पढों सिकिजे ॥ ७ ॥
हां हो हिमकरासीं विंजणें ॥ कीं नादापुढें आइकवणें ॥
लेणियासि लेणें ॥ हें कहीं अथी ॥ ८ ॥
हें सलगी म्यां ह्मणितलें ॥ चरणां लागोनी विनविलें ॥
प्रभू सखोल हृदय आपुलें ॥ ह्मणूनियां ॥ ९ ॥

ज्ञानेश्वर.

या न्यायानें अशा गहन विषयाचें आकलन करण्याचा शक्त्यनुसार प्रयत्न केलेला आहे. ज्याच्या चरित्रांत आजपावेतों या पृथ्वीच्या पाठीवर जितके महान् बुद्धिवान, पंडित, वक्ते, तत्त्वज्ञानी ह्मणून होऊन गेले त्यांच्या तर्कशक्तीस पुरून अनंत उरलेला जो विश्वव्यापक परमेश्वर, याच्याचविषयीं अति विस्तृत विचार भरलेले आहेत, अशा विचारांचें मजसारख्या अल्पमतीकडून यथार्थ विवरण होणें परमाशक्य आहे. असो.

सर्व विद्येंत जशी अध्यात्मविद्या श्रेष्ठ अथवा सर्व यादवांत श्रीकृष्ण परमात्मा श्रेष्ठ, अथवा सर्व धनुर्धाऱ्यांत श्रीराम श्रेष्ठ, अथवा सर्व दैत्यकुळांत प्रल्हाद श्रेष्ठ, त्याप्रमाणें सर्व भक्तमंडळांत श्रेष्ठ असे जे श्रीनामदेवमहाराज हे अयोनिसंभव होते अशी आख्यायिका असून महिपतीच्या वाक्यांचें या गोष्टीस पुष्टिकरण आहे. भक्तिप्रेमसुखाची गोडी नामदेवांनीं जितकी घेतली इतकी दुसरी कोणीही घेतली नसेल. नामदेव साधाभोळा प्रेमळ असा श्रीपांडुरंगाचा भक्त होता. त्याच्या अंगीं तुकारामाचा पक्केपणा किंवा ज्ञानदेवाचा ज्ञानाचा ठेवा नव्हता असें नाहीं, परंतु अर्भक जसें मातेचा पदर धरून एखाद्या गोष्टीचा छंद घेतें, तशी नामदेवांनीं ठिकठिकाणीं देवाशीं लडिवाळपणें सलगी केलेली आहे. ज्ञानदेव व तुकाराम जाणते होते व नामदेव नेणतें बालक होतें. एक वर्षाचे बालकानें बापाच्या मिशा जरी ओढल्या तरी बाप त्याला कडेवरचा खालीं ठेवीत नाहीं तशी नामदेवाची स्थिति होती. हें पितापुत्राचें प्रेम ह्मणजे देवभक्ताचें कोड वर्णन करणें अशक्य आहे. ह्या वर्णनाचें श्रवण मनन लेखन अगर वाचन करीत असतां प्रत्येक हिंदु क्षणांत भक्तिसुखसागरांत पोहत राहील, क्षणांत शोकानें विव्हल होईल, क्षणांत आनंदातिरेक होऊन हास्य करील, आणि क्षणांत धन्य माझा देश कीं, जेथें असे सूर्याप्रमाणें तेजस्वी भक्त निर्माण झाले ह्मणून अभिमानानें पर्वताच्या उंच शिखरावर आरोहण करील. नेत्रांतून प्रेमाश्रु वाहिल्याशिवाय तर राहणारच नाहींत. वडील पुत्राचा ज्याप्रमाणें पिता मान ठेवतो, त्याप्रमाणें श्रीपांडुरंगांनीं श्रीज्ञानेश्वराचा मान ठेविलेला आपण पाहतों. ज्ञानोबा एके ठिकाणीं ह्मणतात

बापरखुमादेवीवरु अवघाची धरियला ॥
अवघाची गिळियेला अवघेपणें ॥ १॥

तुकारामबोवाच्या वाक्यांची भेदकता किती तीव्र आहे व त्याचप्रमाणें त्यांत पक्केपणा किती भरलेला आहे हें खालीं दिलेल्या एकदोन कडव्यांवरून चांगलें निदर्शनास येईल. सीताबाई अशोक वनांत शोक करीत असतां त्यांची चूक त्यांच्या पदरांत तुकारामबोवांनीं घातली आहे. सीतादेवी मोठ्या रामभक्त आणि भक्तांची वागणूक देवाजवळ निरपेक्ष असली पाहिजे. प्राणांत होईपर्यंत देवाला संकटांत घालावयाचें नाहीं. या नियमाला सीतादेवी आणि देवर्षि नारदमुनी मोठे भक्त परंतु थोडेसे कसे घसरले व त्याचा परिणाम त्या उभयतांना कसा भोगावा लागला हें विचार करण्यासारखें आहे. इतर भक्तमंडळीवर त्यांचा कटाक्ष आहेच—

नाडियलें आशा मृगकांति सोनें ॥
धाडिलें रघुनाथा पाठिमागें तेणें ॥
उलंघिली आज्ञा माव काय मी जाणें ॥
देखूनी सुनाट घेऊनि आलें सुनें ॥ १ ॥

२

नकळे वो माव मुनि मागे एक अंतुरी ॥
साठी संवत्सरां जन्म तया उदरीं ॥ १ ॥
कैसा आकळे गे माये चपळ वो ॥
त्रिभुवनव्यापक सकळ वो ॥ धृ० ॥
हनुमंता भेटी गर्व हरिला दोहिंचा ॥
गरुडा विटंबना रूपा सत्यभामेच्या ॥ २ ॥
द्रौपदीचा भेद पुरविला समयीं ॥
ऋषि फळवनीं देंठीं लावितां ठायीं ॥ ३ ॥
अर्जुनाच्या रथीं कपि स्तंभीं ठेविला ॥
दोहीं पैज तेथें गर्व हरी हा दादुला ॥ ४ ॥
भावभक्ती सत्त्वगुण जाला दुर्जना ॥
तुका ह्मणे सकळां छंदें खेळे आपणा ॥ ५ ॥

वर दिलेल्या मोहपाशांतून श्रीज्ञानदेव, तुकाराम, नामदेव हे सहज

निघून गेले. नामदेवाची महती शेंकडों ठिकाणीं स्वतः देवांनीं वर्णन केलेली आहे. त्यास " नामा माझें पोटींचें बाळ " असें ह्मटलें आहे.

अभंग.

तंव ते आवडते भक्त अंतरंग आपुले ॥ देवें बोलाविले एकांतासी ॥ १ ॥ ह्मणे त्या नाम्यापरतें मज दुजें नावडे ॥ सांगे तयापुढें केशवराज ॥ २ ॥ त्या देखतांची दृष्टीं चित्त माझें निवे ॥ वाटे त्या घालावें हृदयामाजीं ॥ ३ ॥ तयाचे निर्लोभें मन माझें मोहिलें ॥ अखंड राहिलें त्याचेपाशीं ॥ ४ ॥ मज परतें दुजें न जाणे तो नामा ॥ नित्य माझा प्रेमा पाढिये त्यासी ॥ ५ ॥ मी भक्तकाजकैवारी ह्मणता वाटे लाज ॥ परि म्यां नाहीं कांहीं काज केलें त्याचें ॥ ३ ॥ धर्म अर्थ काम त्या नाहीं दिधलें ॥ जन्मोनि बांधिलें सेवा-ऋणें ॥ ७ ॥ तेणें आपल्या पुरुषार्थें जिंकिला संसार ॥ केला मदमत्सर देशधडी ॥ ८ ॥ लोभ मोह दुर्धर माया मोहवैरी ॥ घातलें तोडरीं कामक्रोम ॥ ९ ॥ तो नमनी आणि कां देवा न करी त्यांची सेवा ॥ मजपरता विसावा नाहीं त्यासी ॥ १० ॥ तें मार्गीं शिणलें असेल कोमाईलें ॥ सुख दुःख आपुलें सांगेल कवणा ॥ ११ ॥ त्याचिया जिवींचें मीचि जाणें सर्व ॥ हा माझा अनुभव आहे त्यासी ॥ १२ ॥ तें माझें आवडतें दास अंतरंग ॥ त्यजिलें सर्व संग मजचिलागीं ॥ १३ ॥ देखूनि ते आवडी अभिनव वाटलें ॥ सप्रेम दाटले सकळ भक्त ॥ १४ ॥ परिसा भागवत आनंदें नाचत ॥ लोटांगणीं येत गरुडपारीं ॥ १५ ॥

श्रीनिवृत्ति, श्रीज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, विसोबा खेचर, गोराकुंभार, दामाशेट, गोणाई, राजाई, जनाबाई, परशुराम भागवत, कमळजा, कमळाकरभट, सुमति, गोपाळ इत्यादि पात्रांची योजना महिपतीच्या वाक्यांला धरून केलेली असून या नाटकास मुख्यत्वें आधार महिपतीच्या भक्तविजय व संतलीलामृत या ग्रंथांतून लिहि-

लेल्या नामदेवाच्या चरित्राचा घेतला आहे. जरी महिपतीच्या ग्रंथांवर आमचा स्वतःचा पूर्ण भाव आहे व विश्वास आहे तरी त्याचे ग्रंथ ऐतिहासिक दृष्टीनें बरोबर आहेत किंवा नाहींत हें ठरविण्याचें काम आमचें नाहीं. ऐतिहासिक नाटकें व कादंबऱ्या हीं तंतोतंत इतिहासाला धरून लिहिलेलीं नसतात. त्यांना थोडें तरी तिखटमीठ असावयाचेंच. हें नाटक होतां होईल तितकें महिपतीच्या वाक्यांना धरून लिहिलें आहे, परंतु कचित् स्थळीं नाटकाला गोडी आणण्याकरितां ग्रंथकर्त्यांस पदरची भर घालावी लागली आहे, व स्थळविशेषीं चरित्रांतील गोष्टी मागें पुढें कराव्या लागल्या आहेत.

श्रीतुकाराम, श्रीएकनाथ, व श्रीनामदेव या नाटकांची विशेष प्रसिद्धि होण्याला शाहूनगरवासी नाटक मंडळीच कारणीभूत आहेत. इच्यासारखी गद्य नाटकें करण्यांत प्राविण्य संपादन केलेली दुसरी कंपनी निदान प्रस्तुत कालीं तरी नाहीं. प्रेक्षकांचीं अंतःकरणें तन्मय करून त्यांना भक्तिप्रेमांत क्षणभर देहभान विसरावयास लावून तल्लीन करण्याचें हातखंडा काम शाहू०-मंडळी फारच उत्तम करते ही गोष्ट पुण्याच्या व मुंबईच्या मर्मज्ञ प्रेक्षकांपुढें अनेक वेळां निदर्शनास आलेली आहे. प्रस्तुत नाटक आह्मी याच कंपनीकरितां रचलेलें असून आह्मीं केलेल्या प्रत्येक नाटकाचा कंपनीनें स्वीकार केला याबद्दल आह्मी तिचे फार आभारी आहोंत.

ग्रंथ शेवटास जाणें हें ईशकृपेचें फळ आहे. ग्रंथकर्तृत्वाचा मीपणा मिरविणें व्यर्थ होय. शेवटीं सुज्ञ वाचकांपुढें एवढेंच ह्मणणें आहे कीं:-

जैसा स्वभाव मायबापांचा ॥ अपत्य बोले जरी बोबडी वाचा ॥ तरी अधिक तयाचा ॥ संतोष आथी ॥१॥
तैसा तुह्मीं मी अंगिकारिला ॥ सज्जनीं आपुला ह्मणितला ॥ तरी उणें सहजें उपसाहला ॥ प्रार्थूं काई ॥ २॥

श्रीज्ञानेश्वर.

पुणें पेठ कसबा नं. २१०
ता० १० माहे आक्टोबर
सन १९०४ इ.

वासुदेव रंगनाथ शिरवळकर.
ग्रंथकर्ता.

पात्रांची यादी.

श्रीनिवृत्ति श्रीज्ञानदेव श्रीसोपानदेव मुक्ताबाई	—श्री अलंकापूर येथील प्रसिद्ध साधु.
श्रीनामदेव—	पंढरपूर येथील प्रसिद्ध साधु.
विसोबा खेचर—	नामदेवाचा गुरु.
गोरा कुंभार—	तेरढोकी येथील प्रसिद्ध साधु.
दामाशेट—	नामदेवाचा बाप.
केशवशेट वाणी—	नामदेवाचा मित्र.
कमळाकर भट—	पंढरपूर येथील एक अनाथ ब्राह्मण.
गोपाळा—	कमळाकरभटाचा मुलगा.
परशुराम भागवत-	नामदेवाचा छल करणारा-
चक्कबाबा—	,,
लंबोदरभट—	,,
बेदरशहा—	बेदरचा बादशहा ,,
सलाबतजंग—	बेदरशहाचा वजीर ,,
तंतोतंत सांबारे शास्त्री नंदादिप्प्या घमघम दादा	पंढरपूर येथील मंडळी.
गोणाई—	नामदेवाची आई.
राजाई—	नामदेवाची बायको.
जनाबाई—	नामदेवाच्या घरची दासी.
कमळजा—	परशुराम भागवताची बायको.
सुमति —	कमळाकर भटाची बायको.

वारकरी, पुजारी, व्यापारी, बादशहाचे शिपाई दिंडींतील भजनकरी ब्राह्मण मंडळी वगैरे.

आभार.

देशभाषेचा अभिमान बाळगणाऱ्या खालीं दिलेल्या सद्गृहस्थांनीं आपला अमोलिक वेळ खर्च करून अनेक तऱ्हेनें प्रस्तुत ग्रंथ तयार करण्याचे कामीं आह्मांस मदत केली, व ज्यांनीं वेळोवेळीं आपली पोक्त मसलत देऊन महाराष्ट्र भाषेची अल्पसेवा आमचे हातून करून घेतली, त्यांचे आह्मी फार ऋणी असून त्यांचीं नावें मोठ्या आनंदानें सुज्ञ वाचकांपुढें मांडतों.

डाक्तर रामकृष्ण गोपाळ भांडारकर एम. ए. पी. एच्. डी. सी. आय. ई., रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे, पे. फ. सब जज्ज पुणें, रा. ब. नारायण गणेश देशपांडे पे. डे. कलेक्टर, शिरवळ, रा. ब. माधवराव केशव कुमठेकर, सेक्रेटरी म्युनिसिपालिटी पुणें, सुभेदार रामचरणसिंग, मुंबई, लाइट इन्फंट्री नंबर ५, रा. रा. गोपाळराव रंगनाथ शिरवळकर, नाजर, कोर्ट भुसावळ, रा. रा. बळवंतराव लक्ष्मण खेडकर, हेडमास्तर पैठण, प्रो० सदाशिव कृष्ण पिंपळखरे, पुणें, रा. रा. विनायक त्रिंबक मोडक, पुणें, रा. रा. रघुनाथ कृष्ण पिंपळखरे, पुणें, रा. रा. रामचंद्र वासुदेव खरे, पुणें, रा. रा. रामचंद्र बाळकृष्ण कोनकर, पुणें, रा. रा. शंकर बापूजी मुजुमदार, पुणें, रा. रा. जनार्दन गणेश वाळिंबे, अंमळनेर.

ज्या ग्रंथांच्या आधारानें हा ग्रंथ रचिला त्यांचीं नांवें.

१ महिपतीकृत भक्तविजय, संतलीलामृत.

२ गोंधळेकरांनीं प्रसिद्ध केलेली नामदेवाच्या अभंगांची गाथा.

३ माधवराव अप्पाजी मुळे यांनीं रचिलेलें श्रीनामदेवचरित्र.

४ कुंटे यांनीं प्रसिद्ध केलेली ज्ञानेश्वरी.

५ गोंधळेकर यांनीं प्रसिद्ध केलेली ज्ञानदेवाच्या अभंगांची गाथा.

६ तुकाराम जावजी यांनीं प्रसिद्ध केलेल्या काव्यसंग्रह ग्रंथमालेपैकीं अनेक महाराष्ट्र कविकृत पदसंग्रह.

७ काशिनाथ रावजी धोंगडे यांनीं प्रसिद्ध केलेला सन्मणिमाला कवितासंग्रह.

वरील पुस्तककर्त्यांचा ग्रंथकार फार आभारी आहे.

श्रीनामदेव.

अंक पहिला.

प्रवेश पहिला.

स्थळः— तेरढोकी येथील गोऱ्या कुंभाराचें घर.

(निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, गोरोबा, वगैरे विचार करीत बसलीं आहेत.)

निवृत्ति– आजपावेतों पुष्कळ संत झाले, परंतु मला वाटतें नामदेवासारखा संत कोणीच झाला नाहीं. नामदेव रावळांत गेल्याबरोबर देव अगोदर त्याच्याशीं बोलतो, हें केवढें आश्चर्य आहे ?

ज्ञानदेव– आषाढी एकादशीचे दिवशीं नामदेव उपाशी होता. त्यावेळीं देवांनीं गरुडाला पाठवून त्याला आणिलें. रुक्मिणीनें विचारिलें कीं, देवा कोणाला आणिलें ! त्यावेळीं देव ह्मणाले, माझ्या जिवाचा जीव घेऊन आलों. असा नामदेव सर्व भक्तांत श्रेष्ठ आहे.

सोपान– एखादे वेळीं देवाला घरींच भोजनास बोलावतो. देव आले नाहींत तर नामदेव जेवीत नाहीं. मग देवाला येणें भाग पडतें. असें जनाबाई सांगत होती. केवढें नामदेवाचें भाग्य ! प्रत्यक्ष परब्रह्म त्यानें आपलेंसें केलें ! होय कीं नाहीं गोरोबाकाका ?

गोरोबा– हें काय विचारतां ? नामदेव मोठा भक्त ! प्ऱ्हाद, अंगद किंवा उद्धव यांचा अवतार ! त्याचें सर्वस्व धन विठोबा.

दुसऱ्याची त्याला परवा नाहीं. पण हा पहा नामदेव आलाच वाटतें. (नामदेव प्रवेश करितो.)

अभंग.

नामदेव –

येतीयासी पुसे जातिया धाडी निरोप ॥ पंढरपुरीं नांदतो माझा मायबाप ॥ १ ॥ येईवो येईवो येईवो माउलीये ॥ निढळावरी कर ठेवुनी वाट पाहे ॥ २ ॥ पीतांबर शेला कैसा गगनीं झळकला ॥ गरुडावरी बैसोनी माझा कैवारी आला ॥ ३ ॥ विठोबाचें राज्य आह्मां नित्य दिवाळी ॥ विष्णुदास नामा जीवेंभावें वोवाळी ॥ ४ ॥

पांडुरंगा, तुझें श्रीमुख पाहतांच अनंत जन्मींचें दुःख विसरून गेलों. जो तूं योग्यांच्या ध्यानाला येत नाहींस, तो तूं आमचेजवळ मागें पुढें हिंडत असतोस. भवव्यथा हरून गेली. मला मुक्तिपद देऊं नकोस. मुक्ति दिल्यावर मग ही पंढरी, हा आनंदाचा सोहळा, कोठें पाहूं ? मग ही अमृतसंजीवनी हरिकथा कोण करील ? तुझ्या चरणांचें अनुसंधान तुटतांच माझे प्राण निघून जातील. मला ब्रह्मज्ञान नको. तुझ्या नामाचें खंडन झालें, तर माझ्या जिव्हेचे शतशः तुकडे होतील. सांवळें सुंदर मनोहर तुझें रूप मला न दिसतांच माझे डोळे उन्मळून बाहेर पडतील. मला कधीं चरणांजवळून दूर लोटूं नको.

निवृत्ति– (नामदेवास प्रदक्षिणा करून नमस्कार करतो.) आज पंढरीचा प्रेमा गोरोबाचे घरीं आला आहे. नामदेवा, तूं प्रेमळ भक्त आहेस. नेत्र झांकून निरंतर विठ्ठलाचें चिंतन करीत असतोस. तुझ्या संगतीं पांडुरंग भोजन करितो. अनंतजन्मींचा देव तुझा ऋणानुबंधी आहे. पांडुरंगासाठीं तूं देह करवतीं घातला आहेस. उग्रतप केलें आहेस.

ज्ञानदेव– (नामदेवास प्रदक्षिणा करून नमस्कार करितो.) पांडुरंगाचा मोठा भक्त ! वैराग्याचा अलंकार ! ज्ञानाचा विसावा !

सुखाचा शृंगार ! पांडुरंगाचें कुलदैवत ! पांडुरंगाला कांहीं मागत नाहीं. कांहीं भार घालीत नाहीं. तस्मात् तूं पांडुरंगाहून उदार आहेस. पांडुरंगाला तुला सोडावेंसें वाटत नाहीं.

सोपान– (नामदेवास प्रदक्षिणा करून नमस्कार करितो.) नामदेवा, तुझीं शुभाशुभ कर्में पांडुरंगानें अंगिकारिलीं आहेत. पांडुरंग तुला लडिवाळपणानें जवळ घेतात. तुझें मुख कुरवाळितात. तुला दृष्ट होईल म्हणून तुझ्यावरून लिंबलोण उतरतात. तुझी जातकूळ पहात नाहींत. तुझी त्याची कल्पांतींसुद्धां ताटातूट होणारच नाहीं. आज आम्हांला तूं प्रत्यक्ष आईबापच भेटलास.

नामदेव– (एकीकडे) वास्तविक ह्मटलें ह्मणजे यांनीं मला नमस्कार केला हेंच बरोबर आहे. कसें म्हणाल तर मी निरंतर पांडुरंगाचे सन्निध असतों. मला उलट पायां पडण्याची गरजच नाहीं. कारण परब्रम्ह माझ्याजवळ आहे. शिवाय या सर्वांहून मी वडील आहें. तेव्हां यांनींच मला नमस्कार केला पाहिजे. एकूण हीच का देवाची मंडळी ? पांडुरंग नेहमीं माझ्याजवळ यांची स्तुति गात असतात. पाहिली ही देवाची मंडळी ! बरें झालें.

निवृत्ति– मुक्ताबाई, नामदेवमहाराजांचें दर्शन तूं घेतलें नाहींस ?

मुक्ताबाई– मी नाहीं पायां पडायची. अहो, हा अखंडित देवाचे शेजारीं असून अजून ह्याचा अहंकार गेला नाहीं. याला किती ताठा आहे ? दिवस असतां दिवटी हातांत धरून चालणारा आहे. गर्वानें अंध झाला आहे. गुरुशिवाय अजून हा अंतरीं कोरा राहिला आहे. संतांचा मान कसा ठेवावा, हें तत्व जर याला अजून समजलें नाहीं, तर यानें देवाजवळ राहून केलें काय ? तुमचा नामदेव खापर आहे. पांडुरंगरूपी परिसाची संगती असून व्यर्थ झाली. आजपावेतों केवळ सर्पाला दूध पाजिलें. पोवळ्यापेक्षां रानगुंज अधिक लाल असते, म्हणून तिचे कोणी डागिने करीत नाहींत. द्राक्षापेक्षां वृंदावन सुंदर दिसतें,

पण कडू म्हणून कोणी तोंडांत घालीत नाहींत. गुरुशिवाय संतपणा येत नाहीं. पांडुरंगाचें मोठें भूषण सांगत हिंडतो. याच्या मनाला तिळभर तरी बोध झाला आहे का ? चांगदेवाप्रमाणें याला चांगला भाजून काढावा.

निवृत्ति- असें बोलूं नये. आपलें भाग्य मोठें, म्हणून नामदेवासारखा भक्त आपल्याला भेटला. आपलें आपण स्वहित पहात जावें. संताला शब्दानें दुखवूं नये. जे पंढरीस राहतात, त्यांचे घरीं आपण कुत्रें होऊन रहावें. नामदेवानें पांडुरंग वेडा केला. त्याच्या चरणांवर मस्तक ठेव.

मुक्ताबाई- तुह्मांला पाहिजे तर लोटांगणें घाला. मला त्याचें दर्शन नको आहे. त्याला गुरुप्रसाद आहे काय ? ही मेणाची बाहुली विस्तवाजवळ नेण्याचा उशीर कीं वितळलीच. असल्या अधीर मनुष्याला कसला आला आहे संतपणा ? याला आतां जाऊं देऊं नका. (जोरानें) हें अजून कच्चें मडकें आहे. बरें का गोरोबाकाका ? याला चांगलें भाजून काढा. याचकरितां पांडुरंगानें याला आपलेकडे धाडून दिला आहे. हें तुम्हांला कसें नाहीं कळलें ?

ज्ञानदेव- गोरोबाकाका, समुद्रावरून चालत जाणें, अष्टमहासिद्धि आपल्या दासी करणें, गेलेले प्राण पुनः परत आणणें, भूतभविष्य सांगणें, या गोष्टी गुरुशिवाय करितां येतील; परंतु शुद्ध ब्रह्मतत्व हें मात्र सद्गुरुशिवाय कळणार नाहीं. ज्याला आपलें कल्याण व्हावें अशी इच्छा असेल, त्यानें वेदांत, शास्त्रांत, अनुभवांत पारंगत असलेल्या शांत सद्गुरूस शरण गेलें पाहिजे. आतां तुह्मी जमलेल्या संतमंडळींत खरे ब्रह्मज्ञानी कोण आहेत आणि फोलकट बोलणारे कोण आहेत, गुरुकृपेनें पूर्ण ह्मणजे पक्के व गुरुकृपेशिवाय अपूर्ण ह्मणजे कच्चे कोण आहेत, यांची परीक्षा करा. सांगा, कच्चें मडकें कोणचें आहे आणि पक्कें कोणचें आहे. तुह्मी कुंभार आहांत, तेव्हां तुम्हांला चांगली परीक्षा करितां येणार आहे.

गोरोबा– महाराज, मी जातीचा हीन, कुंभार, मला यांतलें काय ज्ञान असणार ? परंतु आपल्या पायांच्या कृपेनें हातांत थापटणें घेऊन जशी मी मडक्यांची परीक्षा करितों तशीच तुमची सर्वांची करितों. (निवृत्तीचे डोक्यावर थापटणें मारितो.) हा डेरा परब्रह्मीं पूर्ण भाजला गेला आहे. (ज्ञानदेवाचे डोक्यावर मारतो.) ह्याचे गुरु निवृत्ति महाराज, तेव्हां हें मडकें पक्केपणीं भाजलें आहे. (सोपानदेवाचे डोक्यावर मारतो.) या मडक्यांतील कच्चेपणा तिळभर राहिला नाहीं. त्याचप्रमाणें (मक्ताबाईस उद्देशून) हेंही मडकें परब्रह्मस्वरूपीं पूर्ण आहे. (नामदेवाचे डोक्यावर मारतो.) हें मडकें मात्र अजून आव्यांत घातलें नाहीं. अगदीं ओली माती. अगदींच कच्चें राहिलें आहे. (सर्व खदखदां हंसतात.)

नामदेव– काय म्हणून माझ्या टाळक्यांत लांकडें मारतोस ? सज्जनांची परीक्षा अशी का करीत असतात ? अशा तऱ्हेनें मडक्यांची मात्र परीक्षा करितात. कुंभारच तूं. माती तुडविणारा. शतमूर्ख आहेस. पांडुरंग मला नेहमीं सांगतात, (तोंड वांकडें करून) नामदेवा, ही माझी मंडळी आहेत. मला ठाऊक नव्हतें ही कैकाडी मंडळी. (एकीकडे) मला वाटतें आतां आपण येथून पळून जावें. नाहीं तर हे मला भाजून काढतील. (जाऊं लागतो. त्यास गोरा कुंभार बळकट धरून उभा करितो.)

ज्ञानदेव– नामदेवा, तूं गुरु कोण केलास हें आम्हांला सांग.

नामदेव– गुरु ह्मणजे काय ? कशाकरितां करतात ? हें मला माहीत नाहीं.

निवृत्ति– अरे नामदेवा, ज्यानें गुरु केला नाहीं, तो महापापी. त्याचें मुखावलोकन करूं नये.

मुक्ताबाई– गोरोबाकाका, सोडूं नका त्याला. आव्यांत घालून त्याला भाजून काढा. ओहं सोहं याच्या कानांत फुंकून याला शुद्ध करूं. जीवित्व काढून शीवित्व करा, ह्मणजे हा पांडुरंगाला अधिक प्रिय होईल. याची वृत्ति चंचल आहे. अद्याप

मनाला स्थिरता आली नाहीं. संभाळा, हें मडकें गडगडत जाईल. सोडूं नका याला.

नामदेव– ही बाई मोठी कृत्याच आहे. मला खरोखरच विस्तवांत घालून हे कैकाडी भाजून काढणार कीं काय? अगदीं रानटी लोकांशीं गांठ पडली म्हणावयाची. तेसुद्धां राताळा-प्रमाणें माणसें भाजून काढीत नाहींत. या बाईची जीभ कशी चुरचुर चालते. हिच्यापेक्षां विंचवाची नांगी बरी. कसले हे सात्विकशून्य, आचरट, पोरकट, भिकारी, ढोंगी संत? सोडरे थेरड्या मला. तुझे हात पांडुरंग करील तर तुटून जातील. विनाकारण माझ्या टाळक्यांत लांकडें घातलींस.

मुक्ताबाई– त्याला बळकट धरा. तो पळून जाईल. (नामदेव पळून जातो. त्यास धरण्याकरितां बाकीची मंडळी त्याचे मागोमाग जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ— पंढरपूर येथील पद्मतळें.

(नामदेव प्रवेश करितो.)

नामदेव– (हृदय दाटून) मान सांगावा जनाला आणि अपमान सांगावा मनाला. गुप्त गोष्ट आपल्या मित्राला सांगायला कांहीं हरकत नाहीं, असें समजून झालेली हकीकत पांडुरंगाला निवेदन केली. पण ते मला ह्मणतात, त्यांनीं तुला कच्चें मडकें ह्मटलें तें अगदीं यथार्थ आहे. आतां देव का मला पुनः त्या भिकारड्यांच्या स्वाधीन करितात का कोण जाणें. त्यांतून ती लहानशी मुक्ताबाई सणकाडीची कांडी, सगळ्या संतांना देशोधडीला लावणारी, तिचें पुनः दर्शन नको. पांडुरंगा, माझ्या घरीं खाल्ल्या-पिल्ल्याची तुला जर चाड असली तर पुनः मला त्यांच्या स्वाधीन करूं नको. देव त्यांच्याकडे जाऊन मिळाला. आतां मला थारा

ह्मणून राहिला नाहीं. धरणीमातेला जर वृक्षांचा उबग आला, तर त्यांनीं कोठें जावें ? राजानें जर न्याय सोडला तर प्रजेला सुख कोठून मिळणार ? देव सांगतात कीं, सद्गुरूला शरण जा. द्वैताचें खंडन कर. (जोरानें) प्रत्यक्ष जर तूं माझेजवळ आहेस तर मग माझ्या जिवाला कसलें बंधन ! तुझी प्राप्ति व्हावी ह्मणून व्रतें, तपें, यज्ञ, दानें, अनुष्ठानें करायचीं. तुझी प्राप्ति व्हावी ह्मणून गुरूला शरण जावयाचें. तूं तर मला प्राप्त झाला आहेस; मग मला आतां गुरु कशाला व्हावा ? मी ह्मणतों घरच्या घरीं जर अमृताचा कुंभ जोडला आहे, तर डोंगरांत चरावयाला जावें कशाला ? देव ह्मणतात, तुला माझ्या स्वरूपाचें ज्ञान नाहीं. विश्वीं विश्वंभर कसा भरला आहे, तें तुला कळत नाहीं. देव मला ह्मणतात, मी कोण आहें ? आपण रुक्मिणिपति पांडुरंग आहां ? आपलें स्वरूप मीं हजार वेळां पाहिलें आहे. आपली मूर्ति मेघाप्रमाणें शामवर्ण, कटीवर कर ठेविलेली, कोमल तुळशीचे हार कंठांतघातलेली, कमळासारखे विशाल नेत्र, हास्यवदन अशी आहे. मी देवाला साफ सांगितलें, आपण वाटेल तें रूप घ्या. मी आपल्यास खात्रीनें ओळखतों. देव ह्मणाले, असें न झालें, तर तुला गुरु केला पाहिजे. मीं कबूल केलें. आतां देवांनीं मला या तळ्यावर वाट पहात बसावयास सांगितलें आहे. आतां लवकरच इकडे येणार आहेत. (लांब पाहिलेंसें करून) ही कोण पीडा इकडे येत आहे ? एक ह्मातारा व ह्मातारी असून बरोबर एक टोणगा आणला आहे. दोन कोंबड्या वर घातल्या आहेत. दोन लहान लहान मुलेंही पण वर बसविलीं आहेत. वेष तरी काय केला आहे पण ! डोक्याला एक पांच सहा हात फडकें गुंडाळलें आहे. अंगांत एक अंगरखा आहे. ज्याला सर्वत्र छिद्रें पडलीं आहेत, एक बाही मुळींच नाहीं, असा घातला आहे. बाई एक पांढरें पातळ नेसली आहे. डोक्यावर एक खापराची घागर आहे. देव मला इकडे भेटावयास येणार होते, तों मध्येंच हें एक विघ्न उत्पन्न

झालें आहे. ही शुद्ध एकादशी आहे, ह्मणून लोक पंढरपुराला जाण्याकरितां आले असतील. अरे, तुह्मी इकडे कशाला येतां, हा पंढरीचा रस्ता नव्हे. इकडे तुमच्या बापाचें गांठोडें पुरून ठेविलें आहे काय? (यवनस्त्री व यवन प्रवेश करितात.)

यवन– अबे, दर्जी तूं क्यं करतां अर्जी! मय्र ह्यां खास रहिनेवाला मेरी मर्जी. ये क्यां जायदाद् हय् तेरी, तो तूं दिखाता हमे मगरुरी? बात् करनेमे दिखाता खबरदारी लेकिन् तेरे पास्र क्या तयारी हय् ज्यारी?

नामदेव– हा तर बराच दांडगेश्वर आहे. धसमुसळ्या दिसतो. याची बायको गरीब दिसते. आपण तिच्याशीं बोलावें. याच्याशीं भाषण नको. अहो बाई, तुम्ही पंढरपुरचा रस्ता सोडून इकडे कशाला आलांत?

यवनस्त्री– अबे बच्चे, तुम् हय् अबी तक् जवानमे कच्चे. मूसे लव्हज् न करते अगर होते सच्चे. हाम् दोनो हय् आपने काममे अच्छे. चूप रहो नहीं तो दिखलाउंगी दरयामेके मच्छे.

नामदेव– मीं म्हटलें ही बाई गरीब दिसते. पण ही तर नवऱ्याहून कांकणभर जास्तच आहे. जोडा ठीक आहे. एक खतरोडा आणखी दुसरी मैदालकडी. आडांत पडा नाहीं तर विहिरींत पडा. मला काय करावयाचें आहे.

यवनस्त्री– (आपले पतीस) अजी मेरे प्यारे जान्, मेरे दिलो जान्, तुमारे उप्पर मेरी ज्यान् कुरबान् और तुमारे मोहबतमे गिरफ्तार हाय् ये परिज्यान्. तुमे तो हय् दूर जाना. वक्त हो गया खानेका खाना. फिर तावेदारकू हुकूम् होना. सालना क्या पकाना?

यवन– अबे बुलबुल, तूं क्या मुझे कियाता कुबूल, इस्कू देखके हो गयी तेरी चकभूल? एक मुरगी काटकर हंडीमे डाल. और बनाव अच्छा सालना जुरूर. (यवनस्त्री आंत जाते.)

नामदेव– शिव शिव! एक कोंबडें सबंध उचलून या हडळीनें हंडींत टाकलें. (यवनस्त्री प्रवेश करिते.)

यवनस्त्री– (नवऱ्याच्या गळ्यांत हात घालून) अजी मेरे उस्ताद्, सुनो गरिबकी एक बात्. हंडी नही भरी एक जात्. अप् पूरा सालना होनेकी रहगयी बात्. दुसरी मुरगी हय् आपने सात्. करू क्या उस्कू बरबात् ?

यवन– अबे पुच्छती क्यां गुलच्छन् ? तूं तो पैसेवाली, हिंमतवाली, जादूवाली, दुसरे मुरगीकू कौन् हय् ह्यांपर वाली ? लेजाव्. करदो खतम्. (यवनस्त्री जाते.)

नामदेव– राम राम ! ! राक्षसच हे ! दुसरी कोंबडी तिनें उचलून हंडींत टाकली. दोन्ही कोंबड्या हंडींत गडप झाल्या. आतां ही काय करणार ? देवांनीं मला येथें कशाला बसायाला सांगितलें आहे. कोण जाणें ? (यवनस्त्री येते.)

यवनस्त्री– आजी साहेब दो मुरगीसे नहि हुवा काम. अब् ये हेला हय् नमकूहराम. कायकू रखते हो बेकाम्. आपने पल्लोका थोडाही खरचता दाम. करु क्या उस्कू रामराम ?

यवन– करदो उस्का भिस्मिल्ला. आखिर अल्ला हय्. फिरतोबी तेरा सालना आज् होता, क्या मय् चले जाऊ ?

यवनस्त्री– अजी नही जी. अब्बि सालना पकाती. मगर हेलेसे तोभी हंडी भरती या नही. इस्का मुझे शक़ हय्. (जाते.)

नामदेव– (मोठ्यानें) रेडा कापून हंडींत घातला. हंडी तर कांहीं भरली नाहीं. आतां कोणावर पाळी येणार ? हंडी तर लहान दिसते, पण टोणगा गडप केला. (यवनस्त्री येते.)

यवन स्त्री– अजी हजरत्– हेलेसे तो हंडी नही भरी. फिर अब् क्या तरकीब् निकालूं ?

यवन– दो बच्चेकू काट, हंडीमे डाल दे, सालना बनाले, चखेंगे मजेसे, तूं मेरे पर आषक मय् तुजपर कुरबान्, प्यारिजान्, प्यारिजान् ! (नाचतो.)

यवनस्त्री– अच्छा खाविंद, अब् बच्चेकू काटती, हंडीमे डालती, सालना बनाती. (जाते.)

नामदेव– पांडुरंगा, असलें दुष्ट कृत्य नेत्रांनीं पाहण्यापेक्षां मला मरण आलेलें पतकरलें. राक्षसिणीनें त्या दोन अर्भकांचे तुकडे तुकडे करून त्या हंडींत घातले. आग लागो त्या हंडीला, आणि त्याबरोबर या हडळीला आणि या खविसाला. पांडुरंग आतां कांहीं येत नाहींत. आपण येथून पळा आतां. नाहीं तर पांडुरंगाच्या भेटीऐवजीं शरीराचे तुकडे तुकडे होऊन हंडींत पडून शिजून त्याचें कालवण होणार. (जाऊं लागतो. त्यास यवन धरून उभा करतो. यवनस्त्री प्रवेश करिते.)

यवनस्त्री– अजी जनाब् दो बच्चे काटे, हंडीमे डाले, लेकिन् कुच् न हुवा काम. अब् सालना तो होना जुरूर. अपने तो पकडा हय् ये मगरूर. (त्याच्या कानाशीं लागून.) काटू क्या ये दरजीकू ?

यवन– डाल दे हंडीमे. देखती क्यां मेरी बिबीजान्. (दोघे नामदेवास धरतात. दोघांबरोबर झटापट करून निसटून जातो. त्याच्या मागोमाग त्याला धरण्याकरितां यवन व यवनस्त्री जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळः— गोऱ्या कुंभाराचें घर.

(गोरा कुंभार विठ्ठलनामाचे छंदानें नाचत आहे.)

गोरा–

अभंग

केशवाचें ध्यान धरुनि अंतरीं ॥ मृत्तिकेमाझारी नाचतसे ॥ १ ॥ विठ्ठलाचें नाम स्मरे वेळोवेळीं ॥ नेत्रीं वाहे जळ सद्गदीत ॥ २ ॥ कुलालाचे वंशीं जन्मलें शरीर ॥ तो गोरा कुंभार हरीभक्त ॥ ३ ॥

काय या नामाचा महिमा अगाध आहे ! अभिमानाचा चेंदा करितें. मोहममता छेदून टाकतें. भयाची वार्ता नाहींशी करितें.

जे भाविकजन या विठ्ठलनामानें निरंतर गर्जना करितात ते केवळ विठ्ठलाचे अवतारच होत. त्यांना तीर्थे लोटांगणें घालीत येतात. काळ आपलें तोंड काळें करून कोठें निघून जातो, त्याचा पत्ता नाहीं. नामापेक्षां सुगम साधन नाहीं. आपलेपणाची घमेंड नाहींशी होते. विठ्ठलनामाच्या छंदानें नाचत असतां देहाची स्मृति रहात नाहीं. परमात्म्याशीं आलिंगन होऊन अनिवार स्फुंदन चालतें. सर्व अंग रोमांचमय होतें. माझा मी माझ्यामध्यें सामावलों आहें, हें पाहतांच आपलें आपल्यास हंसूं आवरेनासें होतें. (विठ्ठल विठ्ठल ह्मणून नृत्य करितो. चांगुणा पाण्याची घागर घेऊन प्रवेश करिते.)

चांगुणा– (इकडे तिकडे मुलाचा शोध करिते.) बाळ्या कोणीकडे गेला ? सारें घर पाहिलें, बाळ्या कोठें आहे बाई ? तुमचें लक्षच नाहीं. आपले चिखल तुडविण्याचे नादांत. अहो, बाळ्या कोठें आहे ? (त्याच्या दंडास धरून त्याला नाचतांना थांबविते.) ह्मटलें, बाळ्या कोठें आहे ? आतां येथें रांगत होता. तुह्मी येथें आहांत असें पाहून मी पाणी आणावयाला गेलें. पोराला कोणीं उचलून का नेला ? (ओरडून) माझा बाळ्या कोठें आहे ?

गोरा कुं०– कोणा लेकाला माहीत तुझा बाळ्या ! मी आपला नामस्मरणाचे भरांत गुंग. मला काय माहीत. बघ जा इकडे तिकडे खेळत असेल. विनाकारण माझ्या भजनांत व्यत्यय आणलास. फार दुष्ट आहेस. हो चालती येथून, नाहीं तर घालीन टाळक्यांत कांहीं तरी.

चांगुणा– (रडत रडत) एकदां सोडून शंभरदा माझ्या टाळक्यांत घाला. नाहींतर तें चाक घाला, पण माझा बाळ्या कोठें आहे ? (पायांकडे पाहते. दचकते.) अहो, हें पाहिलेंत का तुह्मी ? हें काय केलेंत ! हीं हाडें आणखी हें रक्त. सारा चिखल रक्तबंबाळ झाला आहे. सोन्यासारखें पोर आपल्या पायांखालीं

चिखलांत तुडविलेंत ! कुठला मेला देव शोधून काढलांत ! सतरा नवसांचें माझें पोर, तुह्मी प्रत्यक्ष त्याचे बाप–बाप कशाचे कसाब, कसाबसुद्धां आपल्या मुलाला पायांखालीं तुडविणार नाहीं ! आतां जाऊन नदींत जीव देतें.

गोरा कुं०–फारसें तोंड चालविलें आहेस ? माझ्या ध्यानाचा भंग केलास. माझ्या हृदयांत श्रीपांडुरंगाची मूर्ति बसली होती. तुझ्या कठोर भाषणानें ती निघून गेली. दम धर हें चाक तुझ्या डोक्यांत घालून तुला ठार करितों. नदींत जाऊन जीव कशाला देतेस ? (चाक घेऊन मारावयास धांवतो.)

चांगुणा– हां खबरदार, माझ्या अंगाला बोट लावाल तर. तुह्मांला तुमच्या विठोबाची शपथ आहे. (गोरा कुंभार स्वस्थ बसतो.) मुलाला चिखलांत घालून तुडविलात, धड नेऊन कुंप-णावर घातलेंत. आजपावेतों शेंकडों साधु झाले, पण आपलें मूल आपल्या पायांखालीं आपण तुडविणारा, चांडाळ दुष्ट अधम एकसुद्धां झाला नसेल. मी इतकी कुत्र्यासारखी तुमच्या अंगावर भोंकतें आहें, पण तुह्मी आपले स्वस्थ हत्तीसारखे. तीं तुमचीं पावलें पाहिलींत का रक्तानें भरलेलीं ! मला त्यांच्याकडे पाहवत नाहीं. आग लागो तुमच्या भजनाला. डोळे असून अंधळे झालांत. कुठले माझे कपाळीं ठेवला होता ? विठोबानें तुह्मांला वेडें केलें. त्या निर्दयाच्या संगतीनें तुह्मी निर्दय झालांत. आग लागो आतां त्या विठोबाला ! त्या मेल्याचें दर्शन नको ! त्याच्याशीं भाषण नको ! लोक मेले गाढव ह्मणून पंढरीला जातात.

गोरा कुं०–विठोबाला कां माझ्या शिव्या देतेस ? दांत पाडून टाकले असते, पण शपथ घातलीस म्हणून गप्प बसलों आहें. तुझ्या कारट्याचें कर्म ओढवलें त्याला विठोबा काय करील ? चां-गला विठ्ठलनामानें तुडविला गेला. याचा तुला आनंद नाहीं. असा मृत्यु आजपावेतों कोणाला आला आहे का ? दाखवून दे. तुझा मुलगा पुण्यवान्, महा भाग्यवान्, अनंत जन्मांचें पुण्य फळा-

ला आलें, म्हणून विठ्ठलनामाच्या गजरांत वैकुंठाला गेला. प्रत्यक्ष सुभद्रेचा बाळ अभिमन्यु, त्यालासुद्धां असें मरण आलें नाहीं. श्रीयाळानें आपला चिलिया उखळांत घालून भगवंताला कुटून दिला, त्यावेळीं त्याचे नेत्र भरून आले. पण मला तिळ-मात्र दुःख वाटत नाहीं. मुलाचा जीव सत्कार्यी लागला.

चांगुणा– पण चिलिया बाळ भगवान् सदाशिवानें पुनः जिवंत करून त्याचा त्याला दिला. अभिमन्यूला श्रीकृष्ण पर-मात्मा पुनः आयुष्य देत होता. परंतु त्यानें श्रीकृष्णाचें मुखावलो-कन करीत करीत आपला देह पूर्ण शांतपणें ठेविला. तशी तरी माझ्या बाळाची स्थिति झाली असती, तर मीं फार आनंद मानिला असता. तुह्मी त्याला पायांखालीं तुडवून तुडवून त्याचा चेंदामेंदा केलात; आतां माझें बाळ मला कोण देणार? हें अपय-शाचें खापर तुमच्या त्या विठोबाच्या, त्या काळ्याच्या टाळक्यावर फुटलें. त्याच्या तोंडाला काळोखी लागली. आजपासून जगांत त्याच्या नांवाचा उच्चार कोणीं करूं नये, असें झालें. त्याच्या नांवाच्या उच्चारानें प्रत्यक्ष माझ्या पोटच्या गोळ्याचा अत्यंत निष्ठुरतेनें घात झाला. (मूर्छित पडते.)

प्रवेश चवथा.

स्थळः–औंढ्या नागनाथाचें देवालय.

(नामदेव पूजेचें साहित्य घेऊन प्रवेश करितो. विसोबा खेचर सांबाच्या पिंडीवर पाय ठेवून निद्रिस्त आहे.)

नामदेव– काय मला भुरळ पडली ? तो यवन ह्मणजे पांडुरंग आणखी त्याची बायको ती जगन्माता रुक्मिणि ! पण मला कांहीं ओळखितां आलें नाहीं. आतां गुरुशिवाय गत्यंतर नाहीं हें सिद्ध झालें. देव ह्मणतात, मी मत्स्यावतारीं मांधाता, कच्छावतारीं सहजानंद, वराहावतारीं कंकऋषि, नरसिंहावतारीं

दुर्वास, वामनावतारीं ब्रह्मदेव, परशुरामावतारीं श्रीशंकर, असे गुरु केले. रामावतारीं वसिष्ठाला शरण जाऊन अध्यात्मज्ञानाचा उपदेश घेतला. कृष्णावतारीं सद्भावानें सांदीपनाला शरण गेलों, तेव्हां मला आत्मज्ञान प्राप्त झालें. आतां मीं कोण सद्गुरु करावा, असें विचारलें तेव्हां देवांनीं आज्ञा केली आहे कीं, या औंढ्या नागनाथांत विसोबा खेचर या नांवाचा परमविरक्त शंकराचा भक्त आहे, तो या देवालयांत निद्रिस्त झाला आहे, त्याला शरण जा. इतकें जरी देवांनीं मला सांगितलें, तरी मी कांही कबूल करीना. तेव्हां देव मला ह्मणाले, तुझ्यासारख्या माझ्या भक्तानें जर गुरु केला नाहीं तर अन्यजन कसा करील ? हें तुझें करणें अगदीं अयोग्य होणार आहे. तुला गेलेंच पाहिजे. माझा निरुपाय झाला. मी येथें आलों. मला देवाच्या वियोगाचें दुःख अत्यंत झालें आहे. उद्धवाला ज्याप्रमाणें अखेर श्रीकृष्णानें बद्रिकाश्रमाला पाठविलें, त्याला जसें दुःख झालें तसें मला झालें आहे. पंढरीसारखें क्षेत्र आणि चंद्रभागेसारखें तीर्थ त्रिभुवनांत नाहीं. हें मीं काय सांगावें ! पंढरीचे वारकरी, माझे जिवलग सखे, जाणत आहेत ती मी सोडून आलों. येथें कांहीं उंदीरबिंदीर सडला आहे कीं काय ? घाण कसली सुटली आहे ? येथें कोणी पुजारी दिसत नाहीं. मला वाटतें घाणीमुळें देऊळ सोडून गेले असतील. (विसोबाचे पायांकडे नजर जाते.) हा कोण येथें नीच मनुष्य जोड्यांसुद्धां शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून उताणा पडला आहे ! जोड्याला तेल इतकें चपचपीत दिलें आहे कीं, त्याचे थेंब पिंडीवर गळत आहेत. (जवळ जाऊन) अरे दुष्टा, काय तुझी माय तुला व्याली ! मतिमंदा ऊठ लवकर. पाय बाजूला कर. साक्षात् श्रीशंकराच्या मस्तकावर जोड्यांसुद्धां पाय ठेवून उताणा घोरत पडला आहेस. तुला शरम वाटत नाहीं ?

विसोबा– (हास्य करून) तूं कोण आहेस ?

नामदेव– कोण म्हणजे ? मी दामाशेटीचा मुलगा नामदेव. पण तूं कोण आहेस ? तुझी घाण येत असून महादेवाचे पिंडीवर पाय ठेवून निजला आहेस. तुझे पाय दूर कर. मला नागनाथाचें दर्शन घेऊं दे.

विसोबा– मी म्हातारा, अगदीं थकून गेलों आहें. हातपाय हालत नाहीं. आतां तुला इतकेंच सांगतों कीं, जेथें शिवपिंडी नसेल अशा स्थळीं एवढे माझे पाय उचलून ठेव, म्हणजे मजवर व देवावर उपकार होतील.

नामदेव– पूर्वजन्मांतरीं घोर पातकें केलीं आहेस. त्यांचें हें फळ. भोग आतां. रडून काय होतें ? (नामदेव पाय उचलून बाजूला करूं लागतो.) अरे, हा काय चमत्कार आहे ! जिकडे जिकडे मी याचे पाय ठेवण्यासाठीं जागा पाहतों तिकडे तिकडे मला शिवपिंडी दिसत आहे. देवळांतील घंटा, मृदंग, नंदादीप, सहाणखोड, देवापुढचें कासव, दर्शनास आलेले भाविकजन, सर्वच मला शिवमय दिसतात. अगदीं तीळ ठेवीन तर जागा नाहीं. सर्वत्र शिवलिंगें भासतात. याचे पायसुद्धां मला शिवलिंगाप्रमाणें दिसतात. इतकेंच नाहीं पण माझे हात-सुद्धां मला शिवलिंगाप्रमाणें दिसतात. (पाय धरून विसोबास चक्राप्रमाणें दोन तीन वेळ गरगर फिरवितो.) आतां माझ्यानें याचे पाय सारखे उचलून धरवत नाहींत. हें एक चार मणांचें ओझेंच आहे. पडूंद्या खालीं (जोरानें खालीं आपटतो.)

विसोबा– मला चक्राप्रमाणें फिरवून उभ्यानें आदळून दिलेंस. या तुझ्या दांडगाईनें माझ्या जिवाला फार क्लेश झाले.

नामदेव– मी काय करूं झाले तर ? तुझ्या पाठीला हा महादेव लागला आहेना ? तुझें दुःख तूं भोग. पण काय हो, येथें खेचर म्हणून कोणी असतात काय ? का तुम्हीच खेचर ?

विसोबा– होय बाबा, मीच खेचर आहें.

नामदेव– (एकीकडे) काय ! पांडुरंग वेडा आहे. त्यानें मला

सडका–दुर्गंधी येत असलेला गुरु करावयाला सांगितलें. काय देवानें आमच्याकरितां गुरु निवडून काढला आहे पण! अगदीं विनमोल आहे! सद्गुरूचें प्रथम दर्शन घ्यावयास आलों तों हा अवगुण दिसून आला. जेवणाराला जशी पहिल्या घासाला माशी लागावी, अथवा सूर्याचें दर्शन घेणाऱ्याला सूर्याला ग्रहण लागलेलें दिसावें, तसा प्रकार झाला. (उघड) अहो महाराज, तुह्मी मोठे साधु ह्मणवितां, विरक्त ह्मणवितां, आणखी हें अघोर पातक कां करितां? काय विपरीत तुमचें कृत्य हें? साक्षात् परमब्रह्म पार्वतीरमण शंकर ब्रह्मांडाला क्षणांत आपला तृतीय नेत्र उघडून जाळून भस्म करणारा, त्याच्या मस्तकावर तुह्मी पायांत जोडा चढवून पाय ठेवलेत! हर हर हर! तें असो. पण तुह्मी मला महारोग्यासारखे रक्तपिती भरलेले दिसतां. मला आतां उपदेश देणार कसे? मला तुह्माला गुरु करावयाचें आहे.

विसोबा– असला सडका गुरु कशाला करतोस?

नामदेव– मी तरी तेंच म्हणतों. पण या विठोबापुढें काय करूं? त्याचा आग्रह आहेना!

विसोबा– एका बैलाचें दावें आणून माझ्या गळ्याला बांध म्हणजे मी खरोखरीचें गुरू होईन.

नामदेव– ही काय माझी थट्टा करतां होय?

विसोबा– बरें तर. येथें आतां अंधार आहे. मला बाहेर घेऊन चल म्हणजे तेथें तुला उपदेश देतों.

नामदेव– माझ्यानें तुह्माला उचलून बाहेर नेववेल तरी कसें? नुसत्या पायांचें ओझें चार मणांचें आहे. बाकीचें ओझें सहा मणांचें असेल. इतकें ओझें मला उचलणार कसें?

विसोबा– माझें अगदीं अस्थिचर्म उरलें आहे. मी फार हलका आहे. उचल मला. (नामदेव उचलूं लागतो.)

नामदेव– याच्या काखेंत खांडकें झालीं आहेत वाटतें! राम राम राम!! (हाताचा वास घेतो.) कोण घाण ही! माझे

सर्व हात पुवानें आणि रक्तानें भरले ! सगळ्या माझ्या अंगावर पू आणि रक्त उडालें. पांडुरंगानें कसला दुष्ट गुरु माझे कपाळीं नेमला आहे ! (उचलून बाहेर आणून आदळतो.) आतां काय उपदेश करणें असेल तो लवकर माझ्या कानांत सांगा, आणखी मला जाऊं द्या. माझें सर्व अंग भरलें आहे.

विसोबा–(एकीकडे) मला याची आतां द्या आली. आतां याला लवकर मुक्त करितों. (उघड) केवढ्यानें मला आपटलेंस. मी का लांकडाची मोळी आहे कीं काय ! अगोदर तुझ्या मनांत गुरु करावयाचा नाहीं. केवळ पांडुरंगाचे सांगण्यावरून गुरु करावयाचा. असो; आतां डोळे झांक. (नामदेव डोळे झांकतो. विसोबा त्याच्या मस्तकावर हात ठेवतो.) आतां याचें मन मी आपल्याकडे वळवून प्राण उलट करून पवन आणि आत्मा यांचा संगम करतों. उन्मनीमुद्रा दाखवून सहस्रदळीं नेतों. भ्रमरगुंफा व औटपीठ दाखवून श्रीपीठस्थान, गोल्हाट, शंखचक्र, ही वाट चालवून एकवीस स्वर्ग, मृत्यु, सप्तपाताळ, सप्तसमुद्र, शक्तिदेवी, यांचें दर्शन करवून ओंकार स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन देहांचा झाडा करून आतां आत्मा व परमात्मा यांची खूण दाखवितों. हें सर्व मीं ज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेनें संपादन केलें. (नामदेवाची समाधि लागते). नामदेवा, आतां डोळे उघड. (त्यास जागृत करितो.) आतां मी तुला कसा दिसत आहें ?

नामदेव–(जागृत होऊन)

अभंग.

कृपेची साउली अखंड लाधली ॥ खेचर माउली भेटावया ॥ आतां मज भय नाहींबा कोणाचें ॥ जन्ममरणाचें दुःख गेलें ॥ २ ॥ बंध या मोक्षाची फिटली काजळी ॥ समाधी लागली समाधीसी ॥ ३ ॥ नामा ह्मणे माझें सर्वही साधन ॥ खेचर-चरण विसंबेना ॥ ४ ॥

गुरुमहाराज, आतां मला आपण अत्यंत तेजःपुंज दिसतां. आपल्याशिवाय मला काडीमात्र रिकामा ठाव दिसत नाहीं. आपण सर्वत्र भरलेले आहांत. मी आपल्याला अनन्यभावें शरण आहें. आपली हेळसांड केली, आपला अपमान केला, त्याची मला लेंकराला क्षमा करा.

विसोबा– नामदेवा, तूं कोण आहेस ? तूं कोठें रहातोस ? हें मला सांग.

नामदेव– मी कांहीं नाहीं. कोणत्याही गांवचा राहणार नव्हे. ठिकचे ठिकाणीं एकटा आहें. कोठें जात नाहीं. कोठें येत नाहीं. फिरत नाहीं. जाण्यायेण्याची गोष्ट विनाकारण आहे. मला कोणी आपलें किंवा दुसरें नाहीं. मी कोणाचाच नाहीं. मला जगावें लागत नाहीं. मरावें लागत नाहीं. जशाचा तसा अखंडित आहें. मला नांव नाहीं, रूप नाहीं. कर्माकर्मापासून वेगळा आहें. गुरुमहाराज, आतां फार काय सांगूं, पण मी मनुष्य, देव, यक्ष, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासीही नाहीं. तर सच्चिदानंदस्वरूपी परमात्मा आहें. अशी जरी स्थिति आहे, मी अद्वैत आहें, हें जरी मला कबूल आहे, तरी या स्थितींत मला समाधान वाटत नाहीं. मला देवभक्ताचें कोड पाहिजे. पांडुरंगाची चरणसेवा पाहिजे. त्याच्या नामाचें कीर्तन पाहिजे. देवभक्तपणाचा सुखाचा सोहळा पाहिजे. गुरुमहाराज, देवापासून मला निराळा ठेवा. विश्वीं विश्वंभर कसा भरला आहे, हें मीं जाणलें.

विसोबा– हेंच तत्व ध्यानांत ठेव. तुला आतां हें सांगण्याची गरज नाहीं कीं, नदी आणखी आड हीं जरी आपल्यास भिन्नभिन्न दिसतात, तरी त्यांतील उदक भिन्न नाहीं. तसाच देव आणि तूं जरी भिन्न दिसत आहां तरी देव आणि तूं भक्तिप्रेमानें एकच आहां. जा तूं आतां. पांडुरंग तुझी वाट पहात बाहेर उभा आहे. तूं वाटेनें चालून चालून थकलास,

त्यावेळीं देवानें तुला आपल्या खांद्यावर घेतलें. तुझा घाम पुसला. किती भाग्यवान् आहेस तूं! चल मी येतों तुझ्याबरोबर ह्मणजे तुझ्या कृपेनें पांडुरंगाचें मला दर्शन होईल.

(हातांत हात घालून उभयतां जातात.)

प्रवेश पांचवा.

स्थळ— गोरोबा कुंभाराचें घर.

(गोरा कुंभार, चांगुणा व सगुणा बसलीं आहेत.)

गोरा–

अभंग.

घरीं नांदत बरवे परी । ह्मणोनि केलीसे अंतुरी । नित्य भांडण तया घरीं । आणिक कांहीं न देखों ॥ १ ॥ दुसरी न करावी बाईल । भंड फजीती होईल । बोभाट वेस दारा जाईल । बायकांच्या पाणोथ्या ॥ २ ॥ धाकटीकडे पहातां कोडें । वडील बाईल धडधडां रडे । मेल्या तुझें गेलें मढें । तिकडे कां रे पहातोसी॥३॥ वडील बाईल म्हणे उण्या । धाकटी बाईल म्हणे सुन्या । लाज नाहीं तुझ्या जिण्या । काळतोंड्या बैसलासी ॥ ४ ॥ वडील बाईल धरी दाढी । धाकटी धरून ओढी शेंडी । सांपडलासी यम झाडी । लोंसीवरी पडलासी ॥ ५ ॥ सवती सवतीची केसधरणी । कवतुक पहाती शेजारणी । त्या पुरुषाची विटंबणी । थोर जाचणी तयासी ॥ ६ ॥ नामा ह्मणे गा श्रीहरी । दोघी बायका ज्याचे घरीं । त्याचे न रहावें शेजारीं । थोर जाचणी तयासी ॥ ७ ॥

दोन बायकांच्या नवऱ्याची ही परवड मी आपल्या स्वतःच्या अनुभवावरून सांगतों. मग आतां जे कोणी तीन तीन चार चार

पांच पांच किंवा शंभर शंभर बायका करीत असतील त्यांची त्या कशी धिंड काढितात हें त्यांनाच विचारावें. आतां आपण स्वस्थ झोंप घ्यावी. जय पांडुरंगा. (निजतो.)

सगुणा– आपल्या जन्माचें मातेरें केलेंस आणि आपल्याबरोबर माझी मान कशाला गुंतवलीस ? तुझा नवरा तुला माहीत होता, मग कशाला आईबापाला गळ घातलीस ? मी आज वर्षभर नहात आहें. एक दिवस तरी मला संसारसुखाचें वारें आहे का ? तुला एक मुलगा तरी झाला होता. माझ्या कपाळीं मुळीं मूलच नाहीं म्हणावयाचें. तूं माझी वडील वहीण म्हणून तुझ्याजवळ जिवाभावाची गोष्ट बोलावयाची. जगांत फजिती चालली आहे ती निराळीच. तूं सर्व घाण केलीस.

चांगुणा– मीं नाहीं केली. माझ्या अंगाला हात लाविनात, कारण मीं पांडुरंगाची शपथ घातली होती, म्हणून तुझ्याशीं लग्न केलें. सगळें चांगलें झालें. पण मेली आयत्या वेळीं आईबापांनीं घाण केली. बाबांनीं कशाला म्हणावें "थोरलीप्रमाणें धाकटीचा समाचार घेतजा" म्हणून. त्यांनीं म्हटलें फार उत्तम. आतां मला जसें दूर धरिलें आहे तसेंच तुला धरिलें आहे.

सगुणा–तुला पण एक मूल तरी झालें होतें ना ? मला पतिसुख काडीचें आहे का? रात्रंदिवस माझ्या शरिराला आग लागली आहे. याला तोड काय? बाबांना काय ? तेआपले भोळ्या भावानें म्हणाले, "उभयतां मुली तुमच्या पदरीं बांधल्या आहेत. संसारांत यांचा सारखा संभाळ करा. अधिकउणें दोघींत कराल, तर तुम्हांस विठोबाची शपथ."

चांगुणा– पण आपणा दोघींना सारखें नाहीं का वागवीत ? दोघींचा सारखा मानपान ठेवतात. वस्त्रंभूषणें सारखीं घेतात. इतकेंच नाहीं पण एक दिवस हळूच मीं विचारलें देखील. ह्मटलें माझी बहीण मनास येत नाहीं का ? तेव्हां मला ह्मणूं लागले, तुझ्या बापानें मला शपथ घातली आहे. दोघी बायकांस सारखें

वागवीत जा. विठोबाची शपथ मनांत बाळगून दोघींस सारखें वागवीत आहें.

सगुणा– मला तुझें एरंडाचें गुऱ्हाळ नको आहे. मला मूल-बाळ नाहीं, याची वाट काय? संतान वाढावें, वंश वाढावा, ह्मणून मोठ्या डौलानें नवऱ्याचें दुसरें लग्न केलेंस, पण आतां माझी गळचेपी झाली आहे, याची वाट काय! एखादी दुसऱ्याची कारटी करून आणली असती तर असा प्रकार झाला नसता. मला चांगलें नारूकुंभाराचें स्थळ आलें होतें. त्याच्या घरीं शंभर गाढवें आहेत. इतका तो श्रीमंत. तुझ्या घरीं गरुडच्या नांवाचें एकच गाढव. तेंही मेलें पायगुणाचें नाहीं. घरांत कोणाला सुख आहे का?

चांगुणा– नारूकुंभाराच्या शंभर गाढवांला घेऊन काय करतेस. मेल्याची वागणूक धड आहे का, सांग. नेहमीं मेला बाहेरख्याली. माझा नवरा रात्रंदिवस पांडुरंगाशिवाय भाषण करीत नाहीं. आपल्या घरीं आळंदीचे गेनोबासुद्धां येतात. मुक्ताबाई येते. ह्मटलें त्यांना तरी कांहीं तोड विचारूं.

सगुणा– ह्याच बोलण्याचा मला राग येतो. गेनोबा मुक्ताबाई संन्याशाचीं मुलें; स्वतः संन्यासी. त्यांना मुलाबाळांचें सुख काय माहीत? अशीं चांगलीं शहाणीं माणसें असतीं तर मुक्ताबाईनें एखाद्याचा संसार नसता का उभारला! त्यांना काय आपलें डोसकें विचारतेस?

चांगुणा– मग आतां करूं तरी काय; मला समजत नाहीं.

सगुणा– समजत नाहीं, मग शेण खायला मला कशाला आपले घरीं घेऊन आलीस?

चांगुणा– चुकलें. एक जोडा घे आणि मला मार. माझी धाकटी बहीण पडलीस. दुसरी तिसरी असतीस तर पेकटांत लाथ मारून हांकूनच दिली असती!

सगुणा– मला हांकून दे. तुझ्या मनासारखें होऊं दे. तेवढेंच

आतां बाकी राहिलें आहे. बाकी सगळें झालें, मुलें झालीं बाळें झालीं. त्यांचीं लग्नेंकार्यं झालीं. या डोळ्यांनीं पुष्कळ सुख पाहिलें हो !

चांगुणा– मेला नखाएवढा जीव नाहीं तों इतकी मुलासाठीं बावरी कां ? देव करील तर सर्व चांगलें होईल अशी बावरलीस काय ह्मणून ? मी आपली दुसरीच मुलगी करणार होतें, पण घरीं नांदणूक अशा प्रकारची. मुलगी देणार कोण ? सगळ्या कुंभारवाड्यांत हंसूं झालेलें. सवतीवर कोणी मुलगी देईना. तूं घरीं धाकटी बहीण होतीस ह्मणून बाबांना पायां पडून गळ घातली. त्यांच्यापुढें आईपुढें पदर पसरून एवढी साडीचोळी मागितली. रडूं लागलें. मग आईबापांला दया आली. तुला त्यांनीं यांच्या पदरीं बांधिलें. पण आतां बोलून काय उपयोग ? सगुणे, तुझें अकल्याण करावें ह्मणून का मी तुला आपले घरीं घेऊन आलें; सांग बरें ?

सगुणा– पण कायग चांगुणाआक्का, तुला मी असें विचारतें, देवासाठीं यांनीं एक बायको सोडली, आतां दुसरीही सोडली हें कसंग ? कशाची आली शपथ आणि आणभाक. याला कांहीं तरी युक्ति केली पाहिजे. भुताला जसें कीर्तन आवडत नाहीं, नाहीं तर चोराला जसें चांदणें आवडत नाहीं, तसें यांना आतां बायका नकोशा झाल्या आहेत. पण मला वाटतें, थोडेंबहुत ढोंगही पण आहे. माझ्या मनांत एक युक्ति येते. पण तूं कबूल करणार नाहींस.

चांगुणा– काय तुझ्या मनांत आहे ? माझ्या कानांत सांग. मी एका पायावर अगदीं कबूल आहें. कांहीं तरी युक्ति काढ.

सगुणा– (हळूच) आतां यांना झोंप लागली आहे. आपण दोघीजणीं यांचे दोन्ही हात घेऊन दोन बाजूंला बसूं. जागे झाल्यावर काय मौज होते ती पाहूं. यांनीं आपल्या अंगाला बोट लाविलें नाहीं तर आपणच होऊन त्यांचे हात आपल्या हातांत धरूं. आज एवढेंच करूं. एवढें पचलें, तर उद्यां आणखी कांहीं बरी युक्ति काढीन.

चांगुणा– कबूल. तुझें ह्मणणें मला कबूल आहे. (दोघी-जणी दोन हात आपापल्या हातांत धरितात.) तूं घे डावा हात आपल्या हातांत आणि मी धरतें उजवा. बघूं दे काय चमत्कार होतो तो. (गोरोबा जागा होतो.)

गोरोबा– सोडा माझ्या हाताला. ज्या या हातांनीं माझ्या पांडुरंगाची शपथ मोडली त्या दुष्ट हातांना आतां काय करूं? तिळमात्रसुद्धां मनांत विषयाची आठवण नाहीं. कोमल बाल-काची वृत्ति जशी निष्काम असते तशी पांडुरंगानें माझी चित्तवृत्ति आजपावेतों ठेविली होती. कामवासनेची जाळून राख केली. एक काम जिंकल्यानें सर्व इंद्रियांचा मालक होऊन बसलों होतों. आनंदानें पांडुरंगाचें नामस्मरण करीत होतों. त्या माझ्या आनं-दाचा भंग करणाऱ्या या मदांध हातांना जाळून खाक करितों. नाहीं तर तलवारीनें यांना छाटून टाकतों. यांचें मला पुनः दर्शन नको. पण एक हात तलवारीनें छाटल्यावर दुसरा हात कोणत्या हातानें छाटूं ? नाहीं तर असें करितों–खांबाला तलवार चऱ्हाटानें करकचून बांधतों, आणखी हे दोन्ही पापी हात तिच्या तीक्ष्ण धारेवर जोरानें आपटतों. पहिल्या सपाट्यास मणगटापासून तुटून पडले पाहिजेत. जमिनीवर पडतांच त्यांना जोड्याखालीं तुडवतों. आणखी विस्तवानें त्यांचें जाळून भस्म करतों. कोण दुष्ट ही कामवासना ! पांडुरंगाची शपथ मोडलीत. घोरपातक करणाऱ्या तुमचेंसुद्धां मला दर्शन नको.

चांगुणा– पायां पडतों. शरण येतों. आह्मीं मूर्ख, अज्ञानी. (दोघी दोन्ही हात बळकट धरतात. त्यांना ओढीत ओढीत)

गोरोबा– बस्स. तें कांहीं होणार नाहीं. आतांचे आतां या हातांचे तुकडे तुकडे करणार. (जातात.)

पहिला अंक समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश पहिला.

स्थळ— पंढरपुरांतील महाद्वाराशेजारचें कमळाकरभटाच्या घरापुढील पटांगण.

(नामदेव कीर्तन करीत उभा आहे.)

अभंग.

नामदेव—

नाम गाऊं नाम ध्याऊं ॥ नाम विठोबाला वाहूं ॥ १ ॥
आह्मीं देवाचे देवाचे ॥ दास पंढरीरायाचे ॥ २ ॥
टाळ दिंडी घेउनी हातीं ॥ केशवराज गाऊं गीतीं ॥ ३ ॥
नामा ह्मणे लाखोली सदां ॥ अनंत नामें वाहूं गोविंदा ॥ ४ ॥

अभंग.

विठ्ठलु नाहीं जये शरीरीं । वाया कागा जन्मले संसारीं ।
विठ्ठलु नाहीं जये नगरीं । तें अरण्य जाणावें ॥ १ ॥
विठ्ठलु नाहीं जये देशीं । स्मशानभूमी ते परियेसी ।
रविशशिवीण दिशा जैशी । रसना तैशी विठ्ठलेविण ॥ २ ॥
विठ्ठलावेगळें जितुकें कर्म । विठ्ठलावेगळा जितुका धर्म ।
विठ्ठलावेगळें बोलती ब्रह्म । तितुकाही श्रम जाणावा ॥ ३ ॥
सच्चिदानंदघन । पंढरिये परिपूर्ण ।
कर ठेवूनियां जघन । वाट पाहे भक्ताची ॥ ४ ॥
विठ्ठलेविण देवो ह्मणती । ते संसार पुढती पावती ।
विठ्ठलाविण तृप्ती । नाहीं प्रतीति विठ्ठलेविण ॥ ५ ॥
श्रीगुरु निवृत्तीनें दिधलें । तें प्रेम कोणें भाग्यें लाधलें ।
बापरखुमा देविवर विठ्ठलें । ऐसें केलें ज्ञानदेवा ॥ ६ ॥

(विठ्ठल विठ्ठल भजन करितात.)

विठ्ठलनामानें जर टाळी वाजविली तर सर्व पातकांची होळी होते. माझे सद्गुरु श्रीविसोबा खेचर यांना शरण गेल्यावर त्यांनीं मला सर्व मंत्रांचें सार हेंच सांगितलें कीं, मुखानें विठ्ठलनामाचा उच्चार कर आणखी हातानें टाळी वाजीव. हातांत टाळ घे, चिपळ्या घे, आणखी आनंदानें नाच. देव तुझ्याबरोबर नाचूं लागेल. भजनाची आवड ठेव. सर्व मंडळी टाळी वाजवितात, पण आमचे गोरोबा काका टाळी कांहीं वाजवीत नाहींत.

गोरोबा– महाराज, माझे हात पांडुरंगानें तोडून आपला शब्द खरा केला. आपल्या डोक्यांत मीं जेव्हां थापटणें मारलें त्यावेळीं आपण काय बोलला होतां त्याची आपणास आठवण आहे काय? "देव करील तर तुझे हात तुटून जातील." त्याप्रमाणें झालें. या हातांनीं माझ्या पांडुरंगाची शपथ मोडून हे विषयाला भुलले, ह्मणून मीं यांना तोडून टाकिलें. हात तुटल्याचें दुःख मला मुळींच नाहीं. पांडुरंग माझ्या शिरावर आहे. तो मला हात नसले तरी माझा योगक्षेम चालवीतच आहे. मुखानें विठ्ठलनाम म्हणत असतों. दोन्ही कुटुंबांसुद्धां आतां यात्रेला तेरढोकीहून आलों आहें. चंद्रभागेंत स्नान करून पुंडलिकाचें दर्शन घेतलें पांडुरंगाला आलिंगन देऊन चरण वंदन करून स्वस्थ आहें. (गहिंवर येऊन एकीकडे) पांडुरंगा, अशा कीर्तनाचे प्रसंगीं मला टाळी वाजवितां येऊं नये, याची लाज तुला आहे. हे थोटे हात वर केले म्हणजे मला लाज वाटते. तुजवर माझा सगळा भार ! मला या जगांत आधार म्हणून कोणी नाहीं !

नामदेव– हाताच्या सर्वांनीं पताका कराव्या म्हणजे पांडुरंग गोरोबाचे हात पुनः पहिल्यासारखे करील. गोरोबाला पुनः हात फुटतील. (विठ्ठल विठ्ठल भजन करतो. गोरोबास हात फुटतात.)

गोरोबा– अहाहा ! नामदेव महाराज, तुम्हीं पांडुरंगाला भीड घातलीत, तुमच्या शब्दाला पांडुरंगानें मान दिला. मला पूर्वीप्रमाणें हात फुटले. तुमची योग्यता आम्हीं जाणली नाहीं श्री·

विठ्ठलाचे आपण अत्यंत प्रिय भक्त आहांत अशी माझी खात्री झाली. मी आपल्याला शरण आहें. मजवर कृपा असावी. (नामदेवाच्या पायां पडतो.)

चांगुणा– पांडुरंगाच्या घरीं न्याय नाहीं. आपल्या भक्ताची तेवढी दया येऊन त्याला पुनः हात दिले. मी रात्रंदिवस पोटच्या गोळ्यासाठीं तडफडतें आहे! माझें बाळ आज केवढें तरी झालें असतें! माझी कांहीं त्याला दया नाहीं. एकाला पोटाशीं धरतो, एकाला लाथा मारतो. (मूल रांगत येतें.) आला माझा बाळ्या! (उचलून कडेवर घेते.) पांडुरंगा, धन्य आहेस तूं! मी गरिबानें तुझें काय उतराई व्हावें. मी विनाकारण तुला शिव्या दिल्या. बाळ्या, कुठें होतास इतके दिवस?

बाळ्या– आई मला देवांनीं आपल्याजवळ बसविलें होतें. आई रुक्माबाई मला जेंऊं घालीत. त्यांनीं मला रोज खाऊ द्यावा. विठोबांनीं मला खांद्यावर घेऊन नाचावें अशी गम्मत!

सगुणा– सगळ्यांचें चांगलें झालें. नवऱ्याला हात फुटले. वहिणीला मुलगा मिळाला. मी आपली करंटी ती करंटीच!

नामदेव– गोरोबा, तुम्हाला पांडुरंगाची आणखी रुक्मिणिदेवी-मातेची अशी आज्ञा आहे कीं, आजपासून तुम्हीं दोघी बायकां-बरोबर संसार करावा. तुम्ही शपथेपासून मोकळे अहांत. असें होईल म्हणून पांडुरंगानें मला सकाळींच सांगितलें होतें. (नामदेवाखेरीज सर्व जातात. कमळाकरभट, सुमति व गोपाळ प्रवेश करितात.)

कमळाकर– (पायां पडून) महाराज, मी अनाथ ब्राह्मण आहें. पंढरपुरास रोज भिक्षा मागून निर्वाह करतों. आपण कृपा करून माझे घरीं भोजनास यावें. आपला भजनाचा सोहळा पाहून मी देहभान विसरून गेलों. मी भिकारी आहें.

सुमती– (पायां पडून) पांडुरंगा, ह्या संताला कृपा करून माझे घरीं भोजनास येऊं द्या. पाहिजे तर देव दूर लोटावे, पण संतांना भोजन घालावें, असें मला नेहमीं सांगतात.

नामदेव– बाबा, आमची मंडळी पुष्कळ आहे. तुह्मी या भरीस पडूं नका. तुह्मी गरीब आहांत. तुमचें दर्शन आह्मांला झालें, यांतच आह्मांला फार संतोष आहे.

गोपाळ– (पायां पडून) आपण माझे घरीं जेवल्यावर मी आपल्या ताटांतलें अन्न प्रसाद ह्मणून खाईन. ही पहा माझी आई. हे पहा माझे बाबा. आपण आल्यानें त्यांना फार आनंद होईल.

नामदेव– मला हें बालक पांडुरंगस्वरूपी दिसत आहे ! बाळा, तुझी इच्छा पांडुरंग पुरवील. येतों तुझे घरीं भोजनास. एकटाच येतों. मी आणखी दोन घटकांनीं चंद्रभागेवरून स्नान करून येतों. आज ब्राह्मणाचे घरचा प्रसाद आहे. आह्माला आनंद आहे. (नामदेव जातो.)

सुमति– ह्मटलें, तुम्ही आतां बाजारांत जाऊन सर्व सामान आणा. आज नामदेव महाराज भोजनास येणार आहेत. मी सर्व पक्वान्नें तयार करितें.

कमळाकर– माझ्याजवळ एकसुद्धां पैसा नाहीं. आतां होणार कसें ? आपले भिक्षेचे दाणे आहेत त्यांच्या भाकरी कराव्या झालें. आपला भाव हेंच आपलें पक्वान्न.

सुमति– ही घ्या माझ्या नाकांतील नथ. बाजारांत जाऊन मोडा. तूप, साखर, मैदा घेऊन या. भाजी भाकरी मेली नेहमींचीच आहे ह्मणून ह्मणतें.

कमळाकर– फार चांगलें बोललीस. जातो मी. (जातो)

गोपाळ– आई मला फार भूक लागली. आतां दुपार नाहीं का झाली बरें ? मीं सकाळपासून कांहीं खाल्लें आहे काय ?

सुमति– शहाणा आहे माझा बाळ. आतां आज आपल्या घरीं नामदेव महाराज येणार. तुझ्याकरितां येणार. त्यांना सोडून तूं अगोदरच कां खाणार ? सांग बरें ! मी आतां स्वयंपाक करितें.

गोपाळ– मग मला कांहीं तरी काम सांग. नाहीं तर खायला तरी दे.

सुमति– तुला काम सांगतें. माडीवरच्या गोंवऱ्या घेऊन ये. (जाते.)

गोपाळ– (जाऊं लागतो. ओरडतो.) आई धांव धांव. मला साप चावला. करंगळीला डसला. तो बघ तो बघ. माझ्या करंगळींतून रक्ताची धार लागली. माझ्या डोळ्यापुढें अंधार दिसतो. माझें तोंड कोरडें पडलें. जीभ आंत ओढली (सुमति धांवत घेऊन मुलास मांडीवर घेते.) मी तर मरतोंच, पण नामदेव महाराजांच्या ताटांतलें अन्न मला प्रसाद म्हणून मिळालें नाहीं. एवढी माझी आशा राहिली. तूं त्यांना जेवायला घातल्याशिवाय राहूं नको. (मरतो.)

सुमति– बाळा, कायरे हें झालें ! पांडुरंगा, माझा बाळ किती गुणाचा ! आज संत माझ्या घरीं पाहुणे आले आहेत. पण माझ्या बाळाला साप डसला ! आतां तुझें प्रेत मांडीवर घेऊन घटकाभर रडत बसलें तर नामदेव विन्मुख परत जातील. सत्वाचें हरण होईल. आतां मी काय करूं ? गोपाळा, माझ्याशीं बोल कींरे ! आतां मला भूक लागली म्हणालास. मीं चांडाळणीनें तुला खायला दिलें नाहीं. (कमळाकर प्रवेश करितो.)

कमळाकर– काय झालें काय ?

सुमति– गोपाळाला साप चावलाहो ! ही पाहिलीतका करंगळी, रक्ताची धार लागली आहे. आतां काय करूं !

कमळाकर– हाय हाय घात झाला ! नशीबानें वेळ साधली. यावेळीं तूं रडूं नकोस. हरिश्चंद्र तारामती यांजवर असाच प्रसंग आला होता. देवानें त्यांचा मुलगा त्यांना दिला. आज आपल्या घरीं नामदेव महाराज पांडुरंगाचे महाभक्त भोजनास येणार. त्यांनीं आपल्याला रडतांना पाहिलें तर परत जातील याचा विचार कर.

सुमति– मग मीं आतां काय करूं ?

कमळाकर– तूं त्याला आतां स्वस्थ पडूं दे. जसा कांहीं झोंपींच गेला आहे. तूं त्याला गाणीं म्हण. नामदेव महाराजांचें

भोजन झाल्यावर पुढें काय करावयाचें तें करतां येईल. मीं सर्व सामान आणून ठेवलें आहे. स्वयंपाक शेजारणीकडून तयार करवितों. आणखी नामदेवमहाराजांना बोलावून घेऊन येतों. गाणीं म्हण म्हणजे ते आल्यावर त्यांना शंका म्हणून येणार नाहीं. (जातो.)

सुमति– केवढें मला संकट ! माझ्यासारखी कोणी अभागी नसेल. याला मी आतां काय गाणें म्हणूं.

नवमास कष्टलाशी दहाव्यानें प्रसूत झाली ।
येतांची कर्म जाड तुझी गती अशी झाली ॥
आकांतु ते जननीये दुःखें धाय मोकली ।
स्मरे त्या हरिहरा ध्यायीं कृष्ण साऊली ॥
या देहाचा भरंवसा पुत्रा न धरावा ऐसा ।
माझें माझें ह्मणौनिया बहु दुःखाचा वळसा ॥
बहुत ठकियले मृगजळाच्या आशा ।
तृष्णा सांडोनियां योगी गेले वनवासा ॥
पर्यंदे मदलसा सोहं जो जोरे बाळा ।
निज तू ते विसरलासी लक्ष लागूंदे डोळा ॥

(सुमति मुलास नेऊन निजविते. नामदेव व कमळाकर प्रवेश करतात. नामदेवास चौरंगावर बसवून पूजा करितात. ताट वाढून पुढें ठेवितात.)

कमळा०– (पायां पडून) महाराज, आज आपण भोजनास आलांत यामुळें माझा पूर्वपुण्यठेवाच उघडला. आज मीं दिवाळी दसरा समजतों. धन्य आजचा दिवस ! यापेक्षां आणखी लाभ तो कोणता ?

सुमति– (पायां पडून) आज जन्ममरणापासून वेगळे झालों. ज्यास्त काय बोलूं ? पांडुरंग जाणतच असेल कीं, आज आम्हां दोघांना किती पण आनंद झाला आहे !

कमळा०– महाराजांनीं आतां भोजनास आरंभ करावा.

नामदेव– फार चांगलें. ह्या विरक्तीच्या भाज्या, पूर्णतेच्या

पोळ्या, भूतदयेची क्षीर, समताबुद्धीची घमघमीत कढी, शांतीचें तूप, भावाचा भात, वैराग्याचें वरान्न, फारच उत्तम बेत. (नैवेद्य दाखवितो.) पांडुरंगा, या आतां भोजनाला. हें असें काय बरें होत आहे ? पांडुरंग हृदयांत ध्यानाला कां बरें येत नाहीं ? हो बरी आठवण झाली. म्हणूनच पांडुरंग भोजनास येत नाहीं. अहो, ज्यानें आम्हाला भोजनाचें आमंत्रण केलें तो तुमचा गोपाळा बाळ कोठें आहे ? त्याला जेवायला आणा.

सुमति– आतां काय करावें ? आतां मात्र खरोखर सत्वभंग होऊन नामदेव उठून जाणार. पांडुरंगा, तुह्मीं नामदेव महाराजांच्या हृदयांत प्रवेश करून भोजन कां करानात ? नामदेव महाराज परत गेले तर मी आपला प्राण ठेवणार नाहीं.

कमळाकर– आमची बायको घरची एकटी, काम करायला दुसरें कोणी नाहीं. मुलाची जात, त्याला भूक लागली ह्मणून भोजन घालून निजविला आहे. आपण जेवा महाराज.

नामदेव– इतकेंचना. मग त्यांत काय मोठेसें संकट आहे ! उठवा त्याला. त्याला ताटांत घेतल्याविना आह्मांला भोजन गोड लागणार नाहीं. त्याचें भाषण फार मधुर लागतें. त्याची अजून कांहीं मुंज झाली नाहीं कांहीं नाहीं. बसेल आमच्या ताटांत भोजनाला.

सुमति– त्याला आतां अघोर निद्रा लागली, तो कशाचा उठतो आहे ? माझ्यानें जास्त बोलवत नाहीं. त्याला काळझोंप लागली. मोठ्या नागानें त्याच्या हाताला फोडलें. तो ताबडतोब मेला. महाराज इतका वेळ मीं धैर्यानें गिळिलें, पण आतां मला सहन होत नाहीं. संतास जो भोजनास घरीं आणील, त्याचें मूल मरतें अशी आपली अपकीर्ति जगांत होईल, ह्मणून मला वाईट वाटतें. दुसरें कांहीं नाहीं. आपण स्वस्थ जेवा.

नामदेव– पांडुरंगाची शपथ घेऊन सांगतों तुझ्या बालकाला ताटांत घेतल्याविना मी भोजन करणार नाहीं. कोठें आहे तुझा गोपाळ ? आण त्याला आमच्यासमोर.

कमळाकर– जा आण जा त्याला. संत काय करणार नाहींत? भीष्मांनीं श्रीकृष्णाला हातांत शस्त्र धरावयास लाविलें. प्रत्यक्ष रामाला वाल्मीकाच्या वचनाप्रमाणें आचरण करावें लागलें. पुंडलीकासाठीं अजून विटेवर तिष्ठत उभा आहे. संताचा महिमा देव जाणत नाहींत! (मुलाला आणते.)

नामदेव– पांडुरंगा, हा कमळाकर ब्राह्मण ह्मणजे शुद्ध सत्वाचा अवतार. याचें एकुलतें एक बालक तूं सर्प होऊन फोडलेंस? किती दुष्टपणा हा! याचे गेलेले प्राण जर पुनः परत आले नाहींत, तर मी आपला प्राण सोडीन. सर्व जगाला शपथ घालीन कीं, पांडुरंगाचें नांव कोणीं घेत जाऊं नका. जे अनन्यभावानें तुला शरण आले, त्यांचा तूं असा छळ करतोस? मला आज तुझा संताप आला आहे. विनाकारण ब्राह्मणाचें पोर मारिलेंस. काय मोठा पराक्रम केलास! तुझें उणें काढूं नये, पण तें सर्व आह्मां संतांना माहीत आहे. तें मी आतां बोलणारच. तूं निर्गुण, तुला कोण विचारीत होता? आम्ही तुला सगुण रूपाला आणला. तुला वैकुंठीं नेऊन बसविला. नानाप्रकारचे अवतार घेतलेस, पण आम्ही बरोबर होतों ह्मणून तुझी कीर्ति झाली. सूर्यवंशीं राम झालास, नानाप्रकारचे विलास भोगलेस. आह्मांला पाला खाणारीं वानरें केलींस. बायको रावणानें नेली ह्मणून रडत बसलास. आम्हीं तुझ्या बायकोचा शोध लाविला. त्याचे उपकार विसरलास. आम्ही आपल्या टाळक्यावर डोंगर वाहून तुला सेतु बांधून दिला. आमच्या टाळक्याचे केश जाऊन टकलें पडलीं. ओझीं वाहतां वाहतां उरीं फुटलों. तूं राजाप्रमाणें स्वस्थ बसलास. शेंकडों प्राणांचे बळी देऊन आम्हीं रावण जिंकला असतां एक बाण दुरून मारून रावण मीं मारला ह्मणून जगांत बोभाटा केलास. लक्ष्मण तुझा पाठचा भाऊ रावणानें शक्तिप्रहारानें रणांत चीत केला. मांडीवर त्याला आडवा घेऊन गरीबासारखा रडूं लागलास. माझ्या प्रिय मित्र मारुतीनें उड्डाण करून द्रोणागिरीला शेप-

टानें बांधून आणिला. तुझा लक्ष्मण जिवंत केला. त्याला काय बक्षीस, तर तेल शेंदराचें माजणें! बिभीषण फितूर होऊन तुला एकच दिवस शरण आल्याबरोबर त्याला काय बक्षीस, तर सोन्याची लंका! कृष्णावताराची तरी रड हीच! आपल्यावर डाव आला तेव्हां यमुनेंत उडी घातलीस. वर्षभर आम्हांला ब्रम्ह्यानें कोंडून ठेविलें, तेव्हां दुसरीं गोपगोधनें उत्पन्न केलींस. गोवर्धन आम्हीं उरापोटावर उचलून डोक्यावर धरिला. तूं फक्त करंगळीचा आधार दिलास. आतां कां बोलत नाहींस? बौद्धरूप घेऊन आतां मौन कां धरिलेंस? तुला कांहीं लाज असली तर या ब्राह्मणाचें पोर जिवंत कर. माझें तोंड खवळूं नको. (मूल जिवंत होऊन उठून बसतें.)

गोपाळ– आई मला पाणी प्यायला दे. मला भूक फार लागली.

सुमति– (नामदेवाचे पायांवर मुलाला घालते. नामदेव त्याला कडेवर घेतो.) महाराज, तुम्ही साक्षात् पांडुरंग– आज माझा मुलगा मला दिलांत. मीं आपल्या अश्रुजलानें तुमचे पाय धुवून काढले तरी उपकार फिटणार नाहींत.

कमळाकर– महाराज, आपला अगाध महिमा! आकाश आणि त्याचा निळा वर्ण एकच. मोतीं आणखी त्याचें पाणी एकच. तसें आपण आणखी पांडुरंग एकच आहां. मी आपल्यास शरण आहें. (पायां पडतो.)

नामदेव– भटजीमहाराज, सुमतीबाई, तुम्ही महा भाग्यवान् आहां. चला आपण या गोपाळाला पांडुरंगाचे पायांवर घालूं; नंतर भोजन करूं. ज्यानें तुमच्या मुलाला जीवदान दिलें त्याचें अगोदर दर्शन करूं, मग जेऊं. (जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळः—मारवाड देशांतील अरण्य.

(नामदेव व ज्ञानदेव प्रवेश करितात.)

ज्ञानदेव– नामदेवा, मीं जेव्हां तुला तीर्थयात्रेला माझ्या बरोबर या अशी पांडुरंगाला विनंति केली, त्यावेळीं देव म्हणाले, " नामदेव केवळ माझ्या गळ्यांतील ताईत आहे. माझें त्याजवर फार प्रेम. एक अंशीं लक्ष्मीला प्रत्यक्ष माझ्या बायकोला मी दुसऱ्याला देईन, परंतु नामदेवाला देणार नाहीं. यावज्जन्म मीं नामदेवाला दूर केला नाहीं. " डोळ्याला आसवें आणून देव म्हणाले " माझा नामदेव अगदीं साधा भोळाभावडा बिचारा भोळसर केवळ मजकरितां वेडापिसा असा आहे. त्याचा वियोग मला घटकाभर सहन होणार नाहीं. तूं मला मोठें सांकडें घातलें आहेस. " आपल्याला पोंहचवून देव राउळांत परत आल्यावर ते आईसाहेबाला म्हणाले, " नामदेवाच्या वियोगानें माझें हृदय दुखंड झालें. माझ्या नामदेवाला इष्टमित्र, सोयरे सज्जन, प्रत्यक्ष आईबाप माझ्यावांचून कोणी नाहीं. त्याचा प्राण कसा वांचेल ? माझा रूपणाचा ठेवा ज्ञानदेव याचक होऊन आला आणखी घेऊन गेला. माझें म्हातारपणचें एकुलतें एक बालक ज्ञानदेवानें हिसकवून नेलें " असें म्हणून देव मूर्च्छित पडले. मग भक्तमंडळींनीं वारा घालून देवाला पुनः सावध केलें. पुनः देव म्हणाले, " माझ्या प्रेमळ भक्तांनो, मला तुम्हांला हें तोंड दाखविण्याची लाज वाटते. मी भक्तकाजकल्पद्रुम म्हणवितों, पण मीं माझ्या नामदेवाला कांहीं दिलें नाहीं. त्यानें मला कधीं सांकडें घातलें नाहीं. सेवाऋणाचें भक्कम गांठोडें तो माझ्या मस्तकावर ठेऊन गेला. " मग आईसाहेब म्हणाल्या, " तुम्ही शोक कां करितां ? नामदेवाच्या मुखामध्यें नेहमीं तुमचें नाम आहेच. त्याला दुःखाची किंवा मोहाची बाधा होणारच नाहीं. " मग देव शांत झाले.

तूं इकडे त्यांच्या वियोगानें मूर्च्छित पडलास. मुलासारखा आक्रोश करून रडूं लागलास. देवाची तिकडे अशी स्थिति झाली. काय हें तुह्मां उभयतांतील भक्तिप्रेम ! माझ्यानें त्याचें वर्णन करवत नाहीं.

नामदेव– महाराज, पण देव काय म्हणाले, “ तुह्मी चिद्रूप, सर्व संगापासून अलिप्त, साक्षात् आत्मस्वरूप, तुह्माला तीर्थाटण कशाला पाहिजे ? सूर्याला उजळा देण्याकरितां उटणें कशाला पाहिजे ! गजाननाला विद्याभ्यास करून कोणती सभा जिंकावयाची आहे ? ” आपण सर्व ज्ञानीजनांचे राजे आहांत. माझा मोठा भाग्योदय झाला, पूर्वपुण्य फळाला आलें, म्हणून आपलीं पावलें मला लाधलीं. संसारकर्मांत जे गुंतले, जे जड जीव मायेनें भुलले, त्यांचा उद्धार करण्याकरितां आपण प्रत्यक्ष पांडुरंग अवतरलां आहांत. मी आपल्यास शरण आहें. (उभयतां एकमेकांच्या पायां पडतात.)

ज्ञानदेव– तूं मोठा भाग्यवान्. तुझ्याजवळ नेहमीं पांडुरंगाचें वास्तव्य. तुझी आशा तृष्णा मावळली. प्रेमसुखाची गोडी निरंतर तुला मिळाली. ज्यांच्या कुळांत तुझा जन्म तें कूळ पवित्र केलेंस. आतां तुला जो मीं तीर्थयात्रेला बरोबर घेतला तो केवळ तुझ्यासारख्या प्रेमळभक्ताची संगति मला घडावी, आपल्या देहाचें सार्थक व्हावें, एवढ्याकरितांच. आतां तीर्थयात्रेला कां निघालों तें तुला सांगतों. आपण जरी जीवन्मुक्त आणि पावन असलों, तरी गुरु, देव, तीर्थं आणि भजन यांचा कधीं त्याग करूं नये. आज तूं माझ्या संगतीला येऊन माझे मनोरथ पूर्ण केलेस. पण तुझें चित्त अजून उदास कां ?

नामदेव– आपल्यापाशीं कांहीं चोरून ठेवीत नाहीं. पांडुरंगाचा वियोग माझ्यानें सहन होत नाहीं. चुकलेलें पाडस जसें आपल्या हरिणीला दाही दिशा पाहतें, मातेचा वियोग जसा बाळकाला क्षणभर सोसत नाहीं, चातकपक्षी जसा मेघाची वाट

पाहतो, नाहीं तर अमावास्येच्या रात्रीं चकोर जसा चंद्राला धुंडीत असतो, त्याप्रमाणें मी माशासारखा तळमळत आहें. माझे आईबाप पांडुरंग. इष्टमित्र, बंधु, चुलता पांडुरंग. माझी कुळदेवता पांडुरंग. माझ्यानें जास्त बोलवत नाहीं. माझा पांडुरंग मला दाखवा.

ज्ञानदेव– वेड्या, तुझ्या हृदयांत पांडुरंग असून तूं विनाकारण कष्टी कां होतोस ? तूं साक्षात् पांडुरंगच आहेस. स्वतःच्या नाभींत कस्तुरी असून ज्याप्रमाणें मृग विनाकारण अरण्यें धुंडीत असतो, तशी तुझी स्थिति झाली आहे.

नामदेव– विटेवर समचरण जोडून उभा, कटीवर कर, कासेला पीतांबर, जो सनकादिकांचें ध्यान, शंकराचें प्रिय भूषण, पुंडलिकाला वर देणारा, मला तो दाखवा. मला तुमच्या युक्ति नको आहेत ज्ञानेश्वरमहाराज.

ज्ञानदेव– फार प्रेमळभक्त ! अरे नामदेवा, आपल्या हृदयांत अद्वैतानें देवाला ओळख. तुला विसोबानें काय उपदेश केला ? तो ध्यानांत आण. पांडुरंगाशिवाय रिकामी जागा कोठें तरी आहे काय ?

नामदेव– महाराज, चातक पक्षी नदीचें पाणी पीत नाहींत. आकाशांतून ज्या धारा पडतात तेंच पाणी पितात. पतिव्रतेला पतीशिवाय अन्यजनाच्या गोष्टी गोड लागत नाहींत. मला तुमचें निर्गुण तत्व नको आहे. मला सगुण रूपाची आवड आहे. त्याला पाहिलें म्हणजेच माझे डोळे निवतील. त्याचें कीर्तन या कानांनीं ऐकावेसें वाटतें.

ज्ञानदेव– (एकीकडे) किती याचा भाव शुद्ध आहे ! अशा भक्ताची संगति निरंतर असावी. (उघड) असो. पण आपल्याला तर तहान फार लागली आहे. येथें तर पाणी कोठें दिसत नाहीं.

नामदेव– माझे प्राण तर पाण्यावांचून अत्यंत कासावीस झाले आहेत. एक पाऊलसुद्धां आतां माझ्यानें टाकवत नाहीं.

(इकडे तिकडे हिंडतो.) पण महाराज, हा पाहिला का येथें एक जुनाट आड आहे, परंतु (आंत डोकावून पहातो) हा इतका खोल आहे कीं, यांतलें पाणीसुद्धां दिसत नाहीं. आतां आपली तहान भागणार तरी कशी ?

ज्ञानदेव– याला एक उपाय आहे. अणिमा, गरिमा, लघिमा वगैरे ज्या अष्टमहासिद्धि आहेत त्या मला अनुकूल आहेत. त्यांपैकीं लघिमा सिद्धीच्या योगानें मी स्वतः उदक प्राशन करून तुला आपल्या ओंजळींत वरचेवर आणून देतों. तूं द्वैतभाव मनांत न ठेवितां पी. सर्वांठायीं सदोदित चैतन्यघन व्याप्त आहे, हें तत्व ह्या ठिकाणीं तुझ्या लक्ष्यांत चांगलें येईल. (ज्ञानदेव पाणी पिऊन ओंजळ भरून वर आणतो.)

नामदेव– मी तें पाणी पिणार नाहीं. सर्वांभूतीं जर आपण सांगतां त्याप्रमाणें विठ्ठल आत्मा आहे, तर तो माझा स्वामी काय नाहीं करणार ! मला त्यानें पाणी याच आडांत हातासरसें वर आणून द्यावें तरच मी पिईन, नाहीं तर पाण्यावांचून हा जीव सोडीन. आपण निर्गुण आणि सगुण भक्तींचा हा भेदाभेद अथवा ही तुलना पहाच. आपल्याप्रमाणें मी पोपटाचें रूप घेऊन पाणी पिऊन वर येणार नाहीं. जर आत्मा विठ्ठल सर्वांभूतीं एकच आहे, तर त्याला माझी चिंता असलीच पाहिजे. (सद्गदित होऊन) पांडुरंगा, कायावाचामनेंकरून मी तुझें लेंकरूं आहें. तहानेनें व्याकूळ झालों आहें. माझा अंत पाहूं नकोस. तुझ्याशिवाय कोणत्या देवाला शरण जाऊं ? जन्मापासून तूं माझा सांभाळ करीत आलास. आतां शेवटीं मला लोटून दूर घालवूं नकोस. माझा त्याग करूं नकोस. तूं अनाथांचा कैवारी, अशी तुझी कीर्ति पुराणांत वर्णन करितात, तिला आज उणेपणा येत आहे याची तुला लाज असूं दे. गजेंद्राचे हाकेसरसी उडी घातलीस. सती द्रौपदीला संकट पडतांच धांवलास. तें तुझें ब्रीद आज असत्य झालें. जर तूं यावेळीं आला नाहींस, तर दुर्जन मला

हांसतील. माझे प्राण तहानेनें चालले. मी आतां मरतों. (व्याकूळ होऊन भूमीवर पडतो.)

ज्ञानदेव–(एकीकडे) काय चमत्कार आहे ! तिकडे पंढरपुरास देवाला अशुभ चिन्हें होत आहेत. डावा डोळा लवत आहे. डावा बाहु स्फुरण पावत आहे. देव रुक्मिणिमातेला सांगत आहेत, " माझ्या राजसभक्तांना मी आघाताचा वारा सुद्धां लागूं देणार नाहीं. आज कोणा तरी माझ्या भक्ताला संकट प्राप्त झालें आहे. " हें ऐकून रुक्माबाईनें अंतर्यामीं विचार करून पाहिलें. ' नामदेव या निर्जन प्रदेशांत तृषाक्रांत होऊन धांवा करीत आहे. ' असें देवाला सांगतांच पांडुरंगाला नामदेवाचा कळवळा येऊन मनापेक्षां तीव्र वेगानें तो धांवून आला. हा पाहिला का आड पाण्यानें उचंबळून वर आला. (नामदेवास सावध करितो.) नामदेवा पाणी पी. पांडुरंगानें तुझ्याकरितां पाणी दोन तीनशें हात दोर लागणाऱ्या आडांतून वर अगदीं कांठासरसें आणिलें आहे. (नामदेव सावध होऊन पाणी पितो.) नामदेवा, तुला एकदां सप्रेम आलिंगन देऊं दे. धन्य धन्य आहेस तूं. जगाला तूं आज अघटित करणी दाखविलीस. नळानें उदकांत पाषाण तारले, वसिष्ठानें छाटीकडून सूर्याचें काम केलें, विश्वामित्रानें प्रतिसृष्टि निर्माण केली, गौतमानें गोदावरी आणली, किंवा भगीरथानें गंगा आणली, ह्या गोष्टी आम्ही कानांनीं ऐकत होतों मात्र. परंतु आज त्या सर्वांहून अघटित लीला तूं जगाला दाखविलीस.

नामदेव– महाराज, मी जी जी म्हणून आळ घ्यावी ती ती माझी पांडुरंग पुरवितो. मी त्या माझ्या पांडुरंगाला डोळाभर केव्हां पाहीन ?

ज्ञानदेव–(हात जोडून) नामदेवा एक विनंति आहे. ज्या भक्तिमार्गानें तूं पांडुरंग आपलासा केलास तो मार्ग मला सांग. भजन, नमन, ध्यान, श्रवण कशाला म्हणतात हें मला सांग ?

नामदेव– (पायां पडतो) महाराज, मला हें कांहींच समजत नाहीं, म्हणून पांडुरंगानें माझा हात आपले हातीं दिला. मी अज्ञानी आणखी तुम्ही मला अध्यात्म ज्ञान पुसतां हें पाहून मला असें वाटतें कीं, हिमालयाला फार उबारा झाला म्हणून तो पंख्यानें वारा घेऊं लागला, अथवा सूर्यानें अंधार पडेल म्हणून आपल्या घरीं दिवा लावला, अथवा समुद्रानें जाऊन डबक्यांत स्नान केलें.

ज्ञानदेव– छे छे असें बोलूं नको. तुझी रसाळ वाणी मला अमृतापेक्षां गोड लागते. माझे कान फार भुकेले आहेत. प्रेमरसाशिवाय उद्दंड ज्ञान घेऊन काय करावयाचें आहे ? तुझें ज्ञान अल्प आहे असें तुला वाटत असेल, परंतु तें ध्रुवनक्षत्राप्रमाणें अढळ आहे. इतर फेऱ्या करणाऱ्या नक्षत्रांना घेऊन काय करावयाचें आहे ? तुझ्या ज्ञानाची बरोबरी शास्त्राधिकाऱ्यांना होणार नाहीं. कापशीचें पुष्प जरी सुवासरहित असतें, तरी राया-रंकाला त्याचींच वस्त्रें होतात. आतां संकोच सोडून मला सांग.

नामदेव - अंगीं वैराग्याचें बळ असावें. सर्वांभूतीं अढळ दया असावी. मी-तूंपणाची खळखळ नसावी. प्रपंचाची तळमळ नसावी. अशी स्थिति असून जें भजन करणें यालाच मी शुद्ध भजन म्हणतों. उत्तम मध्यम कनिष्ट हा भेदाभेद नाहीं. याला मी नमन ह्मणतो. विश्वीं विश्वंभर भरला आहे हें निरंतर ध्यानांत धरणें यालाच मी ध्यान म्हणतों. हरिण जसा नादलुब्ध असतो, देहभान विसरून जातो, तसें हरिकीर्तनीं मन तल्लीन असावें. यालाच मी श्रवणभक्ति म्हणतों. सोनार जसा चोरीवर चित्त ठेवून अलंकार घडतो, किंवा जारिणी जशी जारावर प्रेम ठेवून घरांत वागते, तसा बाह्यात्कारीं संसार करून पांडुरंगाचा ध्यास असावा यालाच मी निदिध्यास म्हणतों. मीं आपला हा अनुभव आपल्याला सांगितला. जशी मला पांडुरंगानें बुद्धि दिली तसा सांगितला. त्यानेंच हें मजकडून बोलविलें. मजकडे कांहीं नाहीं

ज्ञानदेव– अहाहा ! अमृताचा वर्षाव केलास. मला संतोष झाला. शास्त्रवक्ते-कर्मनिष्ठ-आत्मज्ञानी-जीवन्मुक्त योगी त्रिभुवनांत पुष्कळ असतील, पुढें होतील; पण नामदेवाच्या भक्तीच्या कसोटीला त्याच्याशिवाय कोणीच उतरणार नाहीं. फक्त पांडुरंग ही कसोटी जाणतो. इतरांनीं गोष्टी कराव्या.

नामदेव– महाराज, विनाकारण मला श्रेष्ठत्व देऊं नका. ज्यांनीं रेड्याच्या मुखानें वेद बोलविले, निर्जीव भिंत चालविली, अनेक मृत जीवांना सजीव केलें, सच्चिदानंदबाबांना चिरंजीव केलें, त्यांना हें कूपांतील पाणी वर आणण्याला उशीर का लागला असता ? परंतु आई जशी लेंकराची महती वाढविते, तशी माझी महती वाढावी, एवढ्याचकरितां आपण कमीपणा घेतलांत. माझ्या ध्यानांत हें आलें नाहीं, असें आपण समजूं नका.

ज्ञानदेव– (हंसतो.) पांडुरंग ह्मणतात, माझा नामदेव भोळा आहे. बराच भोळा आहेस ! असो चल आतां निवृत्तिमहाराजांच्या दर्शनाला जाऊं चल. आपली ते वाट पहात असतील.

(उभयतां जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ— बेदर येथील बादशहाची छावणी.

(नामदेव दिंडी घेऊन जाऊं लागतो त्यास बेदरशहा व त्याचे शिकारी लोक प्रतिबंध करितात.)

बेदरशहा– (एकीकडे) मय् समजाके ये कोयी दुष्मन् हमारे उप्पर चढाई करके आते हय्. लेकिन् मेरी आप् खातर जमा हो गयी के, ओ लढनेवाले रिसालदार नहि हय्. चूंके, इनके पास हाती घोडा हत्यार वगैरा कुच्बी नजर नही आता. अल्बत्ता सो दो सो शक्स नजर आते हय्. इनका इरादा क्या

हय़ मय़ कुच जानता नही. इन् सब् लोगोकूं कय़द् करना मुजे मुम्बाकिन् नही ऐसि बात् थोडि हय़ ? ये जो सबके आगे खडा हय़ ये इनका उस्तादे शरीफ होगा. इस्कू पहिले पकड लेना. (उघड) पकडो हराम जादेकू. काफर नजर आता हय़. (नामदेवास बादशहाच्या फौजेंतील लोक घेरा घालतात.)

ताकंभट– काळंभट, आतां कशाची दक्षणा. तुमच्या नादानें मी आपलीं बायकापोरें सोडून आलों.

काळंभट– गोरंभट ह्मणाले ह्मणून मी ह्मणालों, ब्राह्मणाला जे आहे ते विपुल दक्षणा मिळेल.

ताकंभट– कोणा लेकाला माहीत असा प्रसंग येईल ? आतां शेंडीची आणि जानव्याची उलटी दक्षणा न मिळो ह्मणजे झालें.

(नामदेव सर्व लोकांस भिऊं नका ह्मणून सांगतो.)

बेदरशहा– तुम् कौन् हय़ ?

नामदेव–मी कोणी नाहीं. तूं तसाच मी. हें शरीर काळाचें आहे. तुझ्या शरीराला काळोबा खाईल. माझ्या शरीराला तोच खाईल. ज्या पंचतत्वांपासून हा देह उसना घेतला आहे, त्याला तो परत जाणार आहे. तुझा माझा आत्मा एकच आहे. तूं व मी एकच आहों.

बेदरशहा– वाह्यात. बकवा मत् कर. हम् कुच् जानते नही. नाम क्या बोलता नही. बोल्ता तूम् हम् एक. हम् तक्तनशीन् बादशहा बेदरशहा हय़. हमारे पास दौलत् बहोत् हय़.

नामदेव– दौलत् आहे, परंतु ती कोणाची ? शरीर जसें काळाचें तशीच धनदौलत कुबेराची. दौलतींतील एक पैसाही आपल्याबरोबर येणार नाहीं.

बेदरशहा – तुम् कहाके रहिनेवाले ? किदरसे आये ! बयान् करो. सब् तेंढे जबाब देता हय़. मगरूर. (जोरानें) किदरसे आये ? जाते किदर ?

नामदेव– आलों कोठून आणि चाललों कोणीकडे हा प्रश्न

अगदीं सोपा दिसतो. परंतु बादशहासाहेब हा प्रश्न जर उलगडला तर कोणाचे कोणी शत्रु ह्मणून राहिलों नाहीं. चौऱ्यायशी लक्ष योनी फिरत फिरत आलों. या वेळीं मनुष्यरूपी गांवांत आमची व तुमची वस्ती आहे. परमेश्वराला ओळखण्याची एवढीच जागा आहे. ती का एकदां निघून गेली, कीं पुनः चौऱ्यायशीच्या फेऱ्यांत पडलांत ह्मणून समजा.

बेदरशहा— मेरा सर मानिंद आंगरके गरम होगया. मय् बादशहा होके मेरी ऐसी बेअदबी करता हय्. अब् मय् इस्कू खतम करू. अब् एक सवाल करताहूं, इस्का जबाब तेढा मिलगया तो तेरी जान् जायगी. याद रखू. तेरा देव कोनसा हय् ? तूं भजनपुजन कोनसे देवका करता हय् ?

नामदेव—

अभंग.

जंबूया द्वीपामाजी एक पंढरपुर गांवगा ॥ धर्माचें नगर ज्याचें विठु पाटिल त्याचें नांवगा ॥ चला जाऊं तया ठायां इच्छा भोजन मागावयागा ॥ १ ॥ विठोबाचा धर्म जागो । त्याचे चरणीं लक्ष लागोगा ॥ २ ॥ ॥

बेदरशहा— अच्छा अच्छा. सब् मालुम हुवा. तूं पंढरी करके दखनमे एक गांव हय्, व्हा कुई विठोबा करके देव हय्, उस्का तूं मुजावर हय् पीर हय्. लेकिन् तूं उस देवका सच्चा पीर हय् या झूटा पीर हय् ये बात् हमकु देखनेकी हय्. अब् हम् ऐसा करेंगे के, कसई ह्यांकी एक मारी हुवी गाय तेरे पास लायेंगे. अगर उस्कू तूने जिंदा किया तो फिर हम् तेरेकु विठोबाका सच्चा पीर समजके तेरा दिल चाहेगा सो इनाम जहागीर जवाहिरात तेरेकू आदा करेंगे. लेकिन गाय तेरे हातसे जिंदा न हुवी, तो तेरेकू और तेरे सब् लोगोंकू कत्तल कमाकरेंगे. बोल् कितने आरसेमे गाय जिंदा करेगा ? तेरा दिल चाहे इतनी मुदत् तेरेकू देता. अबि के अबी उठाता ? हम् या खडे रहते. उठाव हमारे सामने. नही तो

विठोबा तेरा परवरदिगर इस्की याद करने के वास्ते दो दिन् च्यार दिन् हमसे मुदत ले.

नामदेव– (एकीकडे) पांडुरंगा, माझ्या जिवाचें मला कांहींच वाटत नाहीं. परंतु हे बिचारे ब्राह्मण विनाकारण मरतील. ब्रह्महत्त्येचें पातक मजवर येईल यांची तुला दया येऊं दे. आजचें मरण उद्यांवर ढकलतों. (उघड) महाराज, ह्या ब्राह्मणांना विनाकारण मारूं नका. पाहिजे असल्यास मला मारा. मी मरावयास तयार आहें.

बेदरशहा– क्या बात करता ! सबकेवास्ते अकेला मरता ! दिवाना हय्. हम् ऐसा नहि करने के. पहिले ये सब् बम्मनकू काटेंगे. फिर तेरी जान् लेंगे. नहीं तो बोल जल्दी कितने दिनमे ये गाय जिंदा करेगा ?

नामदेव– विठोबाच्या कृपेंकरून चार दिवसांत ही गाय जिवंत करीन. न केली तर आपणास वाटेल ती शिक्षा करा. कारण आम्हीं आपला मोठा अपराधच केला आहे. आपल्या गांवीं आलों ही चूक झाली.

बेदरशहा– अच्छा अच्छा, तेरा अर्ज कबूल. (पड्याकडे दाखवून) ये देख् गाय मारी हुवी. तेरे सामने हय्. अब् हम् चले जाते. आजसे चार दिनके बात हम् ह्यापर वापस आयेंगे. फिर देख् नतिजा कैसा होता हय्. खुप ख्याल करो. (बादशहा व त्याचे शिकारी लोक जातात. सर्व लोक नामदेवास सोडून जातात.)

नामदेव– सर्व माझी मंडळी मला सोडून गेली. तुमच्या जिवाकारितां झटत असून तुम्ही पळून गेलांत. वृद्धपण आल्याबरोबर इंद्रियें आपल्या ताब्यांत राहत नाहींत. सूर्यकिरणें लागतांच पतंगी रंग उडून जातो, तसें हें जन आहे. कठीन समय येतांच कोणी कामाला येत नाहीं. पांडुरंगा, चांगलें केलेंस. आतां मीं काय करावें ? पांडुरंगा, देवकी मातेचीं सात मुलें तिचीं तिला आणून भेटविलींस. सांदीपन तुझा गुरु, त्याचा मृत झालेला

मुलगा गुरुदक्षणा ह्मणून पुनः परत आणून दिलास. धर्मानें केलेल्या राजसूययज्ञाचे वेळीं एका अनाथ ब्राह्मणस्त्रीचा पति जिवंत केलास. रामावतारीं राक्षसांनीं मारलेल्या असंख्य वानरगणांना कृपादृष्टीनें सजीव केलेंस. ह्या मेलेल्या गायीला पुनः सजीव करणें तुला अशक्य नाहीं. कृष्णावतारीं डोकीवर घोंगडें, हातांत मुरली, खांद्यावर शिदोरी, अशा गोपवेशानें तूं स्वतः आपल्या संवगड्यांसह नऊ लक्ष गोधनें नंदाच्या घरीं वळलींस, ज्यांचें दुग्ध हाच ब्रह्मरस असें समजून तुह्मीं त्यांत शिदोऱ्या कुसकरून खाल्या. आणखी खरकटे हात ढुंगणाला पुसलेत. ज्यांच्या दुधाच्या बळावर पांडुरंगा तूं वत्सासुराला आकाशांत झोंकलास. बकासुर उभा चिरलास, कालिंदीच्या डोहांत वस्ती करणारा दुष्ट काळया नाग पायांखालीं तुडविलास, कंसचाणुरादिकांचें मर्दन केलेंस, आणखी ज्यांची तूं मातेप्रमाणें सेवा केलीस, तो तूं नंदाचा खिल्लारी, गोरस चोरून खाणारा, आज निर्दय कसारे झालास ? जिच्या सर्वांगीं तेहतीस कोट देवांची वस्ती, जिचें पूजन केलें असतां सत्यलोकची प्राप्ति, जे गायीचें पूजन करतात त्यांचे चरण तूं मस्तकावर धारण करतोस, असें असतां तूं अजून कां येत नाहींस ? दहा दिशांनीं तुझी मी वाट पहात आहें. मला मुद्दाम काळाचे हातीं बांधून देत आहेस ! पांडुरंगा, तूं माझा वैरी कसारे झालास ? अंतःकाळीं मी तुझें लेंकरूं परदेशीं मरून जाणार. यापेक्षां येथें येऊन आपल्या हातांनीं का माझा गळा कापून टाकिनास ! ह्मटलें पंढरपुराला जाईन. माझा नामदेव आला ह्मणून सिंहासनावरून उडी टाकून धांवत भेटावयास येईल. माझी हनुवटी धरून पितांबरानें माझें तोंड पुशील माझ्या मस्तकावर अभय हस्त ठेवील. रुक्मिणिमाता मी रुसलों ह्मणून माझी समजूत करील. व्यर्थ व्यर्थ मीं पांडुरंगाची आशा केली !

अभंग.

येवढा वेळ कां लाविला । कोण्या भक्तानें गोविला ॥ १ ॥
लवकरी येईना विठ्ठला । कंठ आळवितां शोकला ॥ २ ॥
वाट पाहतों दाही दिशा । पोटीं धरुनिया आशा ॥ ३ ॥
कधीं येईल हरी माझा । आलिंगीन चहुं भुजा ॥ ४ ॥
न कळे कां झालें उदास । मज तव वाटति निराश ॥ ५ ॥
नामा गहिंवरें दाटला । देह धरणीवर लोटला ॥ ६ ॥

(नामदेव मूर्च्छित पडतो. पडदा पडतो. बेदरशहा प्रवेश करतो.)

बेदरशहा– च्यार दिन् आज पूरे हो गये अब्. वो विठोबाका मुजावर कैसा हय् वो मय् देखताहूं. सब् ढोंग मच्याते. सब बात पैसेकी-बादशाही पैसेकी. गाडी घोडा पैसेका. हाती घोडा पैसेका. मेहल माडी पैसेकी. इनाम एकरार पैसेका. ख्याल खुशाली पैसेकी. जोरू लडकी पैसेकी. सब पैसा पैसा पैसा. अगर सच्चापीर होता, तो अलबत्ता गाय जिंदा होतीथी. लेकिन उस्मे जान् नहिं. पैसेके वास्ते पंढरपुर छोडके बेदरकू आया. मय्ने पुछा भाई तूं कौन हय् ! मुझे कहता तुम और मय् एक हय्. अब् कैसा एक हय् सो मय् देखता हय् (वजीर प्रवेश करतो.) क्यौं सलाबतजंग, क्या खबर हय् ?

वजीर– तक़सीर माफ़. ओ विठोबाका पीर मरगया. और गायबी जिंदा नहि हुवी.

बेदरशहा– ऐसा कैसा होगया ? वो कैसा मरगया ? सिवाय हमारे हुकूमके वो कैसा मरगया ? उस्कू जिंदा रखनाथा. ढोंग किया होगा. मरता कायका ? चलो मय् जातसे एकदफे उस्के नजूदीक् आताहूं. (उभयतां जातात, पडदा उघडतो. आकाशवाणी होते: “ नामदेवा उठ. गायीचें मस्तक गायीचे धडाला लाव म्हणजे गाय आतां उठून बसेल. भूमंडळांत असा कोण आहे कीं, जो माझ्या भक्तांचा छळ करील. ”)

नामदेव– (सावध होतो.)

अभंग.

पीतांबर शेला कैसा गगनीं झळकला । गरुडावरी बैसोनी माझा कैवारी आला ॥ ध्रु० ॥ विठोबाचें राज्य आह्मां नित्य दिवाळी । विष्णुदास नामा जीवेंभावें वोवाळी ॥ १ ॥

(नामदेव पडद्यांत जाऊन येतो. दिंडींतील लोक, बेदरशहा व त्याचे शिकारी लोक प्रवेश करतात.)

देव मला ह्मणतात चार दिवसांची मुदत कशाला मागितलीस ? आतां गाय जिवंत करीन असें कां नाहीं ह्मणालास ? एक सोडून अशा लाखों गायी जिवंत केल्या असत्या. अखेर माझी चूक माझ्याच पदरांत.

बेदरशहा–(गुडघे टेकून) मय् लाचार हय्. गुन्हेगार हय्. तुम् पिरोमुरशद् हय्. विठोबा भगवानका खास मुजावर हय्. मुजे माफ कर. तेरेकू इनाम देताहूं.

नामदेव—

पद.

सावध सावध रे भजलेरे राजा । उत्तम नरतनु पायो रे भाई ? ॥ गाफल क्यौं हुवा दीवानो ॥ ध्रु० ॥ जिने जन्म में डारा है तुजकूं । बिसर गया उसका ध्यान ॥ फिर पस्तायेगा दगा पायेगा । निकल जायगा अवसान ॥ सावध० ॥ १ ॥ क्या करना सो आजि करले । फीर नये ऐसी जोडी ॥ हौस जायेगा पिंजरा पडेगा । तुज कैसी भुल पडी ॥ सावध० ॥ २ ॥ सुन्नेका मंदीर मेहेल बनाया । धन संपत नही तेरी ॥ मा भैन आवर जोरू है लडके । सुखके खातर सारे ॥ एकेले आना एकेले जाना । सब झूटी माया पसरी थु ॥ सावध० ॥ ३ ॥ लक्षचौऱ्यांसीका फेरा आवेगा । तब चुपी मिलाये बंदकु ॥ फिरता फिरता जु रमता है बाबा । कोन

रखे तेरे तनकु ॥ जिस माय उदरीं जन्म लीयेगा। तेरे संगत दुःख उनकु ॥ सावध० ॥ ४ ॥ गरभीकी यातना सुन मोरे भाई ?। नवमास बंधन डारे ॥ नहीं जगा हलने चलनेकु बाबा ॥ छोडनेकु कोई नही आवे ॥ आग लगी है देखत अंधे । कायके खातर खोया ॥ सावध० ॥५ ॥ ऐसी बात सुनके नामा सावध हूवा । गुरुके पाव मिठी डारी ॥ मैं अनाथ दुबले शरण भये तुमकु । आप गोरखके चरण लागे ॥ सावध० ॥ ६ ॥

(वजीर धांवत धांवत प्रवेश करतो. नामदेव बादशहास उठून बसवितो.)

वजीर– तकसीर माफ्. मेरेकु सापने काटा. हजारो लोगोकू साप काटते हय्. हारे पीले काले अस्मानी सफेत् और लाल् हजारो हजार बलके लाखो साप बडे जहरी हजारोकू काटते हय्. अब् मय् मरताहूं. तकसीर माफ्. विठोबाके भगतकूं आपने खाली ताराज किया. इस्का नतीजा ये होगया. ओ देखो साप आया. (बादशहा भितो उडी मारतो.) शेकडो अदमी मरगये. जानवर मरगये. हत्ती घोडा मरगया. बिल्ली कुत्ते चुवे मरगये. मेरे चच्या मरगये. मेरी चची मरगयी. हमारे उस्ताद् मरगये. उनके बुढे बाबा मरगये. फुपु मरगयी. भाबी मरगयी. (रडतो.) और बीबी मरगयी. सब गोषेमे साप होगये. जिसने गाय जिंदा किया ओ सब शहरके लोगोकू जिंदा करेगा. इस्मे कुच शक् नही. मय् तो अब् मरताहूं. आदाब् अर्ज (मरतो.).

बेदरशहा– ये क्या बला हम्पे ? क्या आफ्त ! तौबा ! तौबा ! ! अय् मुजावर, मेरा वजीर मरगया. इस्कू और सब लोगोकू तू जिंदा कर. मय् तेरी कद्मबोसी करता हूं. ये सब् बम्मनकू मिठा मिठा खाना खिलाता हूं. और हजारो हजार रुप्पया दक्षना देताहूं.

तांकंभट– आतां मात्र दक्षणा मिळण्याचा योग आला आहे बरें का काळभंट ? तरी मी आपल्या कारव्याला म्हणत होतों, अरे चल नामदेवाबरोबर. सुग्रास खायला मिळेल, दक्षणा मिळेल. शिंच्यानें विनाकारण दक्षणा बुडविली.

काळंभट– आमची ठकी आली असती तर तिलासुद्धां दक्षणा मिळाली असती. पण आतां बोलून काय उपयोग ? आमच्यावर आमच्या बायकोची सत्ता.

नामदेव– (वजिराचे मस्तकावर हात ठेऊन) उठ बाबा. मरूं नकोस. आह्मी तुमच्या गांवीं आलों आणखी आमच्या पायगुणानें हजारों साप निघून हजारों लोक मेले असा डंका सगळ्या भरतखंडांत होऊं नये. (वजीर उठून बसतो.) चला आह्मी तुमच्या शहरांत येतों. जे लोक मेले आहेत त्यांचीं प्रेतें आमच्या पुढें आणा, ह्मणजे पांडुरंगाच्या कृपेंकरून सर्व जिवंत होतील. आतां राजा, तुझ्याजवळ मागणें इतकेंच आहे कीं, आजपासून तूं गोहत्या आपल्या राज्यांत बंद करावी. या बेदरांत माझ्या पांडुरंगाचें देवालय बांधून त्या देवस्थानाला कायमचें इनाम करून द्यावें.

बेदरशहा– कबूल् हय्. चलीये मेरे सात. मय् आपने रियासत्कूं आपके पावका दर्शन करताहूं. (जाऊं लागतात.)

तांकंभट– अहो काळंभट, अहो गोरंभट, नामदेवबोवांनीं दक्षणेचें नांव काढलें नाहीं. फुकट हो फुकट आह्मी आलों. अहो नामदेवमहाराज, अहो बादशहासाहेब ह्मटलें ब्राह्मणांना या प्रसंगीं जे आहेत्ते दक्षणा मिळावी.

बादशहा– अच्छा अच्छा. चलो, हरएक बिरामनकू हजार हजार रुपय्या दक्षना देताहुं.

वजीर– मयूबी एक एक पैसा दक्षना देताहु. (सर्व जातात.)

प्रवेश चवथा.

स्थळ – औंढ्या नागनाथाचें देवालय.

(एक वारकरी नामदेवाची दिंडी घेऊन प्रवेश करतो.)

वारकरी–औंढ्यानागनाथ महापुण्य क्षेत्र! शिवभक्त याला कैलासाची उपमा देतात. आज माघ वद्य चतुर्दशी आहे. शिवरात्रीचा मोठा पर्वकाळ आहे. आज नामदेवमहाराजांची स्वारी येथें आली आहे. हें पाहून मला असें वाटतें कीं, संकष्टीचे दिवशीं ज्याप्रमाणें गजाननमहाराज यावेत, नाहीं तर चंपाषष्टीचे दिवशीं म्हाळसाकांताची भेट व्हावी किंवा आषाढ शुद्ध एकादशीस श्रीविठ्ठलाची मूर्ति दृष्टीस पडावी, तसा हा अपूर्व योग आज घडून आला आहे. (नामदेव प्रवेश करतो.)

नामदेव – (हात जोडून) हे पुराणपुरुषा, अनादिसिद्धा, विरूपाक्षा, पंचवदना, नीलग्रीवा, तुला मी अनन्यभावें शरण आहें. (नमस्कार घालतो.) पांडुरंगानें अमृत भक्षण केलें, महादेव श्वेतवर्ण झाला. शंकरानें हलाहल प्राशन केलें, ह्मणून पांडुरंग सांवळा झाला. लक्ष्मीस्वरूपानें सदाशिव विष्णूची स्त्री झाला. नारायण भवानीचे रूपानें पार्वती होऊन शंकराला वरिता झाला. तात्पर्य एक एकावेगळा नाहीं. एक पांडुरंग हरिहराचा अवतार आहे.

(कांहीं ब्राह्मण सर्वांगास भस्म चर्चून रुद्राक्षमाळा धारण करून धौत वस्त्रें परिधान करून हातांत अर्घोदक घेऊन षोडशोपचारी पूजेचें साहित्य घेऊन महाद्वाराजवळ येतात.)

चक्रवाबा– अरे बाजूला व्हा. बाजूला व्हा. आह्मांला विटाळ कराल.

वारकरी– स्नानसंध्या बहुतेक वरवरच दिसते. अंतर्यामीं विकल्पानें मन विटाळलेलें आहे. लोकांना ह्मणतात बाजूला व्हा. आह्माला स्पर्श करूं नका ह्मणतात. ज्याच्या अंतःकरणांत

क्रोध जागृत आहे, त्याला सर्वच अमंगळ वाटत असतें. त्याच्या दृष्टीला निर्मळ असें कांहींच दिसत नाहीं.

नामदेव– महाराज, हरिकीर्तनांत विटाळ नाहीं. ब्रह्मसभेंत विटाळ नाहीं. शिवविष्णूचे दर्शनाला जातांना विटाळ मानूं नये. गीता, भागवत, अथवा वेद या पुस्तकांस विटाळ नाहीं. श्रीकृष्ण परमात्मा आणखी रुक्मिणि यांची जेव्हां लग्नाची वरात निघाली, त्यावेळीं हजारों नागरिकजन॰ पहावयाला जुळले. एकच गर्दी उडाली. त्यांत कसाबिणीचे धक्के संन्याशांना लागले. त्यावेळीं श्रीपादांना मोठा क्रोध आला. त्यांनीं मारे दंडांनीं वेश्यांचें कांडात काढलें. त्यावेळीं त्या वेश्या रडण्याचे ऐवजीं पोट धरून खो खो हंसायाला लागल्या. त्या ह्मणाल्या, प्रारब्ध आमचें ! व्यर्थ जानव्याची आणखी शेंडीची ताडातोड केलींत. शेर शेर काव नासून भगवीं वस्त्रें परिधान केलींत. अंतरशुद्धि नाहीं. प्रत्यक्ष श्रीकृष्ण तुह्मांला दिसत आहे. आणखी तुह्मी आमचा विटाळ मानता ! तुह्मी निंद्याहून अति निंद्य आहांत. भगवान् शंकर याच्यासमोर तुह्मी विटाळ मानून आपली जीभ कां विटाळतां ?

चक्रबाबा– आह्मांला तुझे दृष्टांत नको आहेत. तूं गेला होतास वाटतें कृष्णाची वरात पाहावयाला ? ही कांहीं येथें पंढरी नाहीं समजलांत ? लागले आपले टाळांचा शेर शेर कीस पाडायाला ! पावशेर पावशेर गोपचंदनाचा सत्यनाश करून मुद्रा लावून आह्मांला डौल दाखवितोस ? आमच्या देवाला एकादशनी, लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र हे आवडतात. दुधांत मीठ आणि भाजींत साखर असलें तुमचें भजन नको आहे. कैलासपति भगवान् शंकर यांना भजन आवडत नाहीं. आतां तुह्मी पंढरपुराला चालते व्हा. तेथें निळाजऱ्याप्रमाणें जाऊन नाचा.

लंबोदरभट– अहो चक्रबाबा, तुह्मी त्या मूर्खांना वेदांत कसला पढवीत बसलां आहांत ? बाजूला हांकून द्यावें, आपण चालतें व्हावें. पंढरीहून हें श्रेष्ठ आहे का कनिष्ठ आहे, याची

मीमांसा अशा मूढ लोकांजवळ करीत बसायाचें कारणच नाहीं. अरे बाबांनो, तुह्मांला विठलापुढें शंकराची जर किंमत वाटत नाहीं, तर येथें आलांत कशाला ?

चक्रबाबा– लंबोदरभट, मीं तरी तेंच ह्मणतों आहें. शिव तो शिव. त्याची बरोबरी पांडुरंग काय करणार ?

नामदेव– अहो श्रेष्ठहो पांडुरंग आणि शिव दोन का आहेत ? रत्न आणि त्याचें तेज एकच. पक्वान्न आणि त्याचा स्वाद एकच. मेघ आणि जल एकच. दोघे अभेद आहेत.

चक्रबाबा– अरे भिकारड्या, आह्मी ब्राह्मण उच्चवर्ण, शास्त्राधिकारी, सर्वज्ञ, आह्मांला ज्ञान शिकवितोस काय ? आतां मणगटाला धरून धक्के मारून बाहेर काढीन. मग विटाळ झाला तर झाला. पुनः स्नान करीन. (चक्रबाबा व लंबोदरभट. नामदेवाच्या दंडाला धरतात व बाहेर ओढतात.) पाहिजे असेल तर देवाच्या मागें जाऊन ओरड. येथें देवाच्या पुढें आलास तर टाळक्यांत पळ्यापंचपात्रीं घालूं. दुसरें तर कांहीं नाहीं. कर्ममार्ग बंद पाडतो आहे. भक्तीचें थोतांड आमचेपुढें चालणार नाहीं.

नामदेव–

अभंग.

विष्णुसी भजला शिवदुऱ्हाविला ॥ अधःपात जाहला तया नरा ॥ १ ॥ शिवपूजा करी विष्णूसी अव्हेरी ॥ तयाचिये घरीं यम नांदे ॥ २ ॥ विष्णुकथा ऐके शिवासी जो निंदी ॥ तयासी गोविंदीं ठाव नाहीं ॥ ३ ॥ नामा ह्मणे शिवविष्णूमूर्ति एक ॥ वेदाचा विवेक आत्माराम ॥ ४ ॥

ब्राह्मणाची आज्ञा ती शंकराची आज्ञा. जातों मी महाराज.

वारकरी- काय कीर्तनाची बाहार चालली होती ! कीर्तन ऐन रंगांत आलेलें, पण या भटांनीं कीर्तनाचा विरस केला. देवासाठीं गंध उगाळून ठेवावें आणखी त्यांत कोणी तरी लसूण

कालवावा, नाहींतर कस्तुरींत हिंग मिसळून टाकावा तसें झालें. (नामदेव व दिंडींतील लोक देवाचे मागें जातात. ब्राह्मण स्नानें करावयास जातात.).

नामदेव – हे पार्वतिरमणा, स्मशानवासी, खट्वांगधरा, कैलासपते, दिगंबरा, विश्वेश्वरा, विश्वपते, तूं प्रत्यक्ष पांडुरंग आहेस असें समजून हा तुझा बालक तुझ्यासमोर कीर्तन करीत होता. तूं विन्मुख होऊन मजकडेस पाठ केलीस. माझ्या कडून काय अपराध घडून आला ? तूं मजकडे तोंड केलेंस तर कीर्तनाला जास्त रंग येईल. द्रौपदीची लाज राखण्याकरितां तिला चतुर्भुज केलेंस. बेदरांत गायीला जीवदान दिलेंस. मारवाड देशांतील आड पाण्यानें उचंबळून आणलास. (देऊळ फिरतें. विठ्ठल नामाचा गजर करतात. ब्राह्मण प्रवेश करतात.)

चक्रबाबा– अहो, पूर्व कोणती हो ? मला अर्घ्य द्यावयाचें आहेत ह्मणून ह्मणतों.

लंबोदर– हा काय मूर्खासारखा प्रश्न ! अगदीं दिशाभूल झाली वाटतें ? सूर्य उगवतो ती पूर्व दिशा. सूर्य मावळतो ती पश्चिम दिशा. उजव्या हाताला दक्षिण दिशा. डाव्या हाताला उत्तर दिशा. आठ वर्षांच्या आमच्या चिंगंभटाला हें कळतें. तुह्मी आजपावेतों अर्घ्यप्रदान करीत आलांत. (तोंड वांकडें करून) पूर्व कोणती ह्मणून विचारतां !

चक्रबाबा– मग नागनाथ शंकराचें महाद्वार पूर्वाभिमुख होतेंना ? हा नंदी मागचे बाजूला कसा आला ! देऊळ फिरलें कीं काय ? हो असेंच खरें. हें पाहिलेंत का, नंदी आणि तीर्थाचें कुंड देवाच्या समोर होतीं, तीं मागें आलीं आहेत. ह्या विजे-सारख्या दिव्य पताका कोठून आल्या ! महाराज ह्या नामदे-वाचा अंतपार ब्रह्मादिकांना कळावयाचा नाहीं. नागनाथ शंकर त्याच्या भक्तीला भुलला. आपण कर्मठपणाचा अभिमान धरून त्याचा व्यर्थ छळ केला. (नामदेवाजवळ येतात.) महाराज,

आपण वैष्णववीर आहांत. उद्धवाचा अवतार आहांत. कधीं कोणीं पाहिलें नसेल किंवा ऐकिलें नसेल अशी करणी करून दाखविलीत! धन्य धन्य तुझी माऊली कीं, जिच्या पोटीं असें रत्न जन्मास आलें.

लंबोदर– या लंबोदर भटाचा तुला असा आशीर्वाद आहे कीं, पृथ्वी चंद्र सूर्य आहेत तों पर्यंत तुझें चरित्र जे पवित्र भक्त गातील, कानानें ऐकतील, ते एका क्षणांत पावन होतील. (नामदेवाचे मस्तकावर हात ठेवितो सर्व मिळून शंकराची आरती करतात.)

आरती १.

निर्गुणा निर्विकारा॥शिवा कर्पूरगौरा॥व्यापुनी चराचरीं॥ होसी सुकृतीपरा॥ अगणित कोटि लिंगें॥ पुराण प्रसिद्ध बारा॥ एक तरी दृष्टि पाहे॥ अन्यथा भूमीभारा॥ १॥ जयदेवा नीलकंठा॥ सकल देवा आदि श्रेष्टा॥ रंक मी शरण आलों॥ निवारीं भवकष्टा॥ ज०॥ ध्रु॥ सोरटी सोमनाथ॥ जगीं एक विख्यात॥ तयाचे दर्शनें हो॥ चुके संसारपंथ॥ हिमवंत पृष्टिभागीं॥ लिंग केदार मुक्त॥ साधुसंत सेविताती॥ धरुनि कैवल्य हेत॥ जय०॥२॥ उज्जनी नाम नगरीं॥ पवित्र चराचरीं॥ महाकाळ लिंग जेथें॥ धन्य जो पूजा करी॥ ओंकार महाबळेश्वर॥ ज्योतिर्लिंग निर्धारी॥ तयाच्या दर्शनें हो॥ जन्ममरण निवारी॥ जय०॥ ३॥ पश्चिमे लिंग एक॥ जया नाम त्र्यंबक॥ गौतमी उगम जेथें॥ वाहे मंगलदायक॥ दर्शनें स्नानमात्रें॥ पुण्य पावन लोक॥ तैसाच घृष्णीश्वर॥ शेवाळें रमणीक॥ जय०॥ ४॥ भीमा उगम जेथें॥ भीमाशंकर तेथें॥डाकिनी स्नान करिती॥ लिंग ह्मणती तयातें॥ अगणित पुण्य जोडे॥ चालतांची तेणें पंथें॥ दक्षिणे रामेश्वर॥ ज्योतिर्लिंग ह्म-

णती त्यातें ॥ जय० ॥ ५ ॥ आंवढ्या नागनाथ ॥ देव आपण नांदत ॥ भक्तजन कुटुंबीया ॥ भुक्ति मुक्तिदायक ॥ प्रत्यक्ष लिंग जेथें ॥ परळी वैजनाथ ॥ हरिहर तीर्थ तेथें ॥ जन होय कृतार्थ ॥ जय० जय० ॥ ॥ ६ ॥ शैल श्रीपर्वत ॥ लिंगरूप समस्त ॥ सभोंवती नीळगंगा ॥ माजी श्रीमलिनाथ ॥ भूमिकैलास दूजें॥ जना साक्ष दावीत ॥ साठिवरुषें वाट पाहे ॥ कृपाळु उमाकांत ॥ जय देवानी० ॥ ७ ॥ धन्य हो काशिपूरीं ॥ मणिकर्णिका तीरीं ॥ विश्वेश्वर लिंग जेथें ॥ जीवमात्रा उद्धरी ॥ तारक ब्रह्ममंत्र ॥ जपे कर्णविवरीं ॥ जय देवा नीळकंठा० ॥८॥ येऊनी संसारा ॥ माजी ज्योतिर्लिंगें बारा ॥ एक तरी दृष्टि पाहे ॥ अन्यथा भूमिभारा ॥ विश्वेश्वर विश्वनाथ ॥ भाव भक्ति निर्धारा॥ नामया शिवदास ॥ ध्याय परात्परास ॥ जय दे० ॥९॥

आरती २.

वृषवाहन वृंदारक वृंदकवर शंभो ॥ वारण सदजिनवासो वारिद गळशंभो ॥ वासववंदित अंभो विकसित पद शंभो ॥ वाक्पतिवर्णित वैभव विश्वेश्वर शंभो ॥ १ ॥ जयदेव जयदेव शिव शंकर शंभो ॥ श्यामल शरण परात्पर शशिशेखर शंभो ॥ जयदेव ॥ ॥ ध्रु० ॥ भोगि विभूषण भासुर भावन भुजशंभो ॥ भूसुर भूरिभयापह भगवन् भय शंभो ॥ भैरव भावित कुंभोदर गणभर शंभो ॥ भासित भूत भयंकर भिक्षाटण शंभो ॥ जयदेव० ॥ २ ॥ गंगाधर गिरिजावर गुह्यक गुण शंभो ॥ गाढ करासित गुणाजित गायन गळ शंभो॥ गीता गोरस भुग् भो गणपति गुरु शंभो ॥ गंभिर गोपति गर्जन गोपालक शंभो ॥ जयदेव ॥ ३ ॥

अंक दुसरा समाप्त.

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

स्थळः— नामदेवाचें घर.

(गोणाई, राजाई व जनाबाई गोदडी शिवीत बसल्या आहेत.)

गोणाई– मेली ही गोदडी शिवतां शिवतां बोटें अगदीं दुखून येतात. याला ठिगळें लावावींत तरी किती!

राजाई– एक कांबळा–पासोडी नाऱ्याच्या वेळच्या बाळंतपणांत मला माझ्या बापानें घेऊन दिली होती. ती मला दहा वर्षं गेली. महाद्या, गोंद्या, विठ्या यांच्या वेळच्या बाळंतपणांत एक–कांबळा पासोडी घेऊन द्या ह्मणून दातांच्या कण्या केल्या, पण कांहीं मिळाली नाहीं. आतां गोदडी रगटीं काय मिळतील तीं मिळतील. मीं आपलें बोलायचें सोडून दिलें आहे. आतां हात दुखले, बोटें दुखलीं ह्मणून करावयाचें काय? मी आणखी जनाबाई आह्मी दोघीजणी शिवतों, तुह्मी पाहिजे तर विसावा घ्या. ह्मातारपणीं तुह्माला दोरा भरावयाला चांगलेंसें दिसत नाहीं. तशांतून ही गोदडी फारच वाईट आहे, कारण ठिगळेंहि धड धड नाहींत मेलीं.

जनाबाई– चिरगुटें, चिंध्या जोडून जोडून एक गोदडी करायची, ती नित्य टिपीत बसायचें. हें जसें अशास्वत तसाच संसार अशास्वत आहे. गोदडीला जशीं नानाप्रकारचीं ठिगळें लावावीं लागतात, तशीच संसाराची भर करण्याकरितां हजारों वस्तूंचा संग्रह करावा लागतो.

राजाबाई– जने, पुरे झालें तुझें ब्रह्मज्ञान. याचा आह्मांला कंटाळा आला. सासूबाई, तुह्मी चुलीपुढचें काढून ठेवा. स्वयं-

पाकाला काय करायचें. आतां मुलें रावळांतून येतील. मुली चंद्रभागेवरून येतील. खाण्याची सोय करा. मग साऱ्या गोष्टी.

गोणाई– काय बाई, मी तरी काय करूं? आह्मी दोघें म्हातारी माणसें, तुह्मी नवरा बायको, चार मुलगे, चार सुना, लिंबाई आणि जनाई, चवदा माणसें. दोन्ही सांज खायचीं. नाम्याला— तुझ्या नवऱ्याला उद्योग करायला नको, धंदा नको. पोरें तर लहानच आहेत. सुना बिचाऱ्या लोकांच्या घरच्या.

राजाई– तुह्मीं चवदा माणसें मोजलींत आणखी पांडुरंगाचा नैवेद्य नाहीं धरिलात? पांडुरंगाचें भोजन झाल्याशिवाय तोंडांत घास घालीत नाहींत. विसरलांत वाटतें? आठव्या वर्षीं पांडुरंगाला भोजन घालण्यास आरंभ केला. आज या गोष्टीला चाळीस वर्षें होत आलीं. रोज नैवेद्य चाललाच आहे.

जनाबाई– देवांनीं खाल्लेलें बाहेर काढूं नये. देव देणार देव खाणार. आपलें काय गेलें?

गोणाई– देव खाणार! खाल्ल्याशिवाय देवानें कोणाला कांहीं तरी दिलें आहे काय सांग. सुदामाचे पोहे भिकाऱ्यासारखे खाल्ले, मग सोन्याची नगरी दिली. द्रौपदीचें भाजीचें पान खाल्लें, मग अन्नाचे पर्वत. विदुराच्या कण्या खाल्ल्या त्याला कांहींच नाहीं. नुसतें अन्न खाऊन रहातो तरी बरें, पण विश्वरूपावरून माझी कल्पना धांवते कीं, रावण खा, कुंभकर्ण खा, भीष्म खा, द्रोण खा, कौरव खा, पांडव खा, वाघ, अस्वलें, चित्ते, कोंबडीं, बकरीं, उंदीर, घुशी, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, याच्याच तोंडांत जातात. काय मेली समसमीत भूक! कधीं अजीर्ण, कर्पट ढेकर, कांहीं नाहीं! सगळें जग एकदा खाऊन टाक म्हणावें. आह्मांला घरांत खायाला नसलें तरी चालेल, पण दुपारीं नैवेद्याला ताट भरून तयार असलें पाहिजे.

जनाबाई– काय आपण देवाला देतों बरें! भाजीभाकरी देव प्रीतीनें खातो! नामदेवबुवाच्या भक्तीला देव भुलला, दुसरें

काय ? देवासाठीं राजे लोक यज्ञ करतात, अवदानें देतात; पण देव कोठें जातो बरें ? तुमच्या उशापायथ्याशीं देव लोळतो आहे. देवाची तुह्मांला किंमत नाहीं.

राजाई– आतां असें करून उपयोग नाहीं. मी जातें रुक्माबाईकडे. आजपावेतों माझ्या घरीं तिच्या नवऱ्यानें गिळलें त्याचे पैसे मागतें. एक याद तयार करा. दरमहा पांच रुपये जरी धरले तरी चाळीस वर्षांचें काय होतें बरें सासूबाई ?

गोणाई– मेली हिशेबाचीच तर पंचाईत. दरमहा पांच ह्मटले तर उभ्या वर्षाचे किती झाले ? दोन महिन्यांचे दहा आणखी चार महिन्यांचे वीस, आणखी आठ महिन्यांचे चाळीस, पुनः चार महिन्यांचे वीस. जने चाळीस आणखी वीस किती झाले ?

जनाबाई– मला नाहीं हिशेब येत. देवाची खाल्ली खाद घ्यायची ह्मणजे मुलगी विकून पोट भरल्यासारखें. हजारों वर्षं लोहपिष्ट भक्षण करून तप करितात, त्यांच्या घरीं देव जेवीत नाहीं, तो तुमच्या नामदेवाच्या घरीं जेवतो. मला नाहीं हिशेब येत.

राजाई– नको सांगूं. चाळीस खडे मांडा आणखी वीस खडे. मीं हिशेब करून ठेविला आहे. साठ खडे होतात. साठ रुपये झाले.

गोणाई– साठ साठ खड्यांचे चाळीस ढीग कर. इतके रुपये झाले. चांगले दोन अडीच हजार रुपये होतील. टाक ह्मणावें आपल्या नवऱ्याची खाल्ली खाद. नाहीं तर उद्यां नैवेद्य मागूं नको.

राजाई– कांहीं घाला खायला, शिळें घाला, साजूक घाला, विटलेलें घाला, चांगलें घाला, वाईट घाला, ताटभर घाला, नाहीं तर भरभक्कम परातभर घाला, आपलें गट्ट ! आज घरांत मुळीं दाणेच नाहींत. तुला नैवेद्य नाहीं, आणि आह्मांलाही नाहीं. बसूं दोघे उपाशी.

गोणाई– आपण उपास काढले तरी हरकत नाहीं. पण लोकांच्या मुली तर उपाशी ठेवून चालायचें नाहींना ? लाडाई, गोडाई, येसाई आणखी साकराई— नाऱ्या, महाद्या, गोंद्या आणि

विठ्या यांच्या बायकांना तर खायला घालाल ? मी जातें आतां देवळांत, आणखी देवाशीं भांडण करून त्याला घरीं घेऊन येतें. कसा देव त्याला सोडीत नाहीं तें पहातें (जाते.)

राजाई– वेड लागलेंग बाई वेड लागलें. जनांत हंसें झालें. आपला मुलगा पांढरा परीस होता, मग लोकाची गाय कशाला गोवलीत ? तुमच्या घरीं पीठ आहे तर मीठ नाहीं. सरपण आहे तर तेल नाहीं. काय मेला संसार ! फाटक्या लुगड्याला सोडवण आहे काय ? पोटभर अन्न कधीं खायला मिळत नाहीं. तुमच्या घरीं मला गुंजेचा विटाळ आहे काय ? नाकांतला कांटा कांहीं तुमच्या घरीं माझा निघाला नाहीं. आजपर्यंत मी आपली मर्यादा सोडून बोललें नाहीं. पण आतां लाज, भीड सर्व बाजूला ठेवून बोलतें हो. रागावूं नका. (केशवशेट वाणी प्रवेश करतो.) कोणी तरी पाहुणा आला वाटतें ? आतां काय करूं तरी काय ? ह्याच्यापुढें काय घालूं तरी ! आतां मला मरण येईल तर सोनें होईल. फजितींग बाई फजिती !

केशवशेट– (एकीकडे) हेंच नामदेवाचें घर. हें तुळशीवृंदावन, हें सभोंवार तुळशीचें बन, ह्या दिव्य पताका, खांबाला कान लावून पहा–विठ्ठल विठ्ठल ध्वनि ऐकूं येतो. या घरांत येणाऱ्या चिमण्या चिव चिव शब्द करण्याच्या ऐवजीं विठ्ठल विठ्ठल शब्द करतात. नामदेवाच्या घरचीं सुपें टोपलीं भांडींकुंडीं उखळें आणखी जातीं यांच्यांतून सुद्धां विठ्ठल नामाचा ध्वनि निघेल. पण हा प्रभाव नामदेवाचा कीं जनाबाईचा ? (उघड) घरांत आहे का कोणी ? पाहुणे आलों आहों नामदेवाच्या घरीं.

राजाई– घरधनी घरीं नाहींत. आल्या वाटेनें परत जा. (जनाबाईस उद्देशून) पाहुण्यांनीं मेल्यांनीं जीव घेतला. टाळ आणखी वीणें घेऊन नेहमीं हे वारकरी येणार. सारे रात्र अभंगांची ओरडाओरड. नाचून नाचून साऱ्या भुया उखणतात. घराचे खांब, वासे, तुळया खिळखिळ्या झाल्या. लाज नाहीं.

अभिमान नाहीं. भेदाभेद नाहीं. घरधनी सांगतात, संतांना भोजन घालीत जा. घरांत तिळभर अन्न नाहीं.

केशवशेट– आपण का नामदेवबुवांचें कुटुंब वाटतें ?

राजाई– तुम्ही कुठले राहणार ? तुमचें नांव काय ?

केशवशेट– माझें नांव केशवशेट. नामदेवाचें आमच्यावर फार प्रेम ! तो माझा जिवलग मित्र. त्याच्या भेटीसाठीं आलों. तुमच्या घरीं पैशाची जरा अडचण झाली म्हणून ऐकलें. नामदेवाकरितां गोणीभर होन आणले आहेत.

राजाई– याहो, या. बसा. मी पाट आणून देतें. (जाते.)

जनाबाई–(एकीकडे) आधीं निष्ठुर भाषण केलें. म्हणाली आल्या वाटेनें परत जा. आतां होनाची गोणी पाहिल्याबरोबर तोंडाला पाणी सुटलें.

केशवशेट–कशी मौज आहे, रिकाम्या हातानें कोठें जाऊं नये. आहेर घेतल्याशिवाय कोणाच्या लग्नाला जाऊं नये, द्रव्य घेतल्याशिवाय राजदर्शनाला जाऊं नये. बहिणीच्या घरीं अथवा प्रत्यक्ष आपल्या मुलीच्या घरीं–रिकाम्या हातानें जाऊं नये. विपत् कालीं सोयऱ्याधायऱ्यांच्या घरीं जाऊं नये.

जनाबाई– मी तर म्हणतें देवाच्या दर्शनाला सुद्धां रिकाम्या हातानें जाऊं नये. मूठभर तांदूळ नाहींतर बाजरी कांहीं तरी नेलें पाहिजे. लोक जसे आशाबद्ध तसाच देवहि पण आशाबद्ध. नामदेव मात्र निरापेक्ष भजन करतात. बाकी आईबाप बायको यांना अपेक्षा आहे. (राजाई पाट घेऊन येते.)

केशवशेट–म्हटलें आतां आमच्या नामदेवाला छळूं नका आणलेलें द्रव्य घरांत नेऊन रांजणांत सांठवून ठेवा. हें संपलें म्हणजे मला पुनः कळवा. पुनः गोणी भरून आणून देईन. नामदेवाला माझा निरोप सांगा कीं तुझा मित्र आला होता.

राजाई–म्हटलें मघाशीं मी तुम्हाला निष्ठुर बोललें त्याचा

राग मानूं नका. तुमची आणखी इकडची मैत्री आहे, मला काय माहीत ? आतां भोजन करून जा. उपाशी जाऊं नका.

केशवशेट–पण आतां नामदेव घरीं नाहीं. नामदेवावांचून मी जेवीत नाहीं. तुह्मी बोलल्याचा मला मुळींच राग नाहीं. बरें झालें तुमची सासू घरांत नाहीं. नाहींतर तिनें मला कोठला पाहुणा आला आहे, असें ह्मणून दंडाला धरून बाहेर काढलें असतें. तूं तर नुसतीच ह्मणालीस कीं, आल्या वाटेनें परत जा.

राजाई–जनाबाई, घरधन्यांनीं पांडुरंगाची सेवा केली. मला वाटतें देव आतां प्रसन्न झाला. एक ओंजळभर होन घेऊन मी आतां बाजारांत जातें. वाण्याच्या पदरीं घालतें. दाळ तांदूळ तूप साखर सगळें घेऊन येतें. यावेळीं सासुबाई बाहेर गेल्या आहेत. बहुतेक धान्य आणण्यास गेल्या असतील. घरधन्याला सुद्धां घेऊन येतील. महाराज बसा येथें पाटावर. जनाबाई, घरीं सांभाळ हो. (जाते.)

केशवशेट–एका होनाचे तीन साडेतीन रुपये येतात हें या बाईला कांहीं माहीत नाहीं. ओंजळभर होन देऊन आतां ही बाजारांतून शिधा आणणार. असो. जनाबाई, तुह्मी मला नामदेवाचें चरित्र सांगाल काय ? तें ऐकण्याची मला मोठी गोडी वाटते; कारण तें फार प्रेमळ आहे.

जनाबाई–नामदेव कार्तिक शुद्ध एकादशीला रविवारीं दामाशेटीस चंद्रभागेंत शिंपल्यांत सांपडले. हे सनत्कुमाराचा अवतार, असें जाणून आकाशांतून इंद्र कुबेर, वरुण ब्रह्मदेव; शंकर, विष्णु यांनीं पुष्पवृष्टि केली असें माझे वडील मला सांगत होते. ते ह्मणाले, प्रत्येक देवाच्या अवतारीं नामदेव आहेतच. नामदेव आणखी देव एकच आहेत. हिरण्यकशिपुचे वेळीं प्रल्हाद नामदेवच होते. रामावतारीं अंगद तेच होते. कृष्णावतारीं उद्धव, सर्व यादवांत श्रेष्ठ, ज्याला भगवंतानीं भागवतांत अनेक ठिकाणीं उपदेश केला, आणि आपण मथुरेस आल्यावर ज्याला गोकुळवासी

जनांचें सांतवन करावयास पाठविलें, ते नामदेवच होते. हे नामाचा अवतार आहेत ह्मणून यांचें नांव नामदेव ठेवलें. यांचें वय दोन वर्षांचें झाल्याबरोबर ते श्रीविठ्ठल या नांवाचा उच्चार करूं लागले. त्यांना पांडुरंगानें ऐशीं वर्षें आयुष्य दिलें असून ते शंभर कोट अभंग करणार आहेत. पांचव्या वर्षीं त्यांना शाळेंत घातलें. गुरुजीनें त्यांना ओ नामा पाटीवर घालून दिला त्याच्या-कडे त्यांनीं लक्ष मुळींच न देतां " श्रीविठ्ठल श्रीविठ्ठल " असा उच्चार करावा. पुढें गुरुजी कांहीं कामाकरितां बाहेर गेले ही संधि साधून नामदेवानीं बाकीच्या सर्व मुलांस विठ्ठलनामाचें भजन करावयास लावलें.

केशवशेट–खरोखरच नामदेव प्रल्हादाचा अवतार. त्यानें तरी असेंच केलें होतें. बरें पुढें काय झालें जनाबाई ?

जनाबाई–पुढें नामदेव आठ वर्षांचे असतां एक दिवस दामाशेट हाळीला गेल्यावर नामदेव नैवेद्य घेऊन रावळांत गेले. देवाला म्हणाले, नैवेद्य खा. आटपा लौकर. आज कांहीं बाबा आले नाहींत, म्हणून रागवूं नका. माझी आई घरीं वाट पहात आहे. याप्रमाणें देवाचे पुष्कळ आर्जव केले, पण देव कांहीं खाईना. नामदेव रडूं लागले. सिंहासनाला धडक घेऊन प्राण देऊं लागले. मग पांडुरंगानें नामदेवाला हृदयाशीं घट्ट धरून त्याचें मुख कुरवाळलें. म्हणाले. " खातों बाबा. पण कोणाजवळ बोलूं नको. " असें ह्मणून नैवेद्य खाऊन टाकला. अजूनपावेतों तसेंच चाललें आहे.

केशवशेट– फार फार गोड चरित्र ! मला संतांचीं चरित्रें ऐकण्याचा भारी नाद आहे. जनाबाई तुमचें चरित्र थोडेसें मला सांगाल काय ?

जनाबाई– महाराज, मी गंगाखेडच्या दमाजीची मुलगी. माझ्या आईचें नांव करूंडबाई. माझ्या बापाची पन्नास साठ वर्षांची वारी झाली. देव त्याला प्रसन्न झाले. त्यांनीं स्वप्नांत

येऊन सांगितलें कीं, दमाजी, तुझ्या पोटीं जनी ह्मणून मुलगी होईल, तिला नामदेवाची सेवा करण्यास राहूंदे. ती तुझ्या कुळाचा उद्धार करील. ती कृतयुगांत पद्मिनी, त्रेतायुगांत मंथरा, द्वापारांत कुब्जा आणि आतां जनी नामदेवाची दासी असें आहे.

केशवशेट– जनाबाई, तूं मोठी भाग्यवान् आहेस ! नामदेवाची सेवा तुझ्या हातून घडत आहे. नामदेव महा वैष्णव आहे. गोणाई आणि राजाई त्याला फार छळतात. त्या मोठ्या द्राष्ट आहेत. देवसुद्धां त्यांना भितो. पण तें असो. मला फार भूक लागली आहे. कांहीं तरी खायला दे.

जनाबाई– काय देऊं बरें ? आमच्या घरांत कांहीं नाहीं. तुह्मी थोडे थांबाना ? आतां राजाबाई बाजारांतून सामान आणील. स्वयंपाक करील. मग नामदेवाबरोबर तुह्मी जेवा.

केशवशेट– नको. नामदेव घरीं येण्याच्या अगोदर मला गेलें पाहिजे. कांहीं तरी बघ शिळें पाकें असेल. मला कसलेंहि चालतें. माझी जीभ माझ्या स्वाधीन आहे.

जनाबाई– माझ्या टोपल्यांत वाळलेले शिळ्या भाकरीचे तुकडे आहेत.

केशवशेट– फार उत्तम ! तुझ्या हातचा तो प्रसाद. दे दे लवकर. मला उशीर झाला. (पदरांत भाकरी घेतो.) ती पहा गोणाई नामदेवाच्या दंडाला धरून त्याला इकडे आणीत आहे. जातों मी आतां. आतां येथें उभें राहण्याची सोय नाहीं.

जनाबाई– (पायां पडते) महाराज, तुह्मी कोण हें मीं जाणलें. तुह्मी जाऊं नका.

केशवशेट– वेडी आहेस. गोणाई मला मारील. जाऊं दे मला. (जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ- नामदेवाच्या घरापुढचें पटांगण.

(नामदेव अभंग ह्मणत आहे,गोणाईनें त्याच्या दंडास धरिलें आहे.)

नामदेव-

अभंग.

तूं माझी माउली मी तुझा तान्हा ॥ पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ॥ १ ॥ तूं माझी गाऊली मी तुझें वासरूं ॥ नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥ २ ॥ तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज ॥ चारा घाली मज पांडुरंगे ॥ ३ ॥ तूं माझी हरिणी मी तुझें पाडस ॥ नको तोडूं वास पांडुरंगे ॥ ४॥ कासवीची दृष्टि सदा बाळावरी ॥ तैसी दया करी पांडुरंगे ॥ ५ ॥ नामा ह्मणे विठो भक्ताच्या वल्लभा ॥ मागें पुढें उभा सांभाळीत ॥ ६ ॥

गोणाई- तुला मीं लहानाचा मोठा केला, तुझे कायाकष्ट केले, तुला खाऊं पिऊं घातला, आणखी आतां त्याच्या नादीं लागलास काय? त्याचें काय जातें? ऐताच झाला चाकर. कुणबी जसा कष्ट करून धान्य पिकवितो आणि दुष्ट सावकार ऐताच त्याचा धनी होतो, तशांतला प्रकार झाला. त्यानें कुणाला काय दिलें आहे? रावण बळवान् पाहून त्याच्या भावाला- बिभी-षणाला- फितविला. मग त्याला लंका दान दिली. बळीला पाताळीं दडपला. शुक्राचार्याचा विनाकारण डोळा फोडला. त्याच्या अवगुणांचें वर्णन करतां करतां शेष दमला. त्याच्या दोन जिभा झाल्या. मी रावळांत आलें तसा तुला आपल्या पाठीशीं घातला, आणखी मला ह्मणतो, 'तुझ्या मनांत असेल तर नाम्याला घेऊन जा. तो माझ्या पायांला बळेंच जडला आहे. तो जा-त्याच विदेही आहे, त्याला मी काय करूं? आमच्यावर निमित्त नको. झाडावर फळ पिकलें तें आपोआप गळून पडलें. नामदेवाचें

माझ्यावर विनाकारण निमित्त आलें आहे. मी जन्म आणि मृत्यु विरहित, गुणातीत, केवळ नामदेवाच्या आवडीकरितां सगुण झालों.

नामदेव- आई, जेव्हां पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश नव्हतीं, जेव्हां सर्वत्र निराकार होतें, तेव्हांपासून मी पांडुरंगाच्या संगतीला आहें. त्याची माझी ताडातोड कां करतेस ! माझें कोणी नाहीं. ह्मणून मीं त्याचे चरण घट्ट धरले आहेत. हेंच माझें ज्ञान. हाच माझा गुरुमंत्र. चरणाची सेवा हेंच माझें व्रत. हेंच माझें तप. माझें क्रियाकर्म, धर्माधर्म हीच माझी पूजा, आणि हेंच माझें स्तवन.

गोणाई-पुरे झाली तुझी बडबड. तुला खायची आठवण आहे काय ? मघाशीं जेव्हां मी त्याला टाकून बोललें, तेव्हां निलाजऱ्यासारखा हंसूं लागला. मला ह्मणतो, " गोणाई, तूं मोठी भाग्यवान् आहेस. ब्रह्मदेवाच्या पोटीं जसा महावैष्णव नारद् निपजला, दैत्यवंशांत कयाढूचे पोटीं जसा प्ऱ्हाद् झाला अथवा उत्तानचरण राजाची बायको जी सुनीति हिचे पोटीं जसा ध्रुवबाळ, तसा नामदेव तुझ्या पोटीं आला आहे. शिंप्याचें कूळ त्यानें धन्य केलें. " असें मला हरवऱ्याचे झाडावर चढविलें. पण तुला माझ्या स्वाधीन करीना. त्याला वाटलें मी कच्ची आहें. त्याच्या स्तुतीला भुलून परत येईन. मीं लागलींच सत्यभामा राही रुक्मिणि ह्यांच्यापुढें गाऱ्हाणीं दिलीं. सांगितलें, याच्यासारखा अगोचर कोणी नाहीं. आजपावेतों मीं याची भीड धरली. याचें दर्शन झाल्याबरोबर संसाराची हानि करी तुह्मी सगळ्याजणी मिळून याला फजीत करा. नाहींतर सोकपंढरी गिळून टाकीन. असें जेव्हां मी बोललें, तेव्हां तुणें माझ्या स्वाधीन केला. आतां तूं प्रपंच करणार कीं नाहीं ? ना

नामदेव- आपण दिवसा जीं कामें करतों तीं दिवसावरोवर लयास जातात. स्वप्नांतल्या गोष्टी स्वप्नावरोबर लयाला जातात गाढ निद्रेंत दिवसाचीं कामें आणि स्वप्नें दोहींचाहि विसर; ह्मणजे

एक तरी अवस्था खरी आहे का? कसला प्रपंच घेऊन बसलीस? प्रपंच सृष्टीच्या पूर्वीही नव्हता आणि प्रळय कालानंतर उरणार नाहीं. मध्येंच जो भास होत आहे तो मिथ्या भ्रम. प्रपंचाचें अवडंबर म्हणजे संध्याकाळीं आकाशांत दिसणारें गंधर्वनगर. बापाच्या देखत मुलगा मरतो, मुलगा जिवंत असला तर मुलाचें कसें होईल म्हणून बाप झुरणीस लागतो; पुढें दोघेही मरतात. क्रिया करावयास कोणी नाहीं. सागरांत लाटा उसळतात, लागलींच नाहींशा होतात. तसा हा प्रपंच. ज्याच्यापासून प्रपंच झाला, आणखी ज्याच्यांत तो सामावला, त्याचे पाय धरले आहेत. ते कांहीं मी सोडणार नाहीं. अहो, मुळीं जन्मालाच आलें नाहीं तें मुल काळें का गोरें, काय सांगा! मृगजळ खोल आहे कीं उथळ आहे, गोड आहे कीं खारट आहे काय सांगा? अवसेच्या रात्रीं अंधळे अंधार जोखून घेण्याकरतां आले. त्यांच्या हातीं काय सांपडणार? भिंतीवर नानाप्रकारचीं चित्रें काढलीं. पाण्याचा लोट, आगीचा लोळ, अंत्यज काढला, ब्राह्मण काढला, वाघ काढला, सिंह काढला, पण काय! सगळी भिंतच! तसा प्रपंच ब्रह्मापासून निराळा भासतो. तो मिथ्या. ब्रह्म सदोदीत परिपूर्ण. तें विटेवर उभें आहे. स्त्री, पुत्र, विषयांचें ध्यान सोडून, मान धन चेष्टा प्रतिष्ठा सोडून, कुळाचें उंचनीचपण सोडून, जातीचा अभिमान सोडून, या माझ्या पांडुरंगाला शरण जा. मात्र अभिमानरहित जा. नाहींतर परटानें कपडे धुतलेलें पाणी जसें पातां[illegible]णी पिणार नाहीं, तसा देव तुमच्या अशुद्ध भक्तीचा अंगीकार त्याच्य[illegible]र नाहीं. (दामाशेट प्रवेश करतो.)

जिभ[illegible]**ामाशेट**— काय देवानें तुला सांगितलें, प्रपंच करूं नको? घात[illegible]चांत राहून परमार्थ होत नाहीं का? तूं आपला रात्रंदिवस घेर[illegible]ळांत पडून राहिलेला! तुला जेवण नको खाण नको. मागची त्[illegible]हीं शुद्धि आहे काय? देवाला पुत्र मागितला, त्यानें हें असलें न[illegible]त्न दिलें. कधीं उदीम नाहीं. व्यापार नाहीं. कधीं हाळीला जाणें

नाहीं. कांहीं नाहींहो कांहीं नाहीं. शिंप्याचीं पोरें ह्मटलीं ह्मणजे कसलीं चटकदार असतात! कापड घेततां घेततां लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकून सहज कापड लांबवितात! परवां त्या मांढऱ्याच्या घरीं विठोबाला भरजरीचा अंगरखा केला, तर त्या राम्यानें एका टोपड्याचें कापड लांबवून बाहेर नेऊन दहा रुपयांला विकलें!

नामदेव– मग मी आतां चोऱ्या करूं वाटतें?

गोणाई– तुला कांहीं आह्मीं चोऱ्या करायास सांगत नाहीं. पण लोकांचीं मुलें संसार कशीं करतात, हें तुला त्यांनीं सांगितलें. तुला कशी अकाबाई आली? तुला कसें त्या भुतानें घेरलें? साऱ्या जगांत आमची फजिती चालली आहे. तुला पहावेत तरी कशी? सोयऱ्यांत धायऱ्यांत सगळ्या गांवांत आमचें हंसूं झालें. हा विठोबा मैंद आहे. गळेकापू आहे. याच्या संगतीला जे लागले, त्यांच्या संसाराचें वाटोळें झालें. भोपळा हातीं घ्यावा लागला. (रडत रडत नामदेवाची हनुवटी धरून) आतां रावळांत जात जाऊं नको बरें का? शहाणा आहे माझा बाबा!

दामाशेट– अरे कांहीं संसाराची सोय पहाशील का नाहीं? बाजारहाटाला जाशील का नाहीं! मी आतां वृद्ध झालों, माझ्यानें आतां दगदग होत नाहीं. वृद्धापकाळ ह्मणजे मरण-काळाचें प्रस्थान. सर्वांग माझें कांपतें. ही मान किती लटलट कांपते! मी ह्मणतों, हा मृत्यूचा डोल्हाराच आहे. दांत पडून जाऊन मृत्यूनें आपली फौज नेण्याकरितां सपाट रस्ता केला आहे. खोकल्याची उभळ अशी कांहीं जोरानें येते कीं, शेजारी ह्मणतात, आतां हा ह्मातारा लवकर मरता तरी बरें. याच्या खोकल्यानें आमचीं पोरें झोंपेतून दचकून जागीं होतात. पोरें वेडावणें दाखवितात. रस्त्यांतील कुत्रीं अंगावर भुंकतात. तो पहा बागुलबुवा आला असें शहाणे शहाणे आपल्या मुलांना बोटानें दाखवितात. कुटुंबाचा चरितार्थ चालविणें तुझें काम आहे. शंभर नवस करून देवाला मुलगा मागितला. देव पावला! तुला किती शिकवावें?

नामदेव– आई, बाबा, मी कांहीं वाईट काम करतों आहें का? या विठलनामाचा महिमा ब्रम्हादिक जाणत नाहींत, म्हणून तेसुद्धां कर्मे करणाऱ्यांत येतात. ब्राम्हण आचमन करितांच केशव नारायण नामाचा उच्चार करतात. लग्नाचे वेळीं सावधान म्हटल्यावर लक्ष्मिनारायणाचें चिंतन करा म्हणून सांगतात. मेलेल्या माणसाला नदीवर नेतांना शेवटीं राम बोलो भाई राम उच्चार करतात. पितृश्राद्ध झाल्याबरोबर शेवटीं एको विष्णु म्हणतात. नामापेक्षां अधिक सार कशांत नाहीं असें शंकर गिरिजेस सांगतात. वेदाध्ययन केलें तर वैदिक म्हणतील. पुराण सांगितलें तर पुराणिक म्हणतील. गायन केलें तर गवई म्हणतील. कर्ममार्गानें कर्मठ म्हणतील. यज्ञ केला तर याज्ञिक म्हणतील. तीर्थें केलीं तर कापडी म्हणतील, पण माझ्या पांडुरंगाचें नाम घेतलें, तर महावैष्णव म्हणतील, नामधारक म्हणतील.

गोणाई- टाळकुट्या म्हणतील! तूं कुटतोस कीं नाहीं रोज टाळ? टाळ कुटायला लागलास म्हणजे तुला पोटापाण्याची, घरादाराची कांहीं शुद्धि असते का? तें असो; पण उजाडलें केव्हां मावळलें केव्हां याची तरी शुद्धि असते का? तोंड धूत नाहींस. शौचाला जात नाहींस. देहाची शुद्धीच नाहीं. उघडी समाधि भोगीत आहेस. कधीं दमत नाहींस. कधीं तुला झोंप येत नाहीं पांडुरंगाला उलट सांगतोस- निजा निजा मायबाप. तुह्मी फार दमलेत. फुलांची सेज सुकून चालली. इंद्रादिक देवांना ब्रह्मादिक देवांना घरीं जाण्याला आज्ञा द्यावी. आपण रुक्माईसह निद्रा करा. आणखी मी हातीं टाळ वीणा घेऊन स्वामीचरणांजवळ भजन करीत उभा रहातों. तो कांहीं तुला महालांतून हांकून देत नाहीं कांहीं नाहीं. राजे लोकांजवळ खुशमस्करे असतात—दारावर पहारेकरी असतात–तशांतला तूं निलाजरा. नवराबायको एके ठिकाणीं असल्यावर तूं कशालारे तेथें?

नामदेव– मग नवराबायको एका ठिकाणीं असल्यावर त्यांचें

लडिवाळ बाळ त्यांच्याजवळच असतें. त्याला कांहीं हांकून देत नाहींत. देव तर मला ह्मणतात, “ नामा माझें पोटीचें बाळ. ” आणि मी तर असें बोलतों—ज्या माउलीच्या तोंडांत निरंतर विठ्ठल नाम आहे, तिच्या पोटीं विठ्ठल गर्भवासी आहे असेंच समजा. ज्याच्या घरीं पंढरीची वारी, त्याच्या घरीं विठ्ठल बाळलीलेनें खेळत आहे. माझी ही प्रतिज्ञा जर असत्य झाली तर कडकडीत तापलेल्या तेलांतला तांब्याचा तुकडा मी आपल्या हातानेंच तर काय पण जिभेनें बाहेर काढीन, हीच माझी प्रतिज्ञा. अग्नि माझें काय करणार ! पांडवांचे हृदयांत श्रीकृष्णनामाचा जप, ह्मणून त्यांस अग्नि जाळूं शकला नाहीं. अग्नीच्यानें गाई-गोपाळ जाळवले नाहींत. हनुमंत जळाला नाहीं. प्ऱ्हाद जळाला नाहीं. सीता जळाली नाहीं. अग्नीनें सर्व लंका जाळिली, परंतु बिभीषणाचें घर अग्नीला जाळतां आलें नाहीं. तुम्ही रात्रंदिवस विठ्ठलनामानें टाहो फोडला तर भवबंध हा संसार काय करणार आहे?

अभंग.

विठोबाचा धर्म जागो ॥ त्याचे चरणीं लक्ष लागोगा ॥ १ ॥ गण आणि गोत्रज सर्व हंसताती मजगा ॥ गेलें याचें माणूसपण येणें सांडियेली लाजगा ॥ विनविती शिंपी नामा संत चरणींचा रजगा ॥ ३ ॥

(नामदेवास दामाशेट व गोणाई दंडास धरून घरांत नेतात.)

प्रवेश तिसरा.

स्थळः– नामदेवाचें घर.

(राजाई थाटमाट करून बसली आहे.)

राजाई– (एकीकडे) दिवाळीच्या दिवशीं देव म्हणाले, तुम्ही जर माझ्या जागेवर उभे राहत असाल, तर मी तुमच्या घरीं नहायाला आणि फराळाला येतों. यजमानानीं कबूल केलें.

देवांनीं वजावलें कीं, कबूल करतां पण माझ्यासारखें नासाग्रीं दृष्टि देऊन निश्चल उभें राहिलें पाहिजे. डोळ्यांची पापणीसुद्धां हलतां कामा नये. भक्तमंडळी पायांवर धडाधडा कपाळें आपट-तील. पाय ओढतील. पंचामृतपूजा करावयास लागले तर शंभर शंभर घागरी दूधदहीं, घागरभर मध, खंडीभर साखर, घडाभर तूप अंगावर ओततील. अंग चिकट होईल, अंगाला मुंग्या ला-गतील. तुम्ही मोठ्यानें ओरडाल. तेहतीस कोटी देव, इंद्र, चंद्र, महेंद्र, वरुण, कुबेर दर्शनाला येतील. मध्येंच कोणीं ओळखलें तर फजितीला पारावार नाहीं; या सर्व गोष्टी यजमानांनीं कबूल केल्या. विठोबासारखें कटेवर कर ठेऊन विटेवर उभे राहिले. देव आमच्या घरीं आले, चंदनाचे पाटावर बसवून देवाला नाहूं घातलें. सासूबाईंनीं माथ्यावरचा पदर काढून देवाचें अंग पुसलें. देवांनीं भोजन केलें. जनाबाईनें विडे दिले. सर्व चांगलें झालें. तेहतीस कोटी देव, अष्ट कोटी भैरव, सर्व तीर्थें विठोबा समजून यजमानांच्याच पायां पडलीं. चारी वेदांनीं येऊन दर्शन घेतलें. सगळ्यांनीं येऊन आरत्या कुरवंड्या केल्या. नारदतुंबरादिकांनीं गायन केलें. रंभा येऊन नाचून गेल्या. पण कोणीं म्हणून ओळ-खलें नाहीं. सगळ्यांनाच मेली कशी भुरळ पडली कोण जाणें ? का अंधळे होते ? पण अखेर बडव्यांनीं ओळखलें बाई ! ते म्हणाले, हा रोजचा विठोबा दिसत नाहीं. आम्हीं शेरभर लो-ण्याचा गोळा खडीसाखर मिसळून विठोबाचे तोंडास रोजच्या-प्रमाणें लाविला, तों त्यांतलें अच्छेर लोणीं कमी झालें. हे आ-पले हळुहळु लोणी आंतलेआंत खाऊं लागले. बडवे म्हणाले, आज देव लोणी कां खाऊं लागला ? बडवे लागले हंसायला. यांच्या अंगावर झुरळें आणखी उंदीर लागले हिंडायला. त्यांचे कांट्यासारखे पाय अंगाला टोंचत. मग इकडे तिकडे माणूस पाहून झाडून टाकीत. पुनः आपले उभे राहात. विठोबा कांहीं केल्या लवकर परत येईनात. ते बसले जनाबाईचे शिळे तुकडे

भरीत. शेवटीं मग सासूबाईनीं विठोबाच्या धरलें दंडाला, आणखी ह्मणाल्या, पांडुरंगा, तुम्ही फार लबाड आहांत, तुह्मीं पुंडलिकाला भाक काय दिली ? तुझ्यापुढें मी विटेवर उभा राहीन. मग अशी दिलेली भाक मोडून तुम्ही शेंकडों वेळां नामदेवाकरितां आमचे घरीं कसे येतां ? मग देवाला लाज वाटली. पाण्यांत पडल्यासारखें झालें. रावळांत जाऊन आपल्या जागेवर उभे राहिले. एवढें ऐश्वर्य मिळालें पण घराकडे एक छदाम पाठविला असेल तर शपथ. आतां मीच बरी कीं नाहीं ? सारें घर संपत्तीनें कसें ठेंचून भरलें. अगबाई, आले वाटतें. (नामदेव प्रवेश करतो.)

नामदेव– आज तुला हें नवें लुगडें आणि ही चोळी कोणीं दिली ? हे अंगावर दागिने आले कोठून ? ही भपकेदार सरजाची नथ, आणखी हें मोत्यांचें पेंडें, या पायांत सांखळ्या आल्या कोठून ? हीं घरांत भांडींकुंडीं आलीं कोठून ? रोज घरीं आल्याबरोबर मर्मभेदक शब्दांचा वर्षाव व्हावयाचा, तों आज आमचें इतकें आगतस्वागत मोठ्या आदरानें चाललें आहे, हें आहे तरी काय ? रोजचा विजेचा कडकडाट एकदम नाहींसा कसा झाला ? हा सूर्यप्रकाश एकदम कसा झाला ?

राजाई– तुम्ही अगदीं बोलूं नका. आज कांहीं चंद्रभागेवर स्नानाला जाऊं नका. घरींच तुह्माला ऊन ऊन पाणी स्नानाला देतें. पाट मांडतें. पितांबर नेसा. पाटावर बसा. चांदीच्या ताटांत पक्वान्नें वाढतें. मुकाट्यानें जेवा. मग तुम्हांला त्रयोदशगुणी विडे करून देईन. पलंगावर निजा, मी चरणांची सेवा करीन. असें तुह्मीं नित्य केलें तरी चालेल. आतां कांहीं आपल्याला कमी नाहीं बरें का ?

नामदेव– पांडुरंगा, तू हें काय आरंभिलें आहेस ? सुंदर स्त्रीचें नाक कोडानें पांढरें दिसावें, हरिण फासांत सांपडावा, खग्रास ग्रहण लागून सूर्य तेजहीन दिसावा, पराजय ऐकून राजाला अत्यंत शोक व्हावा अथवा रंभा पाहून शुकाला किळस उत्पन्न व्हावी,

त्याप्रमाणें हीं वस्त्रेंपात्रें, हीं भांडींकुंडीं, हे बायकोच्या अंगावरचे अलंकार, हें पाहून माझ्या मनाला किती तीव्र यातना होत आहेत, हें तूं जाणत नाहींस काय ? लाथ मारून मला दुःखाच्या महासागरांत लोटून देतोस ? काय मीं तुझा अपराध केला ! माझें हृदय फुटायला लागलें !

राजाई– इतकें कांहीं वाईट वाटण्याचें कारण नाहीं. ज्याची तुम्ही भाक्ति करतां त्याच्या घरीं काय नांदणूक आहे ? अष्टमहासिद्धि त्याच्या दासी आणखी आपल्या घरीं उंदीरघुशी ! राहीरुक्माई, सत्यभामा यांनीं मात्र मोठमोठीं वस्त्रें नेसावीं, आणखी आह्मांला लुगडीं सुती, त्याला तीन दंड ! त्यांनीं क्षीरसागरीं शेषावर शयन करावें, आणखी आह्मीं कांबळ्याचीं फाटकीं पटकरें अंथरावयास घ्यावींत ! त्यांना जेवायला रत्नजडीत ताटें, आणखी आह्मांला पळसाच्या पांनांचीं ठिकोळीं ! त्यांना बसायला रत्नजडीत सिंहासन,आह्मांला मातीचे ओटे ! त्यांना पिण्याला नित्य अमृत, आह्मांला भाताची पेज ! त्यांना पंचपक्वान्नांचें ताट खायला, आम्हांला भाजीभाकरी ! त्यांच्या घरीं सोन्याचीं भांडीं, आमच्या घरीं फुटकीं खापरें ! काय म्हणून असा पक्षपात ? एक मोठें थोरलें शेत घ्यायचें. म्हशी घरांत बाळगायच्या. आपल्यामागें मुलाबाळांनीं म्हणायला नको कीं आह्मांला कांहीं जोडून ठेवलें नाहीं. आणखी मामंजींना नवें पागोटें, रेशीमकांठी धोतरजोडा, हातांमध्यें अंगठ्या, गळ्यांत गोफ, सगळें घ्यायचें– नाऱ्या, महाद्या, गोंद्या, विठ्या, चार आपले मुलगे, त्यांचे कान आजपर्यंत बुच्चे होते, पण आतां मोठाल्या भिकबाळ्या, हातांत दोन दोन कडीं, गळ्यांत गोफ घालायला द्यायचे. मी आजपासून स्वयंपाक करायची नाहीं. कोणी तरी बाई ठेवा. भांडीं, दळणकांडण, धुणेंपाणी आम्हीं घरांत करणार नाहीं. सगळें आतां मोलानें द्यायचें. एक छानदार वाडा बांधायचा. सगळ्यांच्या खोल्या, दागदागिन्यांच्या पेट्या निरनिराळ्या. डागिने कांहीं मीं एकटीनें घातले

नाहींत. लाडाई, गोडाई, येसाई, साकराई तुमच्या चौघी सुना दागिन्यांनीं मढविल्या आहेत. सासूबाईंना पैठणी नेसायला, अंगावर सोन्यामोत्यांचे दागिने, सर्व कांहीं आहे. आतां मी राजाच्या राणीसारखी दिसतें. आवडा बन्सेलासुद्धां दागिने द्यायचे बरें का ?

नामदेव– आतां तोंड बंद करतेस कीं नाहीं ? आण ते सर्व माझ्यासमोर दागदागिने, वस्त्रपात्रें, भांडींकुंडीं ब्राम्हणांला देऊन टाकतों. माझ्या घराला सोन्याचा विटाळ नको. कोणीं दिली तुम्हांला ही दौलत ?

राजाई– तेवढें विचारूं नका. बाकी काय पाहिजे तें विचारा. म्हटलें, हे मळके कपडे अंगावर आतां किती दिवस घालावे ? मला बाई याची लाज वाटते. चांगले किनखापाचे अंगरखे, जरीकांठी धोतरजोडा, मोठें थोरलें पैठणी पागोटें, त्याला लांबलचक नारळी पदर, गळ्यांत मोत्यांचें पेंडें, पायांत लालचटक जोडा, बसायला घोडा, हातांत हिऱ्यामाणकाच्या अंगठ्या, असा करानात एकदां पोषाक ? असा पोषाक करून आपण जोडप्यानें एकदां रावळांत जाऊं. देव कांहीं रागावणार नाहींत हो ! त्यांना तर उलट आनंदच वाटेल.

नामदेव--

अभंग.

हा देहो नाशिवंत मळमूत्राचा बांधा ॥ वरि चर्म घातलेंरे कर्मकीटकांचा सांदा ॥ रव रव दुर्गंधीरे अमंगळ तिचा बांधा ॥ स्मरे त्या हरिहरा शरण जाई गोविंदा॥१॥

तूं चुकतेस अगदीं. या नरदेहाला अलंकार घालून याला नंदीबैलाप्रमाणें सजवून काय फायदा ? हा कांहीं कायमचा नाहीं, आईच्या पोटांत नऊ महिनेपावेतों विष्टेच्या चिखलांत हा देह पचत असतो. लोक सुंदर स्त्रीला भुलतात, पण मी त्यांना असें विचारतों, सुंदर स्त्रीजवळ भुलण्यासारखें अधिक काय आहे ?

तिच्या अधरोष्ठांत अमृत असण्याचे ऐवजीं तोंड लाळीनें लिड-बिडलेलें असतें. नाक चांपेकळीप्रमाणें सुंदर, परंतु पडसें येऊन आंत श्लेष्मा झिरपत असतो. कमलासारखे विशाल नेत्र, परंतु त्यांतून पिंवळाधमक घट्ट पू वाहात असतो. कानांत सुंदर अलंकार घालते, परंतु कानांतल्या मळाची वाट काय? याचप्रमाणें सर्व इंद्रियांची वाट आहे. आतां हें शरीर जरी दुर्गंधीचा कोठार आहे, तरी या शरिरानें परब्रम्ह साधितां येतें. भवबंध तोडतां येतो. हरिभजनानें ही काया ईश्वरमय करतां येते. अतिप्रयत्नांनीं या मनुष्यदेहाची भेट होते. याचा आपण अशा तऱ्हेनें दुरुपयोग केला, विषयाकडे लक्ष देऊन या नरदेहाचें मातेरें केलें, तर कल्प-तरु तोडून टाकून त्या ठिकाणीं भांग पेरल्याप्रमाणें, किंवा अमृत देऊन मृगजळ प्याल्याप्रमाणें होईल. हा देह आपल्याला लोकांची निंदा करण्याकरितां किंवा निद्रा घेण्याकरितां दिलेला नाहीं. प्रपंचाची कटकट, विषयांची खटपट किंवा पक्वान्नें खाण्याची चट लावून घेण्याकरितां दिलेला नाहीं. रामनामाचा निरंतर उच्चार करण्याकरतां दिलेला आहे. तुला जर नामदेव पाहिजे असेल तर मनांत असलेली द्रव्याची अभिलाषबुद्धि सोडून दे, नाहीं तर तुमची आमची हीच भेट, कोठून आणलीस ही दौलत?

राजाई– (एकीकडे) आतां बाई काय बोलावें? गांठोड्याची अपेक्षा करावी, तर सौभाग्य जातें आहे. कांहींच बोलूं नये. पहावें काय होतें तें. कोठून दौलत आली हें जर यांना सांगितलें, तर वरचेवर ब्राम्हणांला वांटून टाकतील. पण ही पहा जनाबाई आली. ही यांना सर्व सांगणार. (जनाबाई प्रवेश करते.)

जनाबाई– (नामदेवाच्या पायां पडून) महाराज, राजाई कष्टी होतांच पांडुरंग वाणी होऊन आले. केशवशेट म्हणून त्यांनीं आपलें नांव सांगितलें. कानडा लिंगाईत वाणी होऊन आले होते. ते म्हणाले, माझ्या नामदेवाच्या घरीं अन्नवस्त्राचें संकीर्ण झालें आहे म्हणून मी गोणीभर होन घेऊन आलों

आहें. आजपासून माझ्या नामदेवाला कोणी छळींत जाऊं नका. हें द्रव्य संपल्यावर आणखी द्रव्य आणून देईन. असें सांगून आतांच ते गेले.

नामदेव—हे भक्तवत्सला, हे भक्तभूषणा पांडुरंगा, जे योग-साधनें करतात, त्यांच्या तूं दृष्टीस पडत नाहींस. मीं तुला कांहीं संकट घातलें नसतां तूं धांवून आलास. कामुक जन द्रव्याक-रितां तुझी आराधना करतात, त्यांना तूं तें देत नाहींस, आणखी मी कांहीं न मागतां तूं धांवून कां आलास ? मला ऋद्धि सिद्धि राज्य, संपत्ति कांहीं नको. तुझे पाय हेंच माझें सुख, त्यांचें मला अंतर देऊं नको. (राजाईस उद्देशून) तूं फार अनुचित् काम केलेंस. माझ्या पांडुरंगाला कां शिणविलेंस ? तूं माझी निंदा केलीस. त्याला लाज वाटली. रत्नजडीत मुकुट त्यानें डोक्याचा काढून माझ्याकरितां धोतर बांधलें असेल. कस्तुरीचा मळवट पुसून त्यानें भस्म लाविलें असेल. तुळशीच्या माळा काढून त्यानें रुद्राक्षांच्या माळा घातल्या असतील. कौस्तुभवैजयंती काढून त्यानें शिवलिंग कंठांत बांधलें असेल. कंबरेचा सोनसळा पीतां-बर सोडून तो बोटधारी धोतर नेसला असेल. तुझें चित्त द्रव्यासाठीं भ्रांत झालें. हातचें निधान गमाविलेंस. लक्ष्मि देवाची बायको तिचा अभिलाष आपण करूं नये. केला तर खरव नरकप्राप्ति होईल जनाबाई, गांवच्या ब्राम्हणांला हांक मार म्हणजे मी आपल्या हातानें सर्व वांटून टाकतों. (जनाबाई जाते.)

राजाई—गेली म्हातारडी ब्राम्हणांला बोलावायला. यावेळीं कोणत्या देवाला नवस करूं? जेजुरीचा खंडोबा, गिरीवरचा व्यंकोबा, नाहींतर माझ्या माहेरची काळूबाई, कोणाचें कांहीं चालणार नाहीं ! विठोबाला दया येगारच नाहीं. पण आई रुक्माबाई, तुम्ही तरी मला या नवसाला पावा. तुम्ही आपल्या नवऱ्याला सांगा कीं, माझ्या घरधन्याला कां वेडें केलेंस ? आम्हांला वस्त्रपात्र नाहीं, खायला अन्न नाहीं, चवदा माणसें

आमच्या पदरीं, आम्हीं आतां अन्नासाठीं दारोदार भीक का मागावी ? घरधन्यानीं मोहममतेचा त्याग केला. सर्वस्वाचा त्याग करून संसाराचा ठाव पुसला. यांना आमची दयामाया कांहीं राहिली नाहीं. हे वेडाच्या भरांत वारकऱ्यांचे पाय धुऊन तें पाणी पितात. घरादारावर शिंपतात. एकमेकांच्या पायां पडतात. आणखी भांवडभुतासारखे सारिरात्र नाचतात. आम्हांला झोंप येत नाहीं. भोळी बिचारी माझी सासू, (ओरडते.) सासूबाई, आहो मामंजी, अरे नाऱ्या, महाद्या, गोंद्या, विठ्या, अगे लाडाई, गोडाई, येसाई, साकराई, लिंबाई, अहो आवडावनसें, चाललें हो चाललें डबोलें भटांच्या घरांत ! त्यांच्या काय जातें बापाचें ! त्यांचें बरेंच झालें. अहो धांवाहो धांवा. (जनाबाई व ब्राह्मण प्रवेश करतात).

नामदेव– काढ ते अंगावरचे दागिने, आण तीं भांडींकुंडीं. (ब्राह्मणांस उद्देशून) महाराज, या घरांतील सर्व चीजवस्त वस्त्रपात्र भांडींकुंडीं मीं सर्व स्वसंतोषानें कृष्णार्पण केलीं आहेत. हीं तुम्हीं घेऊन जा. हीं सर्व तुमचीं आहेत. तुम्ही पृथ्वीवर नारायण मूर्ति आहांत. शाळिग्राममूर्ति अचेतन असतात, तुम्ही सचेतन होत. यज्ञदानें आणि तीर्थें तुमच्या योगानें पुनीत झालीं. देव ह्मणतो ' मी वेदोनारायण तुमच्यामध्यें सांठविलों आहें.' आपले पाय देवानें हृदयावर धारण केल्यानें देवाला पवित्रता आली. त्यायोगानें लक्ष्मि त्याच्या चरणाची सेवा करूं लागली. शिवानें चरणतीर्थ मस्तकीं वंदन केलें. जो ब्राह्मणांची पूजा करतो तोच माझा आत्मा असें देव म्हणतो. आपल्याला मी अनन्यभावें शरण आहें. हें द्रव्य तुमचें आहे घेऊन जा.

ब्राह्मण– तूं स्तुति केलीस तिला आम्ही पात्रच आहों. आमचा शाप फार कठीण. आमच्या शापानें श्रीकृष्णपरमात्म्याला कोळ्याचा बाण लागून तो निजधामाला गेला. ब्रम्हशापानें यादवकुळाचें निर्दलन झालें. सर्व समुद्राचें मूत्र बनविलें. परिक्षितीला

सात दिवसांत तक्षकदंश करवून स्वर्गास पाठविलें. असे आम्ही आहों. तुझें देव कल्याण करील.

राजाई–मोठे मेले ब्राम्हण, मला नाहीं आवडत. तुम्ही स्नानसंध्येचा डौल मारतां आणखी दक्षणा घेऊन गायत्रीचें फळ दुसऱ्यास देतां. वेदोक्त मार्गानें आम्ही चालतों म्हणतां, आणखी स्वर्गप्राप्तीची इच्छा करतां. पार्थिवपूजा करतां, पण घरांत याचक आला तर त्याला मूठभर भीक घालानात. तुमच्या तेवढ्या झळझळीत देवपूजा पहाव्यात. पण देवापुढें जसा अडणीवर शंख असतो, तसेच तुम्ही. एका शब्दांत तुम्हांला कुंठित करतें. पांडुरंग माझ्या घरचा आज चाळीस वर्षें नैवेद्य खात आहे, तुमच्या घरीं एक दिवस तरी जेवला आहे काय ? बोला. (रागानें अंगावरचे दागिने काढून ब्राह्मणांच्या अंगावर फेंकून देते.)

ब्राह्मण–आम्ही पांडुरंगाला प्रायश्चित्त देऊं.

नामदेव–तुम्ही तिच्या तोंडीं लागूं नका. मुकाट्यानें काय सांपडेल तें गोळा करून घेऊन जा. तिची सासू घरांत नाहीं म्हणून बरें आहे, नाहीं तर तुम्हांला कांहींच मिळालें नसतें. (ब्राह्मण सर्व दागिने आपसांत वांटून घेऊन जातात.)

राजाई–झालें मनासारखें ? सुटलांत आतां. खायला अन्न नाहीं, नेसायला वस्त्र नाहीं. आतां देवाजवळ कांहीं मागून तरी घ्या.

नामदेव–कांहीं नको मला. तुळशीपत्र बस आहे. त्याच्या जवळ काय मागावयाचें आहे ? आहे काय त्याच्याजवळ ? डोक्याचा मुकुट मागावा तर तो इंद्राकडून आणला आहे. कानांतील कुंडलें मागावीं तर तीं कर्णाचीं. पादुका मागाव्या तर त्या शेषाच्या. पायांतला तोडर मागावा तर असुरांचा धाक निघून जाईल. लक्ष्मि मागावी तर ती त्याची बायको. आतां का कंबरेचा पीतांबर मागून देवाला उघडा करूं ? सांग. भक्तिप्रेमापुढें मला कांहीं नको. (गोणाई व दामाशेट प्रवेश करतात.)

राजाई– झालें कीं नाहीं आतां मनासारखें ? सारें घर ब्राह्मणांनीं धुवून नेलें. आणखी वळवणी आलें आणि तळवणी घेऊन गेलें तशांतली गत. त्या मेल्या भटांनीं आपल्या घरांतलीं जातीं, उखळें, मुसळें सर्व कांहीं नेलें. तिखटमिठाला नरोटेंसुद्धां राहूं दिलें नाहीं. मी म्हणतें नुसते दागिने नेले असते तरी बरें. पण घराचा उन्हाळा केला !

गोणाई– जाऊंदे सर्व, कांहीं हरकत नाहीं. मला जनाबाईनें सर्व हकीकत सांगितली. तो मेला घरबेण्या आहेना ! गळेकापू ! लेकरांत आणि माझ्यांत ताडातोड केली. पण माझ्यापुढें किती प्रतिष्ठा चालवील तें मला पहायचें आहे. विटेसकट त्याला गळ्यांत घालीन आणि साऱ्या पंढरींत हिंडेन. त्याचें मी एक एक मर्म बाहेर काढीन तर तुह्मी तोंडांत बोट घालाल. समर्थ म्हणतो आणि बळीच्या दारीं भिकारी होऊन पहारा करतो. अर्जुनाचीं घोडीं धुतो ! धर्माच्या घरीं उच्छिष्टं काढतों ! विश्वंभर नांव मात्र, पण गवळ्यांच्या घरीं चोऱ्या करतो.

दामाशेट– जाऊंदे, त्याचें कशाला उणें पाताळें काढतेस ! नामदेवा, मी तुला कापड देतों. तूं कोठें परगांवाला जाऊन कापड विकून ये. पण मुद्दलापेक्षां पैसे जास्त घेऊन येहो. मुद्दल मात्र गमावूं नको. खबरदारी ठेव.

राजाई–आतां तरी शिकविण्याचे बोल ध्यानांत ठेवा. मुद्दल गमावूं नका. नाहीं तर तुमचें हंसें होईल.

गोणाई– ध्यानांत ठेव, लोकाचे पैसे काढून तुला कापड घेऊन दिलें आहे.

राजाई– आतां आईबापापुढें मी काय शिकवणार ! सर्व ध्यानांत ठेवा. (त्रिवर्ग जातात.)

नामदेव– पांडुरंगा, मला हा जीव नकोसा झाला आहे. मला तुझा वियोग कसा सहन होईल ? हे आईबाप मला दूर लोटीत आहेत. ह्याला मी आतां काय करूं ? माझी निराशा करूं नकोस.

कासवीनें जर आपल्या बालकाकडे प्रेमदृष्टि केली नाहीं तर त्यानें चिखल खाऊनच आपली उपजीविका केली पाहिजे. मला मनुष्यजन्म दिला आहेस, मी तुझ्या दारीं झाडलोट करून दिवस काढीन. पण तुझ्या दारीं मला वस्तीला ठाव मिळेल असें कर. पक्षी केलेंस तरी चाऱ्याच्या मिशानें तुझ्या दारीं मला वस्तीला ठाव मिळेल असें कर. वृक्ष केलेंस तरी तुझ्या देवळाच्या मंडपास माझें लांकूड करून तुझ्या दारीं मला वस्तीला ठाव मिळेल असें कर. उदकाचा जन्म दिलास तरी सडासंमार्जनाच्या मिषानें तुझ्या दारीं वस्तीला ठाव मिळेल असें कर. पाषाण केलेंस तरी तुझ्या दारीं मला पायिरीकरतां जागा दे. (दामाशेट प्रवेश करतो.)

दामाशेट— हें कापडाचें दिंड घेऊन आलों आहें. हें आपल्या पाठिशीं बांध आणि गांवोगांव हिंडून याची विक्री कर. मात्र मुद्दलांत तोटा होईल असें करूं नको. हें कापड शंभर रुपयांचें आहे बरें का ? याचे दिडशें करून आण. शेवटीं उपदेशाचे दोन शब्द बोलल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. म्हटलें शिंप्याच्या कुळांत तुझा जन्म झाला आहे. रात्रंदिवस तुझें लक्ष सुई, दोरा, गज, कातरी, अंगुस्तान यांच्याकडे पाहिजे चल आतां माझ्या बरोबर. थोडें खा. मग मी चंद्रभागेपावेतों तुला पोंहोचतें करायला येतों. (उभयतां जातात.)

तिसरा अंक समाप्त.

अंक चवथा.

प्रवेश पहिला.

स्थळ– जनाबाईची झोंपडी.

(जनाबाई दळीत बसली आहे. देव गोदडी पांघरून तिला दळूं लागत आहे.)

जनाबाई–

गाणें.

आदिनाथ परब्रह्म परात्पर बाळ नंदाचे घरीं ॥ ह्मणेरे यश्वदा, अरे मुकुंदा, चल दुड दुड दुड दुड ये माझ्या कडेवरी ॥ धृ० ॥

सुंदर श्रीधर नागर रुपडें कांचीबंद आंगणीं ॥ रूप लावण्य, रूप लावण्य, जशी चम् चम् चम् चम् चमकती सौदामिनी ॥

शिरपेच मंदिल तुरा गळ्यामध्यें हार हिरे कोंदणीं ॥ मारिती लहरा, मारिती लहरा, जसा थर र र र र र र तारा तुटे गगनीं ॥

चाल.

दुाजि नवरत्नांची कंठीं पदक तळवटीं ॥ पीतांबर कसला कटीं तनु धाकटी ॥ झाली गोपांची दाटी मध्यें जगजेठी मोर्त सांवळी ॥ ह्मणेरे यश्वदा ॥ १ ॥

कैवल्याचा गाभा फांकली प्रभा नभमंडळीं ॥ बाळ सूर्याचें, बाळ सूर्याचें, करी लख लख लख लख तेज तनू कोंवळी ॥

त्रिभुवनींचा सुभा उभा हरि खेळतो गोकुळीं ॥ वाजवी वेणू, वाजवी वेणू, तोम तन न न न न नाद गेला भूतळीं

चाल.

विस्मय वाटतो लोक करिती कौतुका ॥ तूं ब्रह्मांडाचा सखा विश्वपालका ॥ हरि प्रेमाचा सखा निका राहि साधूचे अंतरीं ॥ ह्मणेरे यश्वदा ॥ २ ॥

राजिवनेत्र निगोत्री गोत्र अरिमित्राचे करीं ॥ यमुने-तटीं, यमुने तटीं मारी भिरि रि रि रि रि खडे फोडी घागरी ॥

रेखिवाचित्र आकर्णनेत्र चंद्रावळ सुंदर ॥ आली पाण्याला, आली पाण्याला, फिरवी गर र र र र र र नयन पट्टा दुधारी ॥

चाल.

जशी चांदणी ढळढळी ओतिव पूतळी ॥ कां चांप्याची कळी नूतन कोंवळी ॥ होती सख्यांचे मेळीं पाहून वनमाळी धरी पदरीं ॥ ह्मणेरे यश्वदा ॥ ३ ॥

वृंदावनीं हा सारंगपाणी मंजुळ गायन करी ॥ वाजवी वाद्यें, वाजवी वाद्यें, तोम तन न न न न मृदंग मृदंग मंजिरी ॥

ध्वनि ऐकुनी आल्या धांवुनि व्रजांच्या सुंदरा ॥ पायीं पैंजण, पायीं पैंजण वाजे झन्‌ न्‌ न्‌ न्‌ न्‌ नाद गेला भूतळीं ॥

पांडुरंगा, तुला मीं जनी दासीनें काय द्यावें ? तूं सर्व विश्वाचा आधार आहेस. तूं सर्वसाक्षी आहेस माझ्या घरीं काय आहे ? तुटकिशी खाट वर वाकळेची शेज, तूं राजस सुकुमार मदनाचा पुतळा, तुला याच्यावर झोंप कशी येईलरे विठोबा ? माझ्या घरीं तरटाचें आसन, त्याच्यावर फाटून चिंध्या झालेलें वस्त्र पसरलेलें, माझ्या घरीं तुला रत्नजडीत सिंहासन नाहींरे विठोबा ? हा माझ्या घरीं फुटका तुंबा आहे, त्याच्यांतून पाणी गळत आहे बरें का ? तुझी राणी रुक्मिणिरंभा पंचपक्वान्नांचें ताट वाढून

तुझी वाट पहात असेलरे विठोबा ? वाळले चिळले तुकडे विटून त्याचें भूत झालेलें, हे तूं कसे खाशीलरे विठोबा ? तुझ्यावरून कायेची कुरवंडी करून प्राणाचें पुष्प तुला वाहिलें आहे. जास्त उपचार मी काय करूं ? भक्तिभावाचा तूं लाचार आहेस !
(गोविंदा प्रवेश करतो.)

गोविंदा– जने, कोणाबरोबर गोष्टी सांगत आहेस गे ? आतां जाऊन आजीला आणि आईला सांगतों. ही जनी एका बाईला आपल्या घरांत घेऊन येत असते. आणखी जनी मुळींच दळीत नाहीं. ती बाई सगळें दळण दळते. आणखी जनी तिला दळ-णांतले दाणे नाहीं तर पीठ घालते ह्मणून. दम धर तुझी मी चांगली खोड मोडून टाकतों. (जातो.)

जनाबाई– मी झाडलोट केल्यावर तूं केर भरतोस, आ-णखी डोक्यावर पाटी घेऊन लांब टाकायला जातोस. साळी कांडायला गेलें तर तूं पुढें होऊन उखळ झाडतोस. मुसळ हातांत घेऊन स्वतः कांडतोस. तुझें तोंड घामानें डवडवून जातें. पीतांबर भिजतो. तुझ्या हाताला कांडून कांडून फोड येतात, तरी हातचें मुसळ सोडीत नाहींस. धुवायला गेलें तर मागें धांवून येतोस. चार हातांनीं धुणें धुऊन टाकतोस. शेणी वेंचायला रानांत गेलें, आपला पाठीमागें उभाच. पीतांबराची कास घालून शेणी वेंचून त्यांची मोट बांधतोस. मी म्हातारी, मला शक्ति नाहीं, अंथरुणा-वरून उठवत नाहीं. मानेखालीं हात घालून मला तूं उठवितोस. आपल्या हातानें माथ्यावर मायेचा पदर घालतोस. माझे केश सावरून माझी वेणी आपल्या हातानें घालतोस. कसा भक्तीला भुललास ? आणखी नीच काम करतोस ? पण देवा, आतां राउळांत जा. आतां पहाट झाली. काकडआरतीच्या वेळीं तूं पुजाऱ्यांच्या नजरेस पडला नाहींस तर गांवांत बोभाटा होईल.
(गोणाई व राजाई हातांत काठ्या घेऊन प्रवेश करतात.)

गोणाई– कोण आणलीस दुसरी हेडंबा ? खायला काळ

भुईला भार. आतां तुला मोलकरीण लागूं लागली आं? कोण आहेस तूं? तुझें नांव काय? कशाला आलीस माझ्या घरांत? चांगली फोडून काढतें तुला आतां.

राजाई– अगे बया, तूं कशाला आणखी आमच्या उरावर खायला? आमचा गरिबीचा संसार. आमचें आह्मांला पुरत नाहीं. ह्मणतात नाहीं एकादशीच्या घरीं शिवरात्र! आणखी जने, चोंबडे रांडे, इला यांतलें पीठ घातलेंस वाटतें, कीं दाणे देतेस?

गोणाई– तूं कोण आहेस? बोलतेस कां नाहीं सटवाई? आह्मीं दोघीजणीं सासूसुना इतक्या कानाशीं ओरडत आहों; पण ही कांहीं बोलत नाहीं.

राजाई– चोरच ती! ती काय बोलणार? पण या अकाबाईला कांहीं लाज वाटते का? आमच्या घरीं आपण गिळते, आणखी चाकराला एक पडचाकर ठेवते. जने, या बाईचें नांव काय आहे गे?

जनाबाई– इचें नांव विठाबाई. तुह्मी कांहीं इला मारूं नका. ही मला रोज दळूं लागते, कांडूं लागते, धुणें धुऊं लागते, सर्व कांहीं करूं लागते. पण मी इला कांहीं देत नाहीं.

गोणाई– फुकट काम करायला तुझ्या बापाची चाकर असेल नाहीं? आज एक आम्हांला समजलें, पण हें असें किती दिवस चाललें असेल कोणाला माहीत? नाम्यानें घर बुडविलें, शिवण्याटिपण्यावर पाणी घातलें, संसाराची होळी केली, आतां गेला आहे हाळीला. आणणार काय दगड? आणखी ही एक कोण विठाबाई का पिठाबाई मागें लागली? (देवाला काठ्या मारते.)

राजाई– चोरग बाई चोर! रांडेला बोलायला तोंड कोठें आहे? रोज आयतें पीठ मिळतें. सवकली कुत्री माझ्या घरीं यायला! सवकल्या भुता आणि चल जाऊं कालच्या शेता! येशील का पुनः माझ्या घरीं? (देवाला काठ्या मारते. देव पळून जातो. गोणाई व राजाई देवाला मारीत मारीत जातात.)

जनाबाई–(एकीकडे) हें तुम्हीं काय केलें? ब्रह्मादिकांच्या जो दृष्टीला पडत नाहीं, मुनिजन लोहपिष्ट भक्षण करून हजारों वर्षे ज्याच्या प्राप्तीकरितां तपश्चर्या करतात, त्यांच्या दृष्टीस जो पडत नाहीं, तो देव तुमच्या दारींओसरीं लागला. तुमच्या अंगणांत सडासारवण करतो, तुमच्या घराचें खोंपट वाऱ्यानें उडून जाईल म्हणून स्वतः शेकारतो. तुमच्या घराच्याभोंवतीं सुदर्शनचक्राला घरटी करायला लावतो. पुत्र, दारा, धन यांचा त्याग करून अष्टांग योगसाधनें करून तुझ्यासाठीं वेडेपिसे झाले, गायन वादन करून तुझें पूजन करतात, त्यांच्या तूं दृष्टीस पडत नाहींस. अन्नाचा त्याग करतात, पाला खातात, पंचाग्निसाधनें करतात, धूम्रपान करतात, शरीर कृश करून घेतात, उदकपान करीत नाहींत, दिगंबरवृत्ति, तृणाची शय्या, दंडणमुंडण करून बोडके होतात पण देव दिसत नाहीं. अशा देवाच्या मस्तकावर तुम्ही काठ्या मारल्या! नामदेवाच्या भक्तीला देव भुलला म्हणून देव तुमच्या घरीं आला. नामदेव तहानभूक कांहीं जाणत नाहीं, म्हणून देवाला त्याचा योगक्षेम चालविणें भाग पडतें. पंख न फुटलेल्या पिलांना जसा केवळ पक्षिणीचा आधार तसा नामदेवाला देवाचा आधार. पण हें सुख यांच्या कपाळीं नाहीं. दूध पवित्र आणि गोड आहे, गोचिडांना तें अगदीं जवळ आहे; परंतु ते त्याचा त्याग करून रक्त प्राशन करतात. कमलांतले पराग भ्रमरांना आणखी बेडकांना जवळच असतात, परंतु भ्रमर पराग नेतात, आणखी बेडूक चिखल खातात. मृगजळाला पाहून तोंडांत धरिलेलें अमृत थुंकून टाकावें, गळ्यांत बांधलेला परीस तोडून टाकून शिंपला बांधावा, तशांतली गत झाली. अभागी ग बाई अभागी! चांगली घर चालून आलेली कामधेनु ओढाळ गाय ओढाळ गाय म्हणून काठ्या मारून बाहेर घालविली. अंधळ्याच्या हातांत परीक्षा करण्याकरतां मोतीं दिलें! आतां देव कशाला पुनः आपल्या घरीं येतो? देवानें काय वावगें केलें? भवसागर हाच

खुंटा, त्याच्या सभोंवतीं वैराग्याचें जातें फिरत होतें, त्यांत संचित-रूपी धान्य दळून टाकिलें. (कांहीं ब्राह्मण व कोतवालाचे शिपाई प्रवेश करतात.)

तंतोतंतबोवा– पकडा या थेरडीला. इच्याशिवाय देवाचें पदक गेलें नाहीं. नवरत्नांचें देवाचें पदक आणखी एकावली कोठें आहेत ! अग चोरटे, तुझ्या बापाचा माल असेल नाहीं का !

जनाबाई– केवढें मजवर कुभांड ! नारायणा, ह्या ब्राह्मणांच्या जिभेला कांहीं हाड आहे का ! देवाचें पदक चोरायला मी अगदीं नीच आहें का ? मीं जर देवाचें पदक घेतलें असेल, तर माझ्या देहाची जळून राखरांगोळी होवो. हे हात पाय झडून जावोत. मी विठोबाची शपथ घेऊन सांगतें कीं, मला कांहीं माहीत नाहीं.

सांबारेबुवा– (वाकळ तिचे अंगावर फेंकून) ह्मातारडे, उगीच पापाला धनी कशाला होतेस ? ही वाकळ तुझी आहे. ही आम्हांला आतां इतक्यांत देवाच्या अंगावर सांपडली. वाकळ दूर करून आम्ही पहातों तों एकावली नाहीं. नवरत्नाचें पदक एकावलींत गुंफलेलें नाहीं. ज्या अर्थीं तुझी वाकळ देवाच्या अंगावर आली, त्या अर्थीं पदक तुझ्याशिवाय गेलें नाहीं. इतकेंच नाहीं, पण वाकळ देवाला पांघरायला घालून देवाच्या अंगावरची शालजोडी घेतलीस. कोठें पातक फेडशील हें ! आतां तुझ्या मसणीं गोंवऱ्या गेल्या, आतां हे चाळे तुला आठवलेत का ? बऱ्याबोलानें कबूल होतेस कीं नाहीं ?

जनाबाई– पण तुमच्या पहाऱ्यांतून देवाकडे मी गेलें कशी ? देव तरी इकडे आला कसा ? कुलपें फोडलीं कोणीं ! याचा तरी विचार कराल ? उगीच भरी भरल्यासारखें माझें नांव घेतां याला म्हणावें काय ! आतां ही वाकळ ही बाई माझी आहे खरी. पण ती पांडुरंगाच्या अंगावर गेली कशी ? हा मात्र मोठा चमत्कार आहे !

तंतोतंत०– चमत्कार ! सारें पंढरपूर म्हणतें आहे जनीनें देव भुलविला ! मोठी चेटकी. कांहीं तरी कवंडाळ करते. कशी मोहनी घातलीस देवाला ? देव कसा तुझ्या नादीं लागला? आमची पूजा-अर्चा त्याला नकोशी झाली. आम्ही इतकीं पुण्यकर्मे करतों तीं फुकट ! रात्रीं देव खास तुझ्या घरीं आला होता. त्या-वेळीं तूं पदक आणि एकावली देवाजवळून हिरावून घेतलीस. आपली वाकळ त्याला पांघरायला घातली. ताकाचा नैवेद्य दाखवून प्रसाद ह्मणून लोणी खायचें अं ! मडक्यांतलें पाणी देऊन अमृत उपटायची विद्या आम्हांला शिकवितेस का ? गोद-डीच्या ऐवजीं शालजोडी उपटायला तुला लाज नाहीं गे वाटली जने ?

सांवारे०– भागवतांत जसें कुब्जेचें वर्णन आहे तशी ही जनी चंचल दासी आहे. त्या नामदेवाला म्हणावें आपली ही आवर. हिनें मोहनी घालून देव भुलविला. नाहीं तर आह्मां बडव्यांशीं गांठ आहे. देव आमचा ऋणी आहे. देवाचे जिवावर आह्मी लाखों रुपये कमावतों. आमचे प्रपंच चालले आहेत. देवाचे दागिने ते आमचे दागिने. देवाच्या नांवावर रोज पंच-पक्वान्नें आह्मी खातों, पण आतां देव तुझ्या संगतीनें बिघडून गेला. आण कोठें आहे तें पदक बऱ्याबोलानें, नाहीं तर मुसक्या बांधून तुझ्या झिंज्या धरून तुला दिवाणांत नेऊं.

जनाबाई– जर माझ्याजवळ पदक, एकावली, देवावरची शाल सांपडली, तर माझ्या झिंजीला कांदे बांधा. माझ्या मुसक्या बांधा. मला दिवाणांत न्या. सुळावर द्या. मग तर झालें ? अगो-दर माझ्या घराचा झाडा घ्या. आणखी जर तुह्मांला ह्यांपैकीं कांहीं सांपडलें तर या देहाचें काय पाहिजे तें करा. उगीच बडबड करूं नका. माझें नांव घ्यायला तुह्मांला शरम वाटत नाहीं ?

तंतोतंत०– अरे शिपायानों, घ्या इच्या घराचा झाडा. हें खाटे-वरचें पांघरूण झटकून पहा. (पांघरुणाचा वास घेतात.) देवाच्या अंगावरच्या बुक्याचा घमघमाट या पांघरुणांना येत आहे बरें

का ? (पांघरुणें झाडतात. पदक खालीं पडतें. बाजेवर शाल सांपडते.)

शिपाई पहिला—कायर नंदादिप्या, अर शिप्याची जात लई इमानी अन, मंग ही जनाबाई त्येच्या घरी आन खाऊन खाऊन चोऱ्या कशी कराया लागली ? अगे सटवाई, आतां तुला दावतो कोतवाली इंगा !

शिपाई दुसरा—घमघमदादा, ह्मन मला सुळावर द्या. आन माझ हात तोडा. अन पाय तोडा. लई बकवा जीभ लांब करून-शान करित होतिया.

तंतोतंत०—नीच हरामखोर पाजी चोर ! प्रत्यक्ष पांडुरंग साक्षात् परब्रम्ह गरुडध्वज त्याचें भूषण चोरलेंस, यापेक्षां घोर पातक या जगांत तरी असेल काय ? काय इला शिक्षा करावी ? जेव्हां मी कोतवालाला घेऊन अधिकाऱ्याकडे गेलों त्यावेळीं त्यांनीं भरदरबारांत छातीला हात लावून सांगितलें कीं, विठोबाचें पदक नेणारा चोर माझा प्रत्यक्ष बाप असला तरी त्याला-सुद्धां सुळावर दिल्याखेरीज राहणार नाहीं. असें न करीन तर रवरवनरकाला जाईन.

सांबारे०—बांधारे इच्या मुसक्या ! भोग आपल्या कृतकर्माचीं फळें ! तुझ्याच तोंडानें न्याय झाला. म्हणालीस माझा झाडा द्या. माझ्याजवळ एक जिन्नस सांपडला तर मला सुळावर चढवा. आतां तिन्ही जिनसा तुझ्याजवळ सांपडल्या. पण मला वाटतें या कामांत राजाई आणि गोणाई यांचेंही अंग असलें पाहिजे. त्यांनाही पकडून अधिकाऱ्यापुढें घेऊन जावें. (शिपाई जनाबाईच्या मुसक्या बांधतात.)

तंतोतंत—त्या बायांचीं नांवें घेऊं नका. पंढरींतला एकही मनुष्य त्यांच्या वाऱ्याला उभा रहात नाहीं. त्यांतून गोणाई तर देवाला लाखोली घालते. पण देव तिच्या घरचा नैवेद्य चोरून खातो. सगळ्या जगाला माहीत आहे. त्यांचीं नांवें घेऊं नका.

सांबारे–काय म्हणून सोडा त्यांना? अहो तंतोतंतबुवा, तुम्हा बायकांना भितां? आपण विठोबाचे बडवे! काळाचे काळ! कृतांताला शिक्षा करणारे! आपण काय भागुबाई आहोंत का? ओढारे त्या दोघींला घराच्या बाहेर. (शिपाई दार उघडतात. गोणाई व राजाई आंतून मुसळें घेऊन अंगावर धांवतात. जनीला घेऊन शिपाई व ब्राह्मण पळून जातात.)

गोणाई–मोठे मेले पदकाची आणखी शालजोडीची बढाई सांगतात! देव माझ्या नाम्याला इंद्रपद देतो आहे. वैकुंठाचा मालक करतो आहे. त्याला माझा नाम्या लाथ मारतो आहे! आणखी दीडदमडीचें पदक आह्मी चोरतों आहों! मारे मुसळाखालीं एकेकाचीं टाळकीं फोडून टाकीन माहीत नाहीं? माझ्या घरांत तर या.

राजाई–जनीला कोणी सांगितला होता कारभार? मी ह्मटलें नुसतें पीठच चोरते आपली; पण आज कांहीं तिसरेंच ऐकलें. आमच्यावर विनाकारण आळ मात्र आला. चला घरांत सासुबाई. तुम्हीं चौथीचा चांद पाहिलात त्याचा हा परिणाम बरें का? (उभयतां जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ— चंद्रभागेचें वाळवंट–जनाबाईकरितां शूळ रोविला आहे.

(दौंडीवाला प्रवेश करितो.)

दौंडीवाला–ऐका ऐका समद लोक. विठोबादेवाच गळ्यातल पदक नामदेवाची दासी जनाबाई इन चोरल. अशी बामनांची खात्री झाली हय. म्हनुनशान सरकारांतून तिला सुळावर चढवायची शिकशा झाली हय. इथून म्होर कोनी देवाच दागिन चोरल तर त्येला सरकार सुळावर चढवित्याल, अशी दौंडी देन्याचा हुकूम झाला हय र. (दोन वेळ दौंडी पिटवितो. जना-

चाईला मळवटं भरला असून तांबड्या फुलांच्या माळा घातल्या आहेत. तंतोतंतबुवा, सांबारेबुवा, नंदादीप शिपाई, घमघम्या शिपाई जनाबाईस धरून आणितात. गांवांतले पुष्कळ लोक मौज पहाण्या-करितां जमतात. असा पडदा उघडतो.)

अभंग.

जनाबाई—

विठोबाचें पदक गेलें ॥ बडवे ह्मणति जनीनें नेलें ॥ १ ॥
नाहीं नेलें म्यां जनीनें ॥ सख्या विठ्ठलाच्या आणे ॥ २ ॥
वाकळ झाडोनियां दावी ॥ पदक पडलें जनीचे ठायीं॥३॥
मिळोनियां दहा गडी ॥ प्रडली जनाईवर उडी ॥ ४ ॥
दंडीं लाविल्या काढण्या ॥ धांव विठ्ठला धांवण्या ॥ ५ ॥
चंद्रभागें रोविला शूळ ॥ आलें जनाईशीं मूळ ॥ ६ ॥

तंतोतंत– अजून खोटें बोलतेस ? मरतांना तरी गुन्हा कबूल कर. प्रत्यक्ष तुझें अंथरूण झाडतांक्षणींच पदक भुईला पडलें. तूं प्रत्यक्ष पाहिलेंस. आणखी आतां विठोबाच्या शपथा कशाला वाहतेस ?

जनाबाई– प्रारब्ध माझें. प्रारब्धानें पांडव राज्याचा त्याग करून वनांत हिंडूं लागले. भिक्षुक होऊन विराटाच्या घरीं राहिले. प्रारब्धा ज लावा कुळक्षय झाला. दुर्योधनाच्या मांडीवर गदा बसली. चंद्राला कलंक लागला. रामाला वनवास प्राप्त झाला. यादवांचा नाश झाला. नहुषराजा सर्प झाला. ब्रह्मदेवाला गाढवाचें तोंड लागलें. इंद्राला सहस्र भगेंद्रें पडलीं. कृष्णपरमात्म्याला कोळ्यानें बाण मारिला. हरिश्चंद्र तारामती, नळदमयंती यांनीं अनिवार यातना प्रारब्धामुळें भोगिल्या. याकरितां विठ्ठला, मी तुला शरण आलें. माझ्या कर्माचें निर्दळण कर.

तंतोतंत–तुला आतां शेवटचें कांहीं देवाजवळ मागावयाचें असल्यास मागून घे.

जनाबाई– मला विठोबाचें शेवटचें दर्शन घेऊं द्या. त्याच्या

पायांवर लोळण घालीन. ती माझी आई आहे. आपल्या हातानें माझें तोंड कुरवाळील. जिवाचें जडभारी पुसेल. पीतांबराची मजवर छाया करील. माझ्या आईनें गजेंद्राच्या हांकेसरसी उडी घातली. द्रौपदीला भर सभेंत नग्न करतांना पाहून पंचपक्वान्नाचें ताट दूर लोटून तिला असंख्य वस्त्रें पुरविलीं. शेवटीं आपल्या दिव्य पीतांबरानें तिची काया झांकिली. तुझ्या नांवानें दुःखानें तिनें हंबरडा फोडतांच कैलासाचीं शिखरें डळमळलीं. पृथ्वी थरथर कांपूं लागली. वैकुंठीचा कळस ढळला. शंकर आपला तृतीय नेत्र उघडून प्रळयाग्नि चेतवून ब्रह्मांड जाळूं लागला. तूं माझी आई, मी तुझें बालक, यावेळीं तुझें ब्रीद गेलें कोठें ? मला माझ्या जिवाची पर्वा नाहीं. असे लक्षावधि जीव तुझ्या पायांवरून ओवाळून सोडीन. मी रडतें अशाकरितां कीं, या जगांत तुझी अपकीर्ति होईल. साधुसंत तुला खोटा ह्मणतील.

नंदादीप– कायर घमघम्या ल्येका माझ्या बापजन्मीं मी असलं वंगळ काम केलं नाय. मर्दांनीं सुळावर मर्दाला देव. बायकाला बायकांनीं देव.

घमघम्या– अन् ल्येका मर्दानीं बायकाला सुळावर दिलं म्हुनशान का मर्दाच्या बायला व्हत्याती व्हय ?

नंदादीप– तसं नाहीं र गड्या. पन-पन आपल्या ?ामंदी आपल्याला काय ह्मनत्याल ? हेच मला मघापून लई लई वंगळ वाटतया. एका म्हातारीला सुळावर दिलं. काय पराकरम केला व्हय ? आन नामदेवाच्या घरची जनाई दासी गरीब बिचारी गई. या बामनासनीं असं उमगत नाय कीं देवापत जनी आली कशी? देवाच्या दाराला तर हंग असलली कुलपं (हातांनीं दाखविते.) मंग अस झाल कस ! आन देवाच पदक जनीन चोरल कस ! हा न्याव काहीं बराबर झाला नाय. आपुन इथून जानार.

घमघम्या– आतां ल्येका काम सोडून गेलास कीं हे बामन तुला सुळावर चढवत्याल. गुमान कामाला लाग. नयतर बाम-

नाचा राग लई बंगाळ हय, म्हुनशान म्हनतो. चल बया घे देवाच नांव.

जनाबाइ– प्रऱ्हादाच्या हांकेसरसा खांबांतून कडकड ध्वनि होऊन प्रगट झालास, कर्णाच्या प्राणघातक बाणापासून अर्जुनाचे प्राण वांचविण्याकरितां त्याचा रथ भूमींत दडपलास. निःपांडवी पृथ्वी उद्यां करीन, अशा भीष्मानें केलेल्या घोर प्रतिज्ञेपासून सती द्रौपदीचें सौभाग्य राखलेंस. भक्तांकरतां अनेक वेळां स्वतःच्या प्रतिज्ञा खोट्या करून भक्तांची महती वाढविलीस. माझ्या भक्तास कोणीं दुष्टानें गांजलें आणि नंतर माझी मोठी भक्ति केली तर ती व्यर्थ आहे असें ह्मणतोस. जसें एखाद्या गरीब बाईच्या मुलाच्या मस्तकावर लत्ताप्रहारानें ताडण करावें, आणखी नंतर तिला भरजरी पैठणी नेसवावी, तर तिचें समाधान कसें होणार? मुलाच्या मस्तकावर केलेला लत्ताप्रहार यावज्जीव तिच्या मनांतून जाईल काय? असें तूं भागवतांत उद्धवाला सांगतोस. मग माझ्याविषयीं कसा अंधळा झालास? कसा निष्ठुर झालास? मी तुझी भक्त ह्मणवितें. माझी तुला कांहीं करुणा येत नाहीं. पांचापासून ज्यांचा जन्म, पांचांत येकच बायको? ज्यांनीं आपल्या गोत्रजांचा वध केला, अशा पांडवांना सर्व जगानें वंद्य असेंच समजलें पाहिजे. जन्मेजयानें [illegible]ा उणेपणा काढून तो किंचित् [illegible]सल्याबद्दल त्याच्या [illegible] ॥ बोळावि [illegible]गलीच कोड भरला. एवढा तुला भक्तांचा अभिमान [illegible] ें ॥ देव [illegible] आज राखर,गोळी झाली. (गोणाई [illegible]ाजाई मुसळें घेऊन प्रवेश करितात.)

गोणाई– इतकी त्या देवाची स्तुति करतेस कशाला? हा देव स्तुतीनें लवकर पावत नाहीं. याला फराळाचें लागतें. यशोदेनें उखळाशीं बांधून गाईच्या दाव्यानें जेव्हां चांगला चोपला तेव्हां तो भामट्या यशोदेकडे पाहून एका डोळ्यानें रडायला लागला, आणखी गोपीकडेस पाहून एका डोळ्यानें हंसावयास लागला. असला नाटकी! दहा तोंडांचें एक किरडूं मारलें ह्मणे रामा गडी शहाणा!

राजाई– आणखी तो एक कुटाळ्या करून जगांत भांडणें लावणारा, चहाडखोर-नारद, ज्याचा बाप चार तोंडांचा कुंभार नेहमीं मडकीं घडतो– ह्मणजे माणसें घडतो– अशा ब्रह्मदेवाचा मुलगा, तो याचा जोडीदार. आपल्याला मोठा साधु ह्मणवितो. गंगागौरींत भांडण लावून संभ्याला वनांत पाठवितो. आणखी स्वतःसाठीं कृष्णाला ह्मणतो तुझी बायको दे.

तंतोतंत– सांबारेबुवा, आतां आपली धडगत नाहीं हो. ह्या उभयतां सासूसुना म्हणजे रावणकुंभकर्णाच्या बहिणीप्रमाणेंच आहेत. एक ताटिका आणखी दुसरी क्रौंच्या. बायानों, तुह्मीं हीं मुसळें कशाला बरोबर आणलींत ?

गोणाई– तुह्मांला उखळांत घालून कांडायला. तुह्मी फार असडी आहांत. जनाबाई सडीक तांदुळासारखी स्वच्छ आहे समजलांत का तंतोतंत ? म्हणे मुसळें कशाला आणलींत ? मोठे ब्राह्मण झालांत तर देवाला आणून येथें उभे करा, आणखी विचारा त्या चोराला. यादवांचा पोरगा मेल्याचा लोणी चोरतां चोरतां जन्म गेला.

राजाई– आपण तिघी मिळून देवाला शिव्यांची लाखोली वाहूं. ह्मणजे आतां पावेल. शिव्या द्यायच्या तर यालाच द्याव्यात आणखी स्तुति करायची तरी य[illegible]ी. आपल्याला ब्रह्म ह्मणवून घेतोस पण गवळ्यांच्या घ[illegible]च मला [illegible]तला असशील, महर्षि तुझी स्तुति करतात पण गवळ्यां[illegible] दि[illegible]रांबरोबर हुतुतु हमामा हुंबरी खेळला असशील, नाटकें केलीं असतील, नित्य मुक्त म्हणवितोस आणखी तुझ्या गळ्याला गवळणींनीं दावीं बांधलीं असतील, परात्पर म्हणवितोस पण तुला जर गवळणींनीं कोंडला असेल, ब्रम्हचारी म्हणवितोस पण सोळा हजार बायका केल्या असतील, तर या शूळाचे तुकडे तुकडे होऊं दे. सासूबाई, तुह्मी त्याची निंदा करा, माझ्या निंदेला तो दाद देत नाहीं.

गोणाई– बरें तर मग; एक ह्मणतात नंदाचा, एक ह्मणतात

वसुदेवाचा, तुझ्या बापाचा पत्ता नाहीं. तुझी जातकुळी जर शुद्ध नसेल, काळ यवनापुढें भागूबाईसारखा पळाला असशील, जरासंधाला भिऊन समुद्रांत द्वारका वसवली असशील, वत्सासुर वासरूं- बकासूर पाखरूं मारून जर आपल्याला मोठा वीर पुरुष ह्मणवीत असशील, लक्ष्मीकांत ह्मणवून घेऊन जर लोणी चोरलें असशील, ईशाचाईश ह्मणवून घेऊन जर ताकाचे डेरे फोडले असशील, कुब्जा दासीच्या ठिकाणीं रत झाला असशील, मोठा रूपावंत ह्मणवतोस पण परशुराम अवतारीं प्रत्यक्ष आईला ठार मारलें असशील, आपल्या मामाला ठार मारलें असशील, मावशीचें स्तनपान करून तिचा जीव घेतला असशील, गवळ्यांच्या पोरांच्या तोंडांतलें उष्टें लाळींत मिसळलेलें ताकदूध प्याला असशील, रामावतारीं जर माकडें तुझे मंत्री झाले असतील, वनवासांत दगडधोंड्यांला आलिंगनें दिलीं असशील, क्षीराब्धिजामात पण डोक्यावर घोंगडें घेतलें असशील, तर या शूलाचे तुकडे तुकडे होऊं दे. जने, तो कांहीं मला दाद देत नाहीं. तुझ्या तोंडच्या शिव्या त्याला गोड लागतात.

जनाबाई—

अभंग.

कांगा उशीर लाविला ॥ माझा विसर पडिला ॥ १ ॥
तुजसाठीं संसार ॥ वोळाविलें घरदार ॥ २ ॥
तुजवीण मजलागीं ॥ देवा कोणहो आपंगी ॥ ३ ॥
तरी तूं आपल्या दासीसि ॥ जनी ह्मणे न विसंबिसी ॥४॥

माझी अंधळ्याची काठी ॥ कोणी आड केली बेटी ॥१॥
आतां सांगूं मी कवणासी ॥ धांव धांव हृषीकेशी ॥ २ ॥
तुजवांचूनी विठ्ठला ॥ नाहीं कोणी रे मजला ॥ ३ ॥
देवा तुझीये चरणीं ॥ माथा ठेवी दासी जनी ॥ ४ ॥

माय मेली बाप मेला ॥ आतां सांभाळी विठ्ठला ॥ १ ॥
मी तुझेंगा लेंकरूं ॥ नको माझी सांडी करूं ॥ २ ॥

कोण सुख तुजविण ॥ माझें करी संरक्षण ॥ ३ ॥
अंत पाहूं नको देवा ॥ श्रम थोर जहाला जीवा ॥ ४ ॥

राजाई-अगे जने, असल्या स्तुतीला देव भुलणार नाहीं. त्याला तूं दयावंत म्हणतेस, त्यानें तर मयुरध्वजाचीं शकलें केलीं; उदार कर्णाचे दांत पाडले; कपोतासाठीं शिबी राजाला सोलून काढलें, जांभळाच्या निमित्तानें सख्खी बहीण द्रौपदी इची अब्रू घेतली; मोहनचिें सोंग घेऊन सुरासुराला ठकवून, महादेवाला मोहित केला असशील, आणखी सूर्यचंद्राला ग्रहणें लाविलीं असशील, तर शूळाचे तुकडे तुकडे होऊं दे.

तंतोतंत-करा आणखी कंठशोष. लोखंडाच्या शूळाचे तुकडे होतात, देवाचा बाप आला पाहिजे.

जनाबाई-तुला आतां शेवटचें एक तुळशीपत्र वाहतें. तुला कांहीं लाज असली, तर या शूळाचे कोळसे होऊं दे.

अभंग.

अरे विठ्या विठ्या ॥ मूळमायेच्या कारट्या ॥ १ ॥
विठ्या तुझें गेलें मढें ॥ तुला देखून काळ रडे ॥ २ ॥
तुझी रांड रंडकी झाली ॥ जन्म सावित्री चुडा ल्याली ॥३॥
उभी राहूनि आंगणी ॥ शिव्या देत दासी जनी ॥ ४ ॥

(आवाज होतो; शूळाचे तुकडे तुकडे होतात. सर्व लोक पुंडलीक वरदा हरि विठ्ठल ह्मनून गर्जना करितात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ-पंढरपुराजवळचा डोंगर.

(नामदेव कापडाचें दिंड घेऊन प्रवेश करितो.)

नामदेव-अहाहा! धन्य धन्य या पर्वतांची शांति. हे नेहमीं स्थिर आणि स्तब्ध असतात. यांच्या पोटांत असंख्य रत्नें आहेत.

सुवर्णाच्या खाणी आहेत. यांना लोक सुरुंग लावून फोडून काढितात, परंतु ते नको असें कधींही ह्मणत नाहींत. आपल्या अंगावर धारण केलेलें तृण आणि वृक्ष साऱ्या जगास देऊन हे मनुष्यांचा व पशूंचा चरितार्थ चालवितात. यांच्या पोटांत थंडगार उदकाचे मोठाले जलाशय आहेत. त्यांच्यापासून पाण्याचे झरे झुळझुळ वाहत असतात. आपली तृषा ते शांत करितात. याचकांची इच्छा हे पर्वत तृप्त करितात. परंतु कोणी तरी यांचे आभार मानतात काय ? किती तरी आपण कृतघ्न आहों बरें ? ऊस जसा सर्वांगीं गोड तसेच हे पर्वत गोड. यांच्या अंगावर मोठमोठे धोंडोबा आहेत, आणखी हे सर्वांत मोठे धोंडोबा—पाहिजे असल्यास यांना आपण गणोबा ह्मणूं. गणोबा, तुम्हाला सर्व सुरनर वंदन करितात. गणोबा, युधिष्ठिरानें तुमच्या चतुर्थीचें व्रत केलें, त्याला तुह्मीं राजपदावर बसविलें. प्रद्युम्न समुद्रांत पडला त्यावेळीं श्रीकृष्णानें तुमची पूजा केली, तेव्हां तो रतीला घेऊन परत आला. तस्मात् तुमच्यासारखे विघ्नहारक कोणी नाहीं. आमचा व्यापारांत तोटा करूं नका. (एक धोंडा घेऊन) हे तर केवळ योगीच आहेत, असें मला वाटतें. अंतर्बाह्य या धोंडोबांत शांति वास्तव्य करीत आहे. यांची वृत्ति नेहमीं दंडायमान आहे. यांना कोणीं जाळलें, टाकीनें फोडलें, लाथेनें तुडाविलें, इतकेंच नाहीं परंतु यांच्यावर मळमूत्राचें विसर्जन जरी कोणीं केलें, तरी तोंडांतून ब्र काढीत नाहींत. पांडुरंगा, अशी शांति माझ्या अंगीं दे. धोंडोबानों, या कडक थंडीच्या दिवसांत तुम्हांला पांघरूण नाहीं. (रडत रडत) बिचारे थंडीनें अगदीं कांकडून गेले आहेत ! थांबा तुम्हांला वस्त्रें पांघरावयास घालतों (गांठोड्यांतील वस्त्रें काढून सर्वांस पांघरावयास घालतो.) सर्वांस पांघरूण घातलें, पण अजून हे एक धोंडोबा राहिले आहेत. (ज्यांत वस्त्रें बांधून आणिलीं होतीं तें फडकें त्या दगडास गुंडाळतो.) हे गणोबानाईक पुरातनचे सावकार आहेत. यांना आपण हें सर्व

कापड विकलें आहे. पण कायहो गणोबा, तुह्मी या कापडाचा पैसा केव्हां देणार ? (धोंड्याशीं कान लावून) काय म्हणतां " आमच्याजवळ कांहीं तूर्त पैसे नाहींत. पुढील आठवड्यांत बाजारास याल त्या वेळेस पैशाचा उलगडा करूं. " अहो पण तुमचा काय भरंवसा ? पुढल्या आठवड्यांत तरी तुह्मी पैसे यालच हें कशावरून ? पैशाबद्दल आम्हाला आमचे वडील तगादा करतील. नाहीं तर गणोबानाईक, हे धोंडोबा तुमचे कनिष्ट बंधु आम्हाला जामीन द्या. (ऐकल्येंसें करून) हो ठीक आहे. धोंडोबा ह्मणतात कीं, गणोबांनीं तुमचे पैसे न दिले तर मी देईन. आतां कांहीं हरकत नाहीं. जामीनास बरोबर घेऊन घरीं जाऊन फडताळांत कुलूप घालून कोंडून ठेवतों. ऐन मालधनी बरोबर आणला, म्हणजे बाबा काय म्हणणार ? आपली कापडाची विक्री आज फारच लवकर झाली. हें फार चांगलें झालें. अशी विक्री झाली तर मी रोज व्यापार करीत जाईन.

अभंग.

ज्याचे मोडले पंख पाय तेणें करावें तें कायगा ॥
चित्तीं धरुनी दृढ भाव पंढरपुरासी जावेंगा ॥
इच्छिलें फळ पावे क्षेम देउनी भेटावेंगा ॥
विठोबाचा धर्म जागो त्याचे चरणीं लक्ष लागोगा ॥ १ ॥

(धोंडा लोटीत लोटीत घेऊन जातो. कांहीं लोक प्रवेश करतात. खदखदां हंसतात.)

पहिला गृहस्थ– अहो आम्ही याच्याबरोबर बाजाराला गेलों. आमच्या मंडळींत हे आपलें कापडाचें दुकान मांडून बसले. पण मालाची विक्री बोलण्यावर होत असते. बोलेल त्याचीं गाजरें विकतात. न बोलेल त्याचा गूळ विकत नाहीं.

२ रा गृहस्थ– हे बोलतात कशाला ? हे आपले डोळे झांकून पांडुरंगाचें ध्यान करीत बसले. तोंडानें नामस्मरण चाललेंच होतें.

३ रा गृहस्थ– सगळीं गिऱ्हाइकें आमच्याकडे यायला लागलीं. आम्ही याच्या मूर्खपणाबद्दल पोट धरधरून हंसूं लागलों. कोणीं याला विचारलें–कापड काय भाव–यानें म्हणावें विठ्ठल. अरे रुपयाचे किती वार– विठ्ठल. धोतरजोड्याची किंमत काय? विठ्ठल, किती रुपये देऊं ?– विठ्ठल, कापड विठ्ठल, रुपये विठ्ठल, गज विठ्ठल, कातर विठ्ठल, देणारे विठ्ठल, पाहणारे विठ्ठल, अशी त्यानें मजा मजा केली. पैसा देऊन असली गम्मत पहावयास मिळावयाची नाहीं.

१ ला गृहस्थ– अखेर संध्याकाळ झाल्यावर मीं याचें डोकें हलवून याला शुद्धीवर आणला. आणखी म्हणालों 'नामदेवबुवा, आपली विक्री पुष्कळ झाली असेल. आतां दुकान आवरून घरीं जा.'

२ रा गृहस्थ– आपली विक्री कांहीं झाली नाहीं, याबद्दल त्याला किंचित् सुद्धां वाईट वाटलें नाहीं. आपल्याबरोबर लागलाच धर्मशाळेंत आला. खुशाल सारी रात्र प्रेमानें भजन करीत बसला. सकाळच्या प्रहरीं हा कोणीकडे जातो हें मी पाळतीवर होतों म्हणून मला समजलें. पाहतों तों आमच्या गांवाकडे स्वारी वळली. नाहीं पंढरपुरास विक्री झाली तर येथें तरी होईल, म्हणून येथें येऊन अखेर कशी विक्री केली, हें आपण सर्वांनीं या डोंगराचे आड लपून पाहिलेंच आहे. आतां हें दगडांस गुंडाळलेलें कापड आपण घेऊन जाऊं. याला हे गणोबानाईक पैसे देणार आहेत आणखी धोंडोबा नाईक जामीन आहेत. सारा वेड्यांचा बाजार ! माझ्या साऱ्या जन्मांत मीं अशी गम्मत पाहिली नव्हती. (हंसत हंसत सर्व कापड घेऊन जातात.)

प्रवेश चवथा.

स्थळ– नामदेवाचें घर.

(राजाई प्रवेश करिते.)

राजाई– (एकीकडे) मागें एकदां आमच्या घरीं ह्मणायचें झालें कीं, जवळ कांहीं भांडवल असतें तर व्यापार तरी केला असता. येथें एक दादा सावकार ह्मणून होता, तो ह्मणजे इतका कंजूश असे कीं, कालवणांतल्या शेवग्याच्या शेंगांच्या चोखलेल्या चोयट्या, उसाच्या वाळलेल्या चोयट्या, शेंगाची फोलें, यांवर पाणी तापवून आंघोळ करीत असे. बाजार संपल्यावर तेथें पडलेली भाजी उचलून आणून वाळवून ठेवीत असे. त्याला बाई कोणीकडून बुद्धि झाली कोण जाणे ? समुद्रानें खारटपणाच सोडला ह्मणायचा, नाहींतर अमावास्येचे दिवशीं चंद्रच उगवला ह्मणायचा ! त्यानें एक हजार होन दिले. ते घेऊन विचार करूं लागले कीं, व्यापार कसला करावा ? यज्ञ करून स्वर्ग प्राप्ति करून घेतली, तर पुण्य संपतांच पुन्हां माघारें यावें लागेल. शास्त्रांत पुराणांत जो जो उदीम सांगितला आहे तो तो सगळा मला तोटाच दिसतो आहे. तप करावें, शरीराला कष्ट द्यावे, तर तपाअंतीं राज्य मिळेल; पण राज्याअंतीं घोर नरकयातना ! सरतेशेवटीं असें ठरलें कीं, ब्राह्मणांला आणि गरीबांना मिष्टान्न खायाला घालावें. हरिचें कीर्तन करावें. या व्यापारानें कल्पांतीं सुद्धां तोटा येणार नाहीं. पंढरीस त्रास पडेल, दादा सावकार येऊन छळील, ह्मणून गेले राक्षसभुवनाला. तेथें जाऊन ब्राह्मणभोजनें घातलीं. दादा सावकाराला समजतांच तो गेला तेथें टाकोटाक. पाहतो, तों ब्राह्मणांची पंगत बसलेली! याला पाहतांच घरधनी ह्मणाले 'दादा उदक सोडा.' दादा ह्मणाला माझा जीव जाईल. माझे पैसे टाक. माझें घर बुडविलेंस. असें ह्मणून ऊर बडवूं लागला. क्षेत्रांतले ब्राह्मण अनिवार! ह्मणाले 'चूळभर पाणी सोडायला तुझ्या बापाचें काय जातें ?'

बळेंच त्याच्या हातून पाणी सोडलें. ब्राह्मणाला वाटलें माझे पैसे खास बुडाले. चला तुमचे पैसे देतो असें ह्मणून गंगेंत स्नानाला घेऊन गेले. बुडी मारली तों पाताळीं गेले. तेथें विठोबा बादशहाचें सोंग घेऊन आले. चहूंकडे विठोबा आहेतच. बादशहा आणखी घरधनी एका ताटांत जेवूं लागले. सावकार कांहीं जेवीना. त्याला दिला शिधा. सरपणा-करितां पांच गोंवऱ्या दिल्या. शिधा घेऊन पाताळगंगेवर स्नानाला गेला. बुडी जों मारतो तों चंद्रभागेंत उभा. बाहेर निघून धोतर झाडून पाहतो तों एक सोन्याची गोंवरी पांचशें तोळ्यांची धोतरांत अडकून आलेली दिसली. सावकाराला आनंद झाला. (नामदेव धोंडा लोटीत लोटीत प्रवेश करितो. राजाई उघड बोलते.) अहो तुम्ही व्यापाराला गेला होतांना ? हा का व्यापार केलात वाटतें ? एवढा मोठा धोंडा लोटीत लोटीत घराला घेऊन आलांत या वेडाला काय ह्मणूं तरी काय ? सोडा त्याला. या रस्त्यावर टाकून त्याला. कोणीकडे नेतां ? पायावर पडला तर पायच तुटेल ह्मणून ह्मणतें.

नामदेव– तूं बोलूं नकोस कोणाजवळ. गोष्ट अगदीं गुप्त ठेव. हे धोंडोबा आणले आहेत. ह्यांना आतां तळघरांत कुलूप अगळा घालून कोंडून ठेवतों, ह्मणजे आपले पैसे वसूल झाले ह्मणून समजा (धोंडा तळघरांत ठेवतो.)

राजाई–आजपावेतों व्यापाराच्या पुष्कळ तऱ्हा पाहिल्या बाई ! पैसे घेण्याचा मनुष्य वायदा करतें. व्याज लावून घेतात. खतें पत्रें करून घेतात. गहाण लावून घेतात. पण पैशाच्या ऐवजीं भला मोठा एका गाढवाचें ओझें धोंडा उरापोटावर आणतांना मीं कांहीं पाहिलें नाहीं ! साऱ्या जगांत कोणीं पाहिलें नसेल, आणखी ऐकलेंही नसेल. (नामदेवाचा हात धरून) कापड कोठें आहे ह्मटलें ? तुह्मी हाळीला गेला होता ना ?

नामदेव– तूं कांहीं काळजी करूं नको. एवढ्याकरतांच

ऐन मालधनी बरोबर आणला आहे. आतां पैशाचा निकाल चोख होणार. मी आतां रावळांत जाऊन देवाला सगळी हकीकत सांगतों. मला आतां व्यापार चांगला करतां येऊं लागला, हें पाहून देवाला आनंद होईल. माझी पाठ थोपटतील. मला ह्मणतील 'नामदेवा, धन्य आहेस तूं. तुझ्यासारखा हुशार व्यापारी जगांत कोठेंच दिसणार नाहीं.'

राजाई–अहाहा ! काय व्यापार हा ? आग लागो असल्या व्यापाराला ! चांगलें घोडें भरून शें दोनशें रुपयांचें कापड घेऊन गेलांत, आणखी एक भला भक्कम दगड घेऊन आलांत. कापड कोणाच्या मढ्यावर घातलें ?

नामदेव– मोठ्यानें बोलूं नकोस ? तुला वेड बीड तर नाहींना लागलें ? धोंडोबांनीं जर कां ऐकिलें तर गणोबा नाईकाला सांगतील कीं, पैसे देऊं नका. नामदेवाची फटकळ बायको आपल्याला शिव्या देत होती. मी चांगला तुमच्या कल्याणाकरतां झटतों आहें. आणि तुह्मी बोलून अशी घाण करतां !

राजाई– यांच्यापुढें काय बोलावें कांहीं सुचत नाहीं. धोंडोबाला देवाजवळ घेऊन जा. ह्मणजे तुमच्या अकलेची सत्यभामा, राही, रुक्माई आणखी त्यांचे पतिराज विठोबा, फार फार तारीफ करतील बरें का ? पोरें माझीं उपाशी मरत आहेत. त्यांच्यापुढें खायला काय घालूं ? या धोंड्यानें आमचें पोट भरतें का ?

नामदेव– बडबड अशीच बडबड. जीवापाड कष्ट करून व्यापार केला. कापड सगळें विकून टाकलें. ऐन मालधन्याला घेऊन आलों. तरी तुला काडीचें समाधान नाहीं. धीरसो गंभीर. तुझ्यासारखी उतावळी बायको त्रिभुवनांत नसेल. तूं अशी घाबरतेस काय ह्मणून ? धोंडोबाजवळून ऐवज भरून घेऊं. नाहीं ऐवज दिला तर त्यांना दिवाणदरबारांत घेऊन जाऊं. आपलें सरकार दयाळू आहे. या गोष्टीचा चांगला न्याय करील. मी जातों आतां रावळांत. (जाऊं लागतो.)

राजाई– (नामदेवाचें मनगट धरून) चाललांत कोठें ? मामंजीला आणखी सासुबाईला घरीं येऊं द्या. चिरंजीवांनीं व्यापाराचे काय दिवे लावलेत तें त्यांना एकदां प्रत्यक्ष पाहूं द्या. मामंजींनीं जर तुह्मांला चांगलें मारलें नाहीं, तर ह्मणाल तें ऐकेन. नाहीं-तर मीच जातें त्यांच्याकडे, आणखी हे वेडे चाळे जाऊन सांगतें. मला कोठें आईबापाला द्यायला जागा नव्हती. तुमच्या पदरीं मला बांधलें. माझ्या संसाराचें वाटोळें केलेंत. आईबापाच्या पोटीं असला पांढरा परीस जन्माला आलांत. नशीब आपलें, दुसरें काय ? पण मी तुम्हाला असें विचारतें कीं, तुमची वृत्ति लंगोटी लावून गोसावी झाल्याप्रमाणें झाली आहे. तुह्माला लौकिकाचें भय कांहीं राहिलें नाहीं. आतां आमची निरवानिरव काय केली ? तुमची स्थिति या प्रकारची. पोरेंबाळें अज्ञान. तुम्हाला माया ममता कांहीं राहिली नाहीं. घड नेऊन कांड्यावर घातलेंत. आपल्याला वेड लावून घेतलेंत. संसाराच्या बारा वाटा केल्यात. आपलें नांव जगांत मोठें केलेंत. सोन्यासारखीं मुलेंलेंकरें तुम्हाला झालीं. त्यांची ताडातोड तुह्मी आपल्या हातानें करीत आहांत. म्हणून माझें हृदय दाटून येतें बरें कां ? तुमच्याशिवाय जिवाचें सुखदुःख कोणाला सांगूं ? तुम्ही त्या देवाचें नांव सोडा. त्यानें माझ्या संसाराचा ठाव पुसून टाकला. आतां माझी हात जोडून विनंति आहे कीं, हे वेडे चाळे सोडून द्या. तो धोंडोबा आपण दोघे उचलून घराबाहेर उकरड्यांत–

नामदेव–तेवढें मात्र बोलूं नको. मी मोठ्या प्रयासानें त्यांना जामीन ह्मणून आणलें. या कामांत गणोबानाईकांची अब्रू जाणार आहे. याचा तूं विचार केला आहेस काय ? वेडे वेडे चाळे तूं करतेस. मी तर कांहीं करीत नाहीं. रात्रंदिवस पांडुरंगाचें नांव घेतों. याला तूं वेडे वेडे चाळे ह्मणत असलीस तर तुला सांगतों. नामाचें सामर्थ्य वेदशास्त्रें जाणत नाहींत. शेषाचीं तोंडें या नामाचें सामर्थ्य वर्णन करीत असतां बंद पडलीं. गंगा गणपति

चंद्र सूर्य शंकर वशिष्ठ मौनावले. भीष्म पराशर उद्धव अंगद ब्रम्हदेव मुचकुंद मौनावले. राम राम ह्मणतांच चित्रगुप्ताच्या लेखण्या बंद पडल्या. ब्रम्हदेव पूजेचें साहित्य घेऊन आम्हांला सामोरा येईल. यांत जर एक अक्षर असत्य होईल तर हें मस्तक या धडापासून वेगळें कर.

राजाई– एवढा नामाचा महिमा सांगतां, मग त्या दिवशीं काय झालें होतें ? जनाबाईवर पदक चोरल्याचा आळ आला होता. तिनें तडातड विठोबाच्या शपथा वाहिल्या, पण ब्राह्मणांना तें कांहीं खरें वाटेना. शेवटीं तिला शूळावर देण्याकरितां चंद्रभागेच्या वाळवंटावर घेऊन गेले. सासुबाईनीं आणखी मीं दोघींनीं विठोबाची पुष्कळ निंदा केली. जनी स्तुति करीत होती. शेवटीं स्तुति करतां करतां थकली. अखेर आमच्याप्रमाणेंच जेव्हां तिनें शिव्या देण्याला आरंभ केला– जेव्हां ह्मणाली– अरे मेल्या विठ्या मूळमायेच्या कारट्या, विठ्या तुझें मढें गेलें, तुला देखून काळ रडे–

नामदेव–जास्त बोलूं नको. माझ्यानें ऐकवत नाहीं. गेली असती शुळावर तरी काय हरकत होती. अशा शिव्या देवाला देऊं नये.

राजाई– पण अशा शिव्या दिल्याबरोबर एकदम आवाज झाला. त्या शुळाचे राई एवढाले तुकडे झाले. तेव्हां मी ह्मणतें, त्या देवाची स्तुति नको. त्यानें आमच्या संसारांत बरकत येणार नाहीं. त्याची निंदाच केली पाहिजे. पण हें पहा, मामंजी आणखी सासूबाई आले. आतां मी त्यांना सगळें सांगतें. (गोणाई व दामाशेट प्रवेश करितात. नामदेव पळून जातो.)

दामाशेट–काय गडबड आहे? आला का नामदेव? आणलेका कापडाचे पैसे ?

गोणाई– नामदेव कोठें गेला ? काय हकीकत काय झाली ! तुमचीं भांडणें का चाललीं होतीं ? तूं त्याला राग येण्यासारखें कांहीं तरी बोललीस वाटतें ? अगोदर मुलाला व्यापाराची हऊस. आणि त्यांत आला पाऊस.

राजाई– मी कांहीं बोललें नाहीं बरें कां ! मीं ह्मटलें कापडाचें काय केलें ? पैसे आणलेत काय ? तेव्हां मला ह्मणायचें झालें कीं, धोंडोबाला जामीन घेऊन आलों आहें.

गोणाई–ते कशाला आणलेत–धोंडोबा आणखी ! खायला काळ! आमची खाण्याची पंचाईत, आणखी पाहुण्यांचा सुळसुळाट

दामाशेट–मोठ्यानें बोलूं नको. ते ऐकतील एखादे. रागावून निघून जातील. आपले पैसे बुडतील.

राजाई–सारा मेला खुळ्यांचा बाजार. धोंडोबानाईक ह्मणजे कांहीं माणूस नाहीं हो ! भिऊं नका. चिरंजीवांनीं एक मोठा थोरला धोंडा आणून तळघरांत ठेवला आहे. बाहेरून कुलूप लावून टाकलें आहे. आतां या शहाणपणाला काय ह्मणावयाचें असेल तें ह्मणा. नफानुकसान एका बाजूला राहिलें. सध्यां एक धोंडा मात्र आपल्या कापडाबद्दल मिळाला आहे.

दामाशेट–काय करावें या मूर्खाला ! हाळीला जातांना त्याला राघूसारखा पढवला बरें का ! चार मुलांचा बाप झाला, सुना सुद्धां आल्या. आतां याला काय मारावें, काय करावें तरी काय ! मला संताप येतो. मी आपला गिळून जातों. पोरें कोठें गेलीं ! अरे गोंद्या, (गोंद्या प्रवेश करतो.)

गोंद्या– काय म्हणतां आजोबा ?

दामाशेट– रावळांत जा. नामदेवाला म्हणावें तुला आतांचें आतां मीं बोलावलें आहे म्हणून.

गोंद्या– आणखी ते म्हणाले जा, मी साफ येत नाहीं. तर मग मीं काय करावें ?

गोणाई– रडत बसावें. काय मेलीं कारटीं तरी बापासारखींच टाळकुटीं होणार. बापाबरोबर देवळांत नेहमीं गाडून घेतात. जा त्याला घेतल्याशिवाय येऊं नको. (गोंद्या जातो) लोकांचे पैसे काढून त्याला कापड घेऊन दिलें. कापड गेलें. पैसेहि गेले. काय करावें आतां ? याला हाळीला पाठविलें नसतें तरी बरें झालें असतें.

तुमचा सगळा आग्रह. या पोराला या देवाचें व्यसन लागलेलें. या व्यसनांच्या पायीं कोणाचें बरें झालें नाहीं. भीष्म वैष्णवांत अग्रणी, त्याच्या सैन्याचा ठाव पुसला. रुक्मांगद मोठा भक्त म्हणवितो, त्याचा गांव ओस पाडला. ध्रुवबाळक कोडीसवाणी त्याचें येणें जाणें कुंठित केलें. उपमन्यु प्रेमाचा भुकेला, त्याला समुद्रांत नेऊन टाकला. व्यास, वाल्मिक, मोठाले कवि त्यांना दारोदार हिंडायला लावलें. आतां माझ्या नामदेवाला भिकेला लावलें. विठोबा चांगलें केलेंस बाबा! तुझी आतां काय उतराई होऊं (नामदेव प्रवेश करितो.)

नामदेव–

अभंग.

सुदामा ब्राह्मण कैसा दरिद्रें पीडिलागा ॥
ह्मणोनि धांवुनीया तुझे भेटीसी आलागा ॥
मुष्टीभर पोह्यासाठीं गांव सुवर्णाचा दिल्हागा ॥
विठोबाचा धर्म जागो त्याचे चरणीं लक्ष लागोगा ॥१॥

पांडुरंगा मी तुझीच स्तुति करणार. कारण कीं, गणपतीची स्तुति केली तरी तो तुझ्याच नामाच्या छंदानें नाचणारा आहे. सरस्वतीची स्तुति केली तरी ती तुझ्याच नामाचें गायन करते. ब्रह्मदेवाची स्तुति करावी तर त्याची उत्पत्ति तुझ्यापासूनच. केवळ तें तुझें पोटचें बाळ. शंकर तर तुझीच विभूति. वेदांची स्तुति करावी तर तूं त्यांची स्थापना करणारा. इंद्रादि देव तुझे बाहु. गंगा तुझी कन्या. लक्ष्मी तुझ्या पायाजवळ वास करणारी दासी. सारांश राजाची आणखी आपली समक्ष भेट झाली, तर सेवक जनाला विचारतो कोण? देव मला म्हणाले नामदेवा भिऊं नको. माझें नांव तुला निर्वाणीं उपयोगी पडेल. (आईबापांच्या पायां पडतो.)

गोणाई–कांहीं नाहीं. तूं कीर्तन करूं नको. ज्याचें तूं कीर्तन करतोस त्यानें प्रथमावतारीं शंखासुराला ठार मारलें. दुसऱ्या

अवतारीं कूर्मरूप धरून भक्त वाटेला लावले. तिसऱ्या अवतारीं डुकर होऊन दाढेवर धरणी धरली. चवथ्या अवतारीं खांबांत गुरगुर करून प्रऱ्हाद वेडा केला. पांचव्या अवतारीं बटूचें सोंग घेऊन बळीला पाताळीं दडपला. सहाव्या अवतारीं एकवीस वेळ सर्व पृथ्वी रक्तमय करून मातृहत्या केली. सातव्या अवतारीं रावण कुंभकर्ण मारले. आठव्यानें तर स्वतःच्या वंशाचें निसंतान केलें नवव्यानें कर्मठ ब्राह्मणांचें तोंड बंद केलें. आणखी दहाव सर्वांचा संहार करणार. सोड त्याचें नांव, कांहींरे उरणार नाहीं.

राजाई– कापडाचें काय झालें, तें विचारा अगोदर. धोंडा कशाला आणून तळघरांत ठेविला, तें विचारा. या भाकड कथा नकोत.

दामा०– चांगला उदीम केलास ! भांडवल गमाविलेंस ! मोठा चतुर आहेस गहूं दिलेस, आणखी त्यांचे भारंभार माती घेऊन घरीं आलास. काय तुला बोलूं काय ? तुला चांगला मार देतों. पण तुला आतां काय मारूं ! तुझें एवढें वय झालें ! मीं कशाला गाढवानें तुझ्याजवळ कापड दिलें, शेण खायाला ? आतां लोकाचे पैसे कोठले देऊं. (तोंडांत मारून घेतो.)

गोणाई– मी तोंडांत मारून घेतें. (तोंडांत मारून घेते.)

नामदेव– (दोघांचे हात धरतो.) तुह्मी इतका संताप कां करून घेतां ? कुळाला बरोबर घेऊन आलों आहें. त्याला घरांत कोंडून ठेवलें आहे. विनाकारण मला कां गांजतां ? पाहिजे असल्यास पैसे सव्याज त्याच्याकडून घेऊं. मग तर कांहीं हरकत नाहीं. मीं भांडवल गमावलें नाहीं. तुह्मी काळजी सोडा. इतका का मी मूर्ख आहें ? गणोबानाईकाच्या पदरीं सर्व कापड घातलें. त्यांनीं पैशाला आठ दिवसांची मुदत मागून घेतली. कुळ शहाजोग आहे. मुदत देणें योग्य वाटलें. त्यांनीं धोंडोबा नाईकाची निशा दिली आहे. पुरातनचीं कुळें भलीं माणसें आहेत. व्यापारांत विश्वास पाहिजे. वाटेल तितका माल खपेल.

राजाई– हजारों गाड्यांसुद्धां खपेल. कापड द्यावें, आणखी धोंडे घेऊन यावेत.

गोणाई– तो धोंडा घरांत कोठें ठेवला आहेस तो अगोदर बाहेर काढ. ह्मणजे तुझी चांगली फजिती करतें.

नामदेव– फजिती पांडुरंगाची. मला काय त्याची लाज आहे. येतो धोंडाबाला घेऊन, घ्या आपले पैसे मागून. (एकीकडे.) आतां मात्र मार खावा लागेल. पांडुरंगा, संभाळ आपलें ब्रीद–आपलें वचन. (सुदामाब्राह्मण कैसा दरिद्रें पीडिलागा वगैरे ह्मणत धोंडा आणावयास जातो.)

दामा०–गांवकऱ्यांत जर समजलें तर माझ्या अक्कलेची तारीफ होणार आहे. पोरगा असला मूर्ख आपल्याला ठाऊक. असें असून त्याच्याजवळ कापड विकावयास दिलें कशाला? असा जो तो प्रश्न विचारील. काय उत्तर देऊं तरी काय? (नामदेव सोन्याचा धोंडा घेऊन प्रवेश करतो.) अरे! पण मी हें काय पहातों आहें. हा धोंडा अंतर्बाह्य सुवर्ण झाला! नामदेवा मीं तुला व्यर्थ गांजलें. तुला शिव्या दिल्या. पण तूं आतां माझें एक ऐक. ही बातमी अगदीं गुप्त ठेव. नाहीं तर लोकांना हें एकदां का समजलें, कीं या धोंडोबाला घेऊन जातील.

गोणाई– काय माझा नामदेव शहाणा! असाच व्यापार करीत जावा. असा चांगला शहाणपणानें वागलास तर आपला लौकीक होईल. (गहिंवर येऊन नामदेवाची हनुवटी धरून) माझ्या बाळाला आम्ही सगळे विनाकारण गांजतों. नामदेव माझा किती भाग्यशाली! ज्याला हात लावील त्याचें सोनें होतें. म्हटलें राजाई, याची दृष्ट तरी काढ. मीठमोहऱ्या आणतेस काय?

नामदेव– द्रव्य हें महादुःखाचें जन्मस्थान आहे. रात्रंदिवस हें आपल्याजवळ राहील कसें याची काळजी? आईबापाबरोबर प्रतारणा करणारें, स्त्रीपुत्रांत भांडण उत्पन्न करणारें, आप्तवर्गांत वितुष्ट पाडणारें, असें आहे. द्रव्यापाशीं सर्व व्याधी असतात.

दुष्टबुद्धि द्रव्याजवळ रहाते. असत्याचें रहाण्याचें बिऱ्हाड द्रव्यापाशीं असतें. संतापाचें वस्तीस्थान द्रव्य. लोभी मनुष्याला द्रव्य नरकाला नेतें. द्रव्यासारखी वाईट वस्तु तिन्ही लोकांत नाहीं. मासा आमिषाला भुलून गळ गिळतो, पण मग तो जसा त्याची टाळू फोडून बाहेर येतो, त्याप्रमाणें लोभी पुरुष द्रव्याला भुलून नरदेहाला अधःपाताला पोंहोंचवितो. दरिद्री असून ज्याची वृत्ति शांत असते, तोच धन्य. नाहीं तर इंद्राची संपत्ति असून रात्रंदिवस तळमळत आहे, अशी स्थिति म्हणजे प्रत्यक्ष नरकवास. कुंतीनें देवाला काय मागितलें ? मला दरिद्र दे, म्हणजे मी तुला विसरणार नाहीं तुम्ही आतां असें करा, आपल्या कापडाचें मोल कापून घ्या. बाकीचें द्रव्य गणोबाकडे पाठवून द्या.

राजाई– गणोबा आणखी धोंडोबा मी साफ जाणत नाहीं. तुम्ही कोणी हात नका लावूं या सोन्याला. आतां मी याचे दागिने करणार. परवां गोणीभर होन ब्राह्मणांच्या उरावर घातले. आज असते, तर तें द्रव्य आणखी हें मिळून किती झालें असतें ? आज गर्भश्रीमान झालों असतों.

नामदेव—पण ज्यांच्या शेतांतून हे धोंडोबा आणले त्या शेताचा मालक आला आणखी आपले धोंडोबा परत मागूं लागला तर तूं काय करणार ? (कांहीं ब्राह्मण प्रवेश करतात.)

ब्राह्मण– नामदेवानें आमच्या शेतांतला दगड आणिला आहे. तो सोन्याचा झाला ह्मणून आह्मांस आतां इतक्यांत समजलें. बऱ्याबोलानें आमचा आह्मांस द्या. नाहीं तर सरकारांत पंचाईत करायला चला. त्या दगडावर मालकीचा हक्क आमचा आहे.

नामदेव– न्या महाराज आपला दगड. आपल्याला तो लखलाभ असो. आमच्या घरीं या धोंडोबानीं सोन्याचें रूप घेऊन भांडणें मात्र उपस्थित केलीं; फक्त आमच्या कापडाचे पैसे आमचे आम्हांस द्या.

ब्राम्हण–ठीक, ठीक चला देतों. (गोणाई व राजाई खेरीज करून सर्व जातात.)

गोणाई–मेल्यांचा सत्यानास होवो ! या मेल्यांना इतक्यांत कोणीं जाऊन सांगितलें ? पळस कोंकणाला गेला तरी त्याला तीनच पानें. आम्ही आपले समुद्रांत राहून कोरडे !

राजाई–हें सर्व कृत्य त्याचेंच. तो आहेना चित्ताचा चोरटा विटेवर उभा ! त्याचे सगळे खेळ आहेत. (पाय आपटीत हात चोळीत दोघी जातात.)

अंक चवथा समाप्त.

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

स्थळ– परशुराम भागवताचे वाड्यांतील कमळजेचा रंगमहाल.

(कमळजा वेणीफणी करीत बसली आहे.)

कमळजा– आमच्या धरीं आदिमाया श्रीरुक्मिणी देवी प्रसन्न करून वर मागितला कीं, माझें चित्त नेहमीं तुझ्या भजनीं रत असावें. मनांत उद्वेग नसावा. जगन्मातेनें सगुण रूपानें दर्शन दिलें. तूं माझें लेंकरूं आहेस, कांहीं काळजी करूं नको असें ह्मणून एक परीस दिला. आणखी सांगितलें कीं, याला जीवापलीकडे जप. शंभर यज्ञ केले ह्मणजे ज्याप्रमाणें इंद्रपद प्राप्त होतें ह्मणतात, तशांतली गत आमचे घरीं झाली आहे. घरांत जेवढें ह्मणून लोखंड होतें तेवढ्याचें सोनें करून तळघरांत ठेवलें आहे. अधीं घरांत अठराविश्वे दरिद्र होतें. पण परीस मिळाल्यापासून आतां कांहीं कमी नाहीं. (परशुराम भागवत प्रवेश करतो)

परशुराम– का, काय चाललें आहे ? आतां कांहीं दागिन्यांला म्हणून कमी नाहीं. सोन्याचा पाटावरवंटा करून जरी गळ्यांत बांधलास, सोन्याच्या लाटण्यानें पोळ्या लाटीन म्हटलेंस, सोन्याच्या मुसळानें कांडीन म्हटलेंस, अथवा सोन्याच्या रवीनें सोन्याच्या डेऱ्यांत घुसळीन म्हटलेंस, तरी हरकत नाहीं. अत्तरदाणी, गुलाबदाणी, पीकदाणी, राणीच्या महालांत तयार. सोन्याचा पलंग, मच्छरदाणीच्या दांड्या सोन्याच्या, सगळ्या घरांत सोनेंच सोनें. आतां सोन्याचें काय करायचें बाकी राहिलें आहे ? खायला नित्यशः बासुंदी, पुऱ्या, मोतीचूर, जिलबी, घिवर, मांडे, केशरीभात, वाटेल तें आहे !

कमळजा– खायला आहे एवढें मात्र खरं. पण एक ब्राह्मण पंक्तीला बोलावीन ह्मटलें, किंवा त्याला एक चार माशांचें वेढें दक्षणा ह्मणून देईन ह्मटलें, तर माझी कांहीं सत्ता आहे का ? अत्तरदाणी, गुलाबदाणी, पीकदाणी, मच्छरदाणी, नांवें मात्र अघळपघळ घेतां आलीं. पण यांतलें एक तरी घरांत केलें आहे का ? मग सोन्याच्या पलंगाचें तर नांवच नको. लांकडाचा बापजन्मीं मिळाला नाहीं, तो सोन्याचा मिळणार ! मनीं मांडें स्वप्नीं पु-या ! असल्या बोलण्याचा मला मनापासून राग येतो. नुस्तीं पक्वानांचीं हजार नांवें घेतलीं म्हणजे पोट भरतें का ?

परशुराम– तुला कळत नाहीं तें हेंच तूं आणखी मी घरांत वाटेल ती चैन मारूं. डागिने लोकांना डौल दाखविण्याकरितां अंगावर घालायचे, त्यांची गरज नाहीं. लोकांच्या डोळ्यावर येतें समजलीस ? बाहेरून मी किती विरक्त आहें, असें लोक मला समजतात. साधुसंतांत सुद्धां मला विरक्त ह्मणून मान देतात. इकडे पक्वान्नें खाण्यांत कांहीं कमी नाहीं. तुझी माझी जोडी. मनसोक्त चैन मारीत आहों. पुनः आपले साधु ते साधु ! विरक्त ! !

कमळजा– असले साधु ह्मणजे प्रवाशांना रस्त्यावर लुटणारे मैंद असतात, ते होत बरें का ? हा तुमचा मुलामा दिलेला साधुपणा एक दिवस खास बाहेर फुटणार. पुजारी जसें खोटेंच अंगांत आणतात, तसे तुह्मी खोटे साधु. साधूंना हें अंतर्यामीं कळत नसेल काय ? जेवला किंवा उपवासी तोंड पाहिल्याबरोबर समजतें. कपटी आहे किंवा निष्कपटी भाषणावरून समजतें. दिव्याच्या प्रकाशावरून त्यांत तेलवात आहे किंवा नाहीं हें समजतें. चतुर आहे किंवा मूर्ख आहे याची साक्ष डोळेच देतात.

परशुराम–पुरे झाली तुझी बडबड. मला आतां खायला आण. अटींव दूध, बदामपाक, केशरी बर्फी, खाऊंदे मला अगोदर. पोटांत आग पडली. (एकीकडे) बाकी आजच्या बोल-

ण्याच्या झोंकावरून—श्रोते दुश्चित आहेत किंवा स्वस्थ मानसयुक्त आहेत हें जसें वक्त्याला तेव्हांच समजतें—तसें आजच्या बोलण्यावरून बहुतेक फांक.च दिसतो. (उघड) मीं काय ह्मटलें ऐकूं नाहीं का आलें ? खायला आण.

कमळजा—माझे कान कांहीं फुटले नाहींत समजलांत ? ह्मणे पोटांत आग पडली ! मेलें खायचें खायचें तरी किती ? साऱ्या दिवसाची मोजदाद घेतली तर आतांशा जवळ जवळ एक पायलीभऱ्याचा आहार वाढला आहे बरें का ? (मोठ्यानें) आज घरांत कांहीं शिल्लक नाहीं. ह्मशीनें लाथ मारली. दूध मिळालें नाहीं. बदामाच्या वड्या उंदरांनीं खाल्ल्या. केशरी बरफी आणायला हलवायाच्या घरीं मनुष्य पाठविला होता, पण त्याच्या घराला आग लागली होती. अटपला कारभार. पाहिजे असल्यास स्वतः बाजारांत जाऊन यावें.

परशुराम—घरांत असून मला देत नाहीं. किती हट्टी बायको आहेस ? तुझ्या गळ्याशपथ पोटांत आग पडली आहे. (एकीकडे) संसारांत बायको अनुकूळ नसली म्हणजे त्या पुरुषाला सुखाचा वारासुद्धां नाहीं. कुठली हडळ माझ्या पदरांत पडली आहे कोण जाणे ! (उघड) देतेस कीं, नाहीं खायाला ? का जाऊं बाजारांत. एका हलवायाचें घर जळालें म्हणून बाकीचे हलवाई तर जळाले नाहींतना ? सगळें घरांत आहे. पण मला छळायचें ! दुसरें काय ? देतेस का मग ?

कमळजा—देतें. पण मीं म्हटलें होतें तसें वागण्याची मला मोकळीक पाहिजे. एक दिवस, निदान आजच पुष्कळ सोन्याचे दागिने अंगावर घालून मी विठोबारुक्माईला जाणार. (हळूच) रुक्माबाईनें तुम्हांला परीस दिला ह्मणूनच तुमच्या पोटांत आग पडलीना ? तुम्हांला गोडगोड खायला व्हावेंना ? पण त्या परिसाच्या योगानें जें सोनें घरांत झालें आहे, त्याचे दागिने अंगावर घालून मी देवी रुक्मिणीकडे गेलें तर तिला समाधान वाटेल

कीं राग येईल ? (मोठ्यानें) म्हणा एकदां होय म्हणून. लोकांनी जर दागिने दाखवायचे नाहींत तर घरांत असले काय आणखी नसले काय सारखेच. मी कांहीं साफ ऐकणार नाहीं. रुसून बसेन. बोलायची नाहीं. माहेरीं निघून जाईन. असली माझी गरज तर होय म्हणा, नाहीं तर राहिलें.

परशुराम–काय करावें आतां ? तुझ्यापुढें माझें कांहीं चालत नाहीं. भरलींच आमचीं शंभर वर्षे. लोक तुला विचारणार दागिने कोठले आणलेस ! तुला उत्तर देतां येणार नाहीं. पंचाईत होणार. गांवांत बभ्रा होणार. पुढें दरोडे पडणार. सगळें सोनें जाणार. तो परीसही जाणार. अधिकारी मला धरून नेणार, उलटा टांगणार, मिरच्यांची धुरी देणार, हाल हाल करणार.

कमळजा–काय नशिबीं असेल तें होईल. तें कांहीं चुकत नाहीं. पण मी आज जाणार. परिसाबद्दल मी कोणाजवळ बोलणार नाहीं. शपथ वाहतें. सोन्याचा पिंजरा केला ह्मणून आंतल्या पोपटाला कांहीं सुख आहे का ! मिरवायला नाहींत, दाखवायला नाहींत, ह्मणे पुष्कळ जिनसा पेटी घालते. उपयोग काय ! होऊंचद्या एकदां मोठें मन. कराच मनाचा धडा. जाऊं द्या मला सगळे दागिने अंगावर घालून देवाला. आणखी तुह्मी बाजारांत जाऊन बरफी घेऊन या. आज खरोखरच घरांत नाहीं.

परशुराम–जा, पण परीस आपल्या घरांत आहे, हें मात्र बोलूं नको. नाहीं तर जर का बोललीस, तर त्याबद्दल मला शुळावरसुद्धां चढवितील. आणखी तुला मग (रडत) वैधव्य-दशेंत दिवस काढावे लागतील. म्हणून मला वाईट वाटतें. सोड हा हट्ट !

कमळजा–(पायांवर हात मारते.) तुह्मी रडूं नका. बरफी आणून खा. ह्मणजे पोटांतली आग जरा कमी होईल. या पायां-शपथ परिसाबद्दल मी अवाक्षर काढणार नाहीं.

परशुराम–जातों मी बरफी घेऊन येतों. काय करावें ? रोज

खाण्याची चटक लागली. एक दिवस नसलें कीं पोटांत आग पडते. संभाळ बरें. जातों मी. (जातो. राजाई प्रवेश करते.)

कमळजा– गडे राजाई, तूं माझी बाळपणची सोबतीण फार दिवस विचारीन विचारीन ह्मटलें. तूं आतांशा अशी कष्टी कां दिसतेस. घरांत कांहीं अन्नवस्त्राला कमी आहे काय ? जिवाची गुप्त गोष्ट सांगण्याला माझ्याजवळ लाजूं नको. मी तुझी जिवलग सोबतीण आहें. तुझी पाठची बहीण आहे असें समज.

राजाई–(रडत रडत) काय सांगूं तुला. घरधन्यानीं लाज सोडली ! रात्रंदिवस मान नाहीं, अपमान नाहीं, संसाराची काळजी नाहीं, त्या विठोबाचें डोसकें धरून बसतात. वाढतें कुटुंब, अन्न नाहीं, वस्त्र नाहीं, काय उपाय करूं? लोकांच्या मुली करून आणल्या त्यांना तर खायला पाहिजे ? कांहीं तरी मला उपाय सांग, कमळजाबाई.

कमळजा– मला बाई मोठें आश्चर्य वाटतें. नामदेव ज्याचें इतकें लक्ष लावून भजनपूजन करतो, त्यानें तुह्मांला कांहीं दिलें नाहीं कसें ? ज्या झाडाला फळें येत नाहींत, फुलें येत नाहींत अशा झाडाला पाणी घालून तरी काय उपयोग आहे ह्मणतें ? विहिरीला जर पाणी लागत नाहीं तर रिकामी उकरून उकरून तरी काय करायचें आहे ? लग्नाला येऊन अहेर जर करीत नाहींत, तर तसल्या सोयऱ्यांना लग्नाला मेलें बोलवावें तरी कशाला ? औषधानें जर गुण येत नाहीं तर जीभ तरी कडू कशाला करून घ्यावी ? शेतांत कांहीं पिकत नाहीं तर नांगरण्याचे आणखी पेरण्याचे विनाकारण श्रम कशाला ? ह्मणून ह्मणतें, असल्या देवाची भक्ति करून फळ काय ? आमच्या घरीं बाई देवी रुक्मिणीला प्रसन्न करून घेतली. तिनें संतुष्ट होऊन एक परीस–

राजाई–परीस ! परीस कसला असतोग बाई ?

कमळजा–(एकीकडे) आतां काय करावें ! बोलूं नये तें बोललें. आतां वाहिलेल्या शपथेचें मला भानच नाहीं. पण मीं ह्मटलें

मी तुझ्या पाठची बहीण आहें. तिनें मला सर्व सांगितलें. आतां इच्याशीं कांहीं चोरून ठेऊं नये. (उघड) हें बघ राजाई, परीस कीं नाहीं पांढरा असतो बरें का ? आणखी तो लोखंडाला लावला म्हणजे त्याचें बावनकशी सोनें होतें. आह्मीं आपल्या घरांत पुष्कळ सोनें करून ठेविलें आहे.

राजाई– कमळजे, मला एकदां परीस दाखविनास कसला असतो तो ? एक घटकाभर जर मला देशील, तर घरीं घेऊन जाईन. पुष्कळ सोनें करून ठेवीन. लागलींच तुला तुझा याच पावलीं परत आणून देईन. दाखवितेस का मला परीस कसला असतो तो ?

कमळजा– दाखवितें ! पण बाई आतां घरीं यायची वेळ झाली आहे. त्यांना जर का हें समजलें कीं तुला परीस दिला आहे ह्मणून– ह्मणजे मग माझा तरी जीव घेतील, नाहीं तर आपला तरी माझ्यापुढें देतील म्हणून भय वाटतें बाई !

राजाई– तूं विनाकारण भिऊं नको. ते कांहीं आतां इतक्यांत येत नाहींत. पहा मी चिखलांत रुतलेली गाय आहें. मला या दरिद्रांतून बाहेर काढ. पाठची बहीण ह्मणवितेस ह्मणून मागतें. एक घटकाभर दे. माझी तुला दया येऊं दे. (रडते.)

कमळजा– तुझें गरिबीचें बोलणें ऐकलें ह्मणजे पोटांत कसें तडतडा तोडतें ! दाखवितें तुला. जा घरीं घेऊन. पण याच पावलीं आणून दे. आणखी कोणाला सांगशील तर मला चिरून खाशील हो ! अगदीं चोरून काम कर. काळजाच्या पलीकडे त्याला ठेव. (संबळींतला परीस बाहेर काढते.) हा पाहिलास का ? पांढरा असतो. हा लोखंडावर जरा घासावा, कीं लागलेंच सोनें होतें. तुझ्याजवळ किल्ली आहे का ?

राजाई– आमच्या घरीं मुळीं कुलपेंच नाहींत. मग किल्ल्या कशाला बाळगायच्या ? नेहमीं घर उघडें. कुत्र्यानें यावें, आणखी भाकरी घेऊन जाव्या. नेहमीं असें चालतें.

कमळजा- बरें, जा हा घेऊन. पण तुझ्या घरीं लोखंड तरी आहे का पुष्कळ!

राजाई- लोखंड ही माझ्या घरीं नाहीं. खापराच्या घागरी-मडकीं पुष्कळ आहेत. हा जर खापरावर घासलों तर खापराचें सोनें होईल का?

कमळजा- आग लागो तुझ्या संसाराला? खापराला परीस काय करणार, रडणार! कातरी, सुई, दाभण, स्वयंपाकाची पळी, उलथणें, निदान भाकरीचा तवा, कांहीं तरी असेल ना? का खापरांतच भाकरी करतां?

राजाई- हो गडे हो. गज, कातरी, अंगुस्तान, चाती हीं माझ्या घरीं आहेत. जातें मी आतां. (लांब पाहिल्यासें करून) हे तुमचे यजमान आलेच वाटतें? जातें मी आतां. (जाते. परशुराम भागवत प्रवेश करतो.)

परशुराम- ही देवांतली संबळी ह्या वेळीं कशाला बाहेर आली? खंडोगणती सोनें करून ठेवलें आहे,' तरी तुझा सोस अजून कमी झाला नाहीं. आण तो परीस इकडे. मी आतां लांब ठेवून देतों. (संबळींत परीस पाहतो.) यांतला परीस काय झाला? घालविलास वाटतें? का दिलास कोणाला? केलास तरी काय? दुष्ट आहेस. (ओरडून) जन्माची जोड हरविलीस. उदंड यत्न केलेस तरी मिळणारी वस्तु नव्हे. आतां काय करूं! माझा सर्वस्वीं घात केलास. चांडाळणी कोठें आहे माझा परीस? (उरावर हाणून घेतो.)

कमळजा- इतकें बावचळायला काय झालें काय? मी मेलें काय? का गेलें कोठें निघून? धडा धडा उरावर हाणून घेतां? मेली माणसाला कांहीं लाजच नाहीं! परीस कांहीं कोणीं खाल्ला नाहीं बरें का? राजाई आतां येथें आली होती. तिच्या घरीं अठराविश्वे दरिद्र, गरीबासारखी रडूं लागली. मला दया आली, म्हणून घटकाभर घेऊन जा म्हटलें. आतां आणून देईल.

परशुराम– मला तींच भीति वाटत होती. तो नामदेव त्याचीं कारटींपोरटीं, त्याची भांडखोर बायको, आणखी त्याचे म्हातारडे आईबाप, तिकडे उलथून गेले म्हणून तुला मला कांहीं सुतक येणार होतें का? लवकर परीस देऊन बसलीस. शपथ मोडलीस. माझ्या घरांतून आतां चालती हो. नाहीं तर दंडाला धरून बाहेर घालवीन. परीस घेऊन ये आपल्या बापाचा. जा तिच्या घरीं. माझ्या पायांवर हात ठेवून ताडकन् शपथ वाहिलीस! लागलींच मोडलीस. एक घटका लोटली नाहीं. मी मेलों तर तुझ्या डोळ्याला पाणी सुद्धां येणार नाहीं. सोंवळी सुद्धां होणार नाहींस. अशी तूं बेमान आहेस! पतिव्रतेचा गांवभर डंका!

कमळजा– काय बोलणें हें! शिव शिव! कानांनीं ऐकवत-सुद्धां नाहीं! जिभेला कांहीं हाड आहे का? बोलण्याला कांहीं ताळतंत! चारी वेळा सारख्या नसतात बरें का? नामदेव महा-साधु आहे. परिसाचा अभिलाष करणार नाहीं. लाखों परीस त्याच्यावरून ओवाळून टाकावे. ह्मणे सोंवळी होईन किंवा नाहीं! काय बोलतां काय! तुमचें तुम्हांला शोभतें! एकदां मरून तरी पहायचें होतें. म्हणजे सोंवळीच तर काय पण सती जातें किंवा नाहीं! मी कांहीं त्या भिकंभटाच्या फकडीसारखी नाहीं हो! साऱ्या पंढरपुराला माहीत आहे. परवां जिवावरचें दुखणें इकडे झालें होतें, तर मीं तोंडांत पाणी घातलें नाहीं.

परशुराम– मला तोंडपुजेपणा नको. घरांतून चालती हो. परीस आणलास तर घरांत घेईन, नाहीं तर तूं मला मेलीस आणखी मी तुला मेलों. काय ह्मणे नामदेवावरून लाखों परीस ओवाळून टाकावेत. मग कशाला घरांत अन्नान्न-दशा झाली! जा लवकर. माझ्या दृष्टीसमोर उभी राहूं नको. मला शत्रूसारखी दिसतेस. जातेस कीं नाहीं? (तिचे दंडास धरून घालवून देतो.) गेली एकदाची पिडा. पण आतां परीस घेऊन येईल किंवा नाहीं? काय करूं? माझ्या शरीराला

आग लागली. मला कांहीं सुचत नाहीं. आतां ही येगार केव्हां? परीस मिळतो कसा? गेला हो गेला! (डोकें फोडतो.) परीस! परीस!! परीस!!! (मूर्च्छित पडतो. पडदा पडतो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ– नामदेवाचें घर.

(नामदेव देवाला नैवेद्य खायला घालून रिकामी ताटवाटी घेऊन प्रवेश करतो.)

नामदेव– आज मीं देवाला खायला काय घातलें? जोंधळ्याच्या कण्या आणखी अंबाड्याची भाजी! रुक्माबाईनें केलेलीं पंचपक्वान्नें त्याला रुचत नाहींत. माझी गरीबाची भाजीभाकर मिटक्या देत देत खातो. ह्मणतो काय, नामदेवा, आकाशाला जसें पाठपोट नाहीं, तसा तूं आनंदरूप आहेस. सदोदित चिद्रूप आहेस. तूं तोच मी. एकविध आहों. माझ्याकारितां तूं देह वाळवितोस. तुझें तोंड कोमेजून जातें. तुझी कोणी भूक–तहान पहात नाहीं. तुझ्याशिवाय मला दाही दिशा ओस वाटतात. तुला कशाची उपमा देऊं? सूर्याची द्यावी तर तो अस्तास जातो. चंद्राची द्यावी तर तो एकच दिवस संपूर्ण असतो. मेघाच्या उदारपणाची द्यावी तर तो क्षणांत वितळून जातो. तुझ्या मुखांत नेहमीं कृष्ण, विष्णु, हरि, गोविंद ही नामावली चालली आहे. मी वैकुंठांत नाहीं. तुझ्या दारीं पडून राहतों. तुझे चरणरज मी आपल्याला भूषण ह्मणून लावितों. तुझी भाजीभाकर म्हणजे माझें अमृत. तुझें संध्येचें पळीभर पाणी म्हणजे मला क्षिराब्धीप्रमाणें. तुझ्या हातचें गंध म्हणजे सुगंधाचा महामेरू. आणखी तुझें तुळसीपत्र म्हणजे कौस्तुभापेक्षां निर्मळ भूषण. पांडुरंगा, काय मला हें श्रेष्ठपण देत आहां? ही तुमची स्तुति ऐकून मीठ ज्याप्रमाणें पाण्यांत विरघळून जातें, त्याप्रमाणें मी विरघळून जातों. आतां

पुनः माझी अशी स्तुति करूं नका. माझी भक्ति निष्कलंक नाहीं. भोळा भाव मानून घ्या. पण आज घरांत पक्कान्नांचा घमघमाट कसला सुटला आहे ? माझ्या पांडुरंगानें कण्या आणि अंबाडया-ची भाजी खाल्ली. आणखी मी हें घरांत काय पहातों आहें ?

(राजाई पक्वान्नांचें ताट वाढून आणते.)

राजाई–आतां जेवायला बसायचें बरें का? आज सगळें यथास्थित आहे. कांहीं कमी नाहीं. आजपासून तुम्ही संसाराची चिंता करीत जाऊं नका. आतां मी तुम्हांला तेल, तूप, मीठ, साखर, गूळ, खोबरें, लुगडीं, चोळ्या, कांहीं आणा म्हणून कधीं कधीं म्हणणार नाहीं. तुम्ही फक्त दोन्ही वेळां जेवीत जा. आणखी पोटभर भजन करा. फक्त एवढें करावयाचें कीं, हें घरांत आलें कोठून, आणखी हें मिळतें कसें याची मात्र पंचाईत करूं नका. जगदंबेच्या कृपेनें सर्व कांहीं उत्तम आहे.

नामदेव–मला तुझी जगदंबा नको, आणखी तिची कृपाही, नको आहे. एक पांडुरंगाशिवाय मी कांहीं जाणत नाहीं. हे लाडू, ही जिलबी, आली कोठून ? तीं मला विषाप्रमाणें कडू लागतात माझ्या पांडुरंगानें भोजन केलेलें उष्टें ताट मी विसळून पितों. (पितो) अहाहा ! हें मला अमृतापेक्षां गोड लागतें. कोणाच्या कपाळीं हें सुख आहे ! त्रिभुवनींचा राजा असला तरी त्याला यांतला एक थेंब मिळणार आहे काय ?

राजाई–उष्टें पाणी पिण्याची रोजचीच वहिवाट आहे. तें पाहिजे असल्यास पीत जा. आम्हांला कांहीं नको आहे. पण आतां जेवायचें ना ? दुपार झाली. भूक लागली असेल ?

नामदेव–हें आलें कोठून माझ्या घरांत ? हें अन्न मनुष्याला मदांध करणारें, मला नको आहे. हें माझ्या घरांत आलें कोठून ? हें समजल्याशिवाय मीं मुळींच जेवणार नाहीं.

राजाई–हें अन्न अगदीं पवित्र आहे. पवित्रस्थळापासूनच उत्पन्न झालें आहे. जगन्मातेचा प्रसाद आहे, बेलाशक खा.

निदान आजच्या दिवसं खा. उद्यांपासून आपली रोजची उडदा-ची खीर आणखी जोंधळ्याच्या पुऱ्या आहेतच.

नामदेव– आलें कोठून ? तें मला अगोदर सांग. चोरी का केलीस ? केलेंस तरी काय ? ही अंबाबाई कोण ? तिनें तुला काय म्हणून ही सामुग्री दिली ?

राजाई– तें कांहीं विचारायचें नाहीं. मुकाट्यानें खायचें. तुमचें काय अनहित झालें ? चांगली संसाराची काळजी दूर झाली. हरीभजनाला मोकळे झालांत. लग्न, कार्यें, बाळंतपणें कशाची काळजी नाहीं. चांगलें सोन्याच्या ताटांत जेवा म्हणतें. पण तुमची नरोट्यांत जेवायची संवय. कशाला पाहिजेत इतक्या पंचाईती ? आलें कोठून ! आणि गेलें कोठून ! मुकाट्यानें जेवा.

नामदेव– अंबाबाई आतां अंगांत आली वाटतें ? दहींभात-नारळ पाहिजे का ! मी मुळीं जेवीतच नाहीं. तूंच खा ते लाडू, करंजा. हा मी चाललों राउळांत. (जाऊं लागतो.)

राजाई– (त्याचा हात धरून आणते.) हें पहा बोलूं नकाहो कोणाजवळ, नाहीं तर बोभाट होऊन तिच्या नवऱ्याला कळेल.

नामदेव– अंबाबाईच्या नवऱ्याला होय ! अंबाबाईचा नवरा–

राजाई– तसें नाहीं हो. हें पहा, आपल्या घरांत तिळभर अन्न नाहीं. खाण्यावांचून पोरें तडतडा तोडतात बरें का ! तुह्मी आपल्याला पांडुरंगाचे भक्त ह्मणवितां, पण व्यर्थ ! देवाजवळ तुम्ही कांहीं मागत नाहीं.

नामदेव– एका भक्तिसुखाशिवाय मला कांहीं नको. मला वैकुंठकैलासाची चाड नाहीं. सर्व काळ पांडुरंगाची सेवा करीन. कीर्तन करीन. माझ्या चित्ताला हेंच समाधान आहे. ऋद्धिसिद्धि या जरी माझ्या दासी झाल्या तरी मला नको आहेत. एक पांडु-रंगाची चरणसेवा मला पाहिजे.

राजाई निदान अन्नवस्त्र तरी मागाल ! जेवायला लागतेंना तुम्हांला !

नामदेव– भक्ति हेंच पान. परब्रह्म हें पक्वान्न. अनुभव हाच भात. सुखशांति हीच भाजी. भावार्थ हे वडे. दया हीच पुरण-पोळी. पांडुरंगाविषयीं प्रेम हेंच तूप आत्माराम भोक्ता. विषयांची चूळ भरून टाकली. नामदेव संसार आंचवला.

राजाई–आतां काय बोलावें बाई यांच्यापुढें ! जेवा मुकाट्यानें मी सगळें सांगतें. परशुराम भागवतानें रुक्मिणीमातेची सेवा करून तिला प्रसन्न केलें. तिनें त्याला एक परीस दिला. त्याची बायको कमळजा, ती मला अगदीं पाठच्या बहिणी-प्रमाणें मानते बरें का ? (हळूच) तिनें मला तो परीस एक घट-काभर दिला आहे. लोखंडाला घासून त्याचें मीं थोडेसें सोनें केलें. पण आतां दहा पंधरा सुरुंग खोदण्याच्या पहारा आणून द्या, ह्मणजे त्यांचें सोनें करतें. आणखी तिचा तिला नेऊन देतें. (मोठ्यानें) का, कशी आहे युक्ति ? माझ्यासारखी बायको तुह्मां-ला मिळायची नाहीं. दोन वेळां तुम्ही घरांतली संपत्ति घाल-विलीत. पण आतां मात्र तसें करूं नका. चांगल्या लांब लांब पहारा मात्र आणून द्या. जन्माचें दारिद्र्य काढून टाकतें.

नामदेव–शाबास धन्य आहे तुझी ! बायको असावी तर अशी असावी, नाहीं तर व्यर्थ जन्म !

राजाई–(खांद्यावर हात ठेवून) खरेंच का पण हें ? इतक्या प्रेमानें माझ्याशीं तुम्ही कधींच बोललां नव्हता. पण आज मला किती आनंद वाटतो ! आतां गडे आपण अगदीं सुखांत दिवस घालवूं बरें का ? दरिद्राची कटकट गेली. आतां दहा पंधरा पहारा आणा लवकर.

नामदेव–जातों मी बाजारांत. प्रत्येक विसाड्याकडे पहा-रांचा शोध करतो. हें तूं फारच उत्तम केलेंस. पण मला परीस कसला असतो तो दाखीव तर खरा ?

राजाई–(परीस दाखविते) हा पाहिलात का ? काय याच्या

अंगीं हा विलक्षण गुण आहे ! याची तुम्ही काय किंमत कराल ? तुमच्या हातांत मी देणार नाहीं. दहा वीस पहारा आणा

नामदेव– (हिसकावून घेतो.) याची किंमत फुटकी कवडी ! याचा मला विटाळ झाला. मी चंद्रभागेवरून स्नान करून येतों.

राजाई– तुह्मी पहारा आणा. तो परीस आणा इकडे. (त्याच्या हातास झोंबते, तिला दूर लोटून नामदेव निघून जातो. कमळजा प्रवेश करते.)

कमळजा– माझा परीस मला आतां दे. घरधन्यांनीं माझी धिंड काढली. मला दंडाला धरून घराबाहेर हांकून दिलें. असा प्रसंग येईल याचें मला स्वप्न सुद्धां पडलें नव्हतें बरें का ? मेली पुरुषाची जातच अधिरी. आण माझा परीस.

राजाई– आतां बाई काय करूं ? माझ्याकडून मोठा अपराध घडला. तुझ्या पायां पडतें. तुला पदर पसरतें बरें का ? नदीवर स्नानाला गेलेत घरधनी परीस घेऊन. आतां येतील. आल्याबरोबर तुझा तुला देतें, थोडा दम खा.

कमळजा– थट्टा करतेस होय माझी ! तुला लाज वाटत नाहीं ? मी नांवाची कमळी आहें. या घटकेला परीस घेईन. तुझा नवरा मोठा लाडकाच किनई ! बैस आपली घेऊन ! मला त्याचें पडप कशाला ? शहाणपणाचा तोरा माझ्यापुढें चालायचा नाहीं म्हटलें ! आणतेस का नाहीं परीस बऱ्याबोलानें ? नाहीं तर तुझ्या जोत्याशीं धडक घेऊन रक्ताचें शिंपणें करून घेईन. जीभ आसडून आतां प्राण देईन. आण माझा परीस. अगे सटवाई, माझा परीस आण. (डोकीचे केंस ओढते.)

राजाई– अंगांत आली यमाई वाटतें ? खाल्ला का गिळला अगदीं ! काय बाई ढालगज आहे तरी ? जीव द्यायचा असला तर चंद्रभागेंत जाऊन दे. म्हणजे मुक्तीला जाशील. माझ्या दारांत नको. जीव देते जीव ! वाटेवरच पडला असेल ? जीव देण्याचें तोंड पहा. अशा धमकावणीला मी भिणारी नाहीं समजलीस !

मीही पण नांवाची राजाई आहें. मला कांहीं तुझा परीस नको. कोणीकडून बाई बुद्धि झाली आणखी मेला तो पांढरा परीस घरीं घेऊन आलें कोण जाणें ? (जाऊं लागते.)

कमळजा–(तिचें मनगट धरून) चाललीस कोठें ? परीस टाक आपल्या आईचा. पळून जातेस होय ? तुला जाऊं देईन काय ? रस्त्याला ओढून नेईन ! तुला मारीन. तुझी सगळ्या पंढरपुरांत वरात काढीन. आतांचे आतां परीस घेईन. गमजा नाहीं चालूं देणार. शिंप्यांची जात, मेली साऱ्या मुलखाची चोरटी ! कापड चोरतां चोरतां जन्म गेला ! तिला वाटलें, परीस चोरावा. डोंगर गिळशील पाहिजे तर. पण परीस नाहीं गिळूं देणार. आण माझा परीस.

राजाई– झोंबू नको माझ्या अंगाला. शिंप्याची जात चोरटी तर खरीच, पण देव त्यांच्या घरीं शिळे तुकडे सुद्धां खातो. ब्राह्मणाची जात मोठी उंच सोंवळ्याचा डौल मारते, पण देव वाऱ्यालासुद्धां उभा रहात नाहीं. मग तुमच्यापेक्षां आह्मी शिंपीच बरे नव्हे का ? एक परीस कोठें मिळाला आहे, तो इतकी फुगून गेलीस ! माझ्या नवऱ्यानें देवाजवळ परीस मागितला, तर पर्वताएवढाले परिसाचे ढीग पडतील समजलीस ?

कमळजा– मग तोंड शिवलें आहे वाटतें ? मागावा कीं नाहीं एखादा. भिकारी ते भिकारी आणखी दिमाख पहा ! पायांत घालायला पायपोस नाहीं तुझ्या नवऱ्याला. मिजास बादशहाची पण नांदणूक कैकाड्याची ! ब्राह्मण तुला क्षुल्लक वाटतात अगदीं, पण ब्राह्मणानें देवाच्या छातीवर लाथ मारिली. तें भूषण ह्मणून देव मिरवितो !

राजाई– उन्मत्त, माजले मेले ! देवाला लाथ मारतात ! दारोदार भीक मागत हिंडतील. लाथ मारणारे ब्राह्मण पूर्वींचे गेले. आतांचे तुह्मी ब्राह्मण. तुम्हांला त्यावेळच्या ब्राह्मणांच्या नखाची सर येणार नाहीं. ते ब्राह्मण पैशाला शिवत नव्हते.

देवाजवळ कवडी मागत नव्हते. तुझ्या नवऱ्यानें दाताड विचकून आईसाहेबांजवळ परीस मागितला. कोठें गेली होतीस मिळवायला?

कमळजा–माझ्या नवऱ्यानें आईसाहेबांजवळ दांत विचकले, आणखी तूं माझ्याजवळ दांत विचकलेस. आतां बऱ्या-बोलानें माझा परीस मला दे. मला घरीं जाण्याला उशीर होत आहे बरें का ! अजून कां नाहीं आलें, ह्मणून आतां मला इकडे पहावयास येतील. तुझी आणखी माझी फजिती होईल. मी चुकलें, झक मारली, शेण खाल्लें आणखी तुला परीस दिला ! तोंडांत मारून घेतें बरें का ! (तोंडांत मारून घेते.) तुझ्या पायां पडतें. (पायां पडते. परशुराम भागवत प्रवेश करतो.)

परशुराम–पड आतां तिच्या पायां. घास तिच्यापुढें नाक. एकदां सोडून हजार वेळां पायां पडलीस ह्मणून तुला आतां ती परीस देणार होय? आतां बोलून काय उपयोग? मीं ह्मटलें तसें झालें. आतां अडला नारायण गाढवाचे पाय धरी. (राजाईस उद्देशून) काय बया, आई, तुला वाटेल तें ह्मणतों. कृपा कर आणखी आमचा परीस आह्माला दे. नाहीं तर घरांतली विळी घे, नाहीं तर पाटावरवंटा घे आणखी आमच्या दोघांच्या डोक्यांत घाल. ह्मणजे तुझ्या मनासारखें होईल. अनायासें तुला परीस गिळायला सांपडेल. नाहीं तर आण पाटावरवंटा. मी आपल्या हातानें ह्या हडळीच्या डोक्यांत घालतों ! कोणत्या हातानें परीस दिला तो हात अगोदर विळीनें कापून टाकतों ! (संतापानें वेडा होऊन) आतां काय करूं ? नारायणा, नारायणा, माझा परीस गेला ! आतां मी कांहीं जगत नाहीं ! मरतों आतां. ओरडून ओरडून माझा घसा कोरडा ठणठणीत पडला ! मला घेऱ्या येऊं लागल्या ! डोळ्यांपुढें अंधारी आली. माझे हातपाय गळून गेले ! मरतों मी आतां (भुईला अंग टाकतो.)

कमळजा–अहो धांवा हो धांवा. ह्या अकाबाईनें माझा नवरा ठार मारला. आतां देवा माझें कसें होईल ! मला आतां कोणी

नाहीं. परीस नाहींतर नाहीं, आणखी ते गेले! आतां कोणाच्या जिवावर दिवस काढूं? मीं आपल्या हातानें आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतला! मला कशी बुद्धि झाली! या चांडाळणीच्या हवालीं मीं आपला परीस केला. (परशुरामाचा श्वास पहाते.) अगदीं श्वासोच्छ्वाससुद्धां बंद पडला! आतां ते कांहीं जगत नाहींत. आतां आह्मीं दोघें मरून तुझ्या मुलाबाळांच्या बोकांडीं समंध होऊन बसतों. तुझ्या खळ्या खळ्या खणतों. तुझ्या वंशाचें नकल करतों. घे आह्मां ब्राह्मणांचे शाप आपल्या पदरांत! ब्राह्मणाच्या शापानें कुळक्षय होतो! (नवऱ्याच्या अंगावर अंग टाकते.)

राजाई–तुम्ही दोघे आपल्या घरीं जा मरायला. नाहीं तर लोक ह्मणतील, उगीच ढोंग करतात. कोणाला खरें वाटणार नाहीं. नाहीं तर नदीवर चला मरायला. ह्मणजे लोक आणण्याची खटपट नको. (एकीकडे) हे खरे मेले आहेत किंवा खोटे याची परीक्षा अगदीं थोडक्यांत आहे. करूं का परीक्षा? त्या परिक्षेनें हे जिवंत तर खास होतीलच. पण पहिल्यापेक्षां आपल्या जिवाचा जास्त आटापिटा करतील. करीनात केला तर! माझ्या बापाचें काय जातें आहे? आम्हांला कांहीं यांच्या परिसाचा अभिलाष करायचा नाहीं, कांहीं नाहीं. तर मग असेंच करावें. (एक कवडी फडक्यांत गुंडाळून हातांत घेते व उघड ह्मणते.) अहो परशुराम महाराज, अगे कमळजे, हा घ्या आपला परीस. उठा, परीस घेऊन आपल्या घरीं जा. माझ्या घरीं मरूं नका. माझें घर मुलांबाळांनीं भरलेलें आहे. आपल्या घरीं जा, आणखी खुशाल मरा. नाहीं तर जगा. (दोघें उठून बसतात.)

परशुराम–आण, आण. माझी प्रत्यक्ष मातोश्री आहेस! तुला आमची दया आली. जन्मभर उपकार विसणार नाहीं. देवानें तुला चांगली बुद्धि दिली. (बायकोस उद्देशून) अगे, चल आपल्या घरीं. तुझी मैत्रीण फार चांगली. असेंच करीत जा हो.

कमळजा- विनाकारण तूं इतका वेळ आमचा दोघांचा प्राण खाल्लास बरें का? हाच जर पहिल्यानें दिला असतास, तर किती चांगलें झालें असतें. आतां आह्मीं खास मरतों असें जेव्हां पाहिलेंस, तेव्हां कबूल झालीस, आणखी आमचा परीस आह्मांला दिलास. (नवऱ्यास उद्देशून) बरेंच कांगाव केलेंत. इतकें कांगाव केलेंत म्हणून परीस मिळाला. पण तुम्ही भुईला अंग टाकलें, तेव्हां माझी धारण पांचावर बसली. बरें, झालें तें झालें.

राजाई- तुम्ही मेलांत— अगदीं तुह्मांला कांबळ्यावर काढलें होतें बरें का? पण देवाला तुमची दया आली. जा आतां घरीं जा.

परशुराम- (सोडून पहातो. आंत कवडी आहे असें पाहून) परीस म्हणून आमच्या हातीं कवडी देतेस होय? (राजाई मोठ्यानें हंसते.) आणखी दांत काढतेस? दांत पाडून टाकीन. चल नदीवर तुझ्या नवऱ्याकडे. दोघांच्या नरडीचा घोट घेतों.

कमळजा- काय कवटाळीण आहे! परीस म्हणून आह्मांला कवडी देते अं! चल आतां नदीवर तुझ्या नवऱ्याकडे (तिला दोघे धरतात.)

राजाई- सोडा मला. तुम्ही खरोखर मेलां होता, मग आतां का समंध झालांत कीं काय? तुम्हांला दहींभात, नारळ काय पाहिजे तें देतें. (राजाईला ओढीत नेतात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—चंद्रभागेचा डोह.

(नामदेव ध्यानस्थ बसले आहेत. मुखानें विठलनामाचा उच्चार चालला आहे. परशुराम, कमळजा व राजाई प्रवेश करतात.)

परशुराम- कसा ध्यान लावून बसला आहे? बगळा जसा नदीच्या कडेला ध्यानस्थ बसतो; पण मासा आला कीं गट्ट.

नाहीं तर उंदराच्या बिळाजवळ बोका जसा डोळे मिटून बसतो, तसें याचें हें बकध्यान आहे. मैंद-लोकांचे गळे कापणारा! गळ्यांत तुळशीच्या माळा घालतो, मुद्रा लावतो आणखी ब्राह्मणाच्या परिसाचा अभिलाष करतो. तुझ्यासारखा अधम, पापी या जगांत तरी असेल काय?

कमळजा- मेल्यानें ध्यान कसें लावलें आहे! कोणी ह्मणेल खराच साधु. करणी पाहिली तर रामोशाची! फांसेपारधी मेला! आतां याच्या ध्यानाचें विसर्जन होणार केव्हां? आपला परीस आपल्याला मिळणार केव्हां?

राजाई- तुह्मी त्यांना शिव्या देऊं नका. ते कांहीं तुमच्या परिसाचा अभिलाष करणार नाहींत. थांबा. त्यांना मी जागे करतें. अहो, ऐकलेंत का, तो परीस तुम्ही कोठं ठेविला आहे? हीं नवराबायको आपला परीस मागावयास आलीं आहेत. (नामदेवास जागे करते.)

परशुराम- आतां का झोंपेचें सोंग घेतलें आहेस वाटतें? अशानें तुला परीस जिरेल होय? तूं खातरी ठेव, तुला परीस म्हणून जिरूं देणारच नाहीं. काय होणार असेल तें होवो. तुझा जीव घेईन, पण परीस घेतल्याशिवाय रहाणार नाहीं. कशाची आपल्या बोडक्याची समाधि लावतोस होय? तुझें साधूपणाचें ढोंग आतां साऱ्या जगांत फोडतों. सगळ्या रस्त्यानें शंख करतों, माझा परीस नामदेवानें चोरला म्हणून. नाहीं तर मुकाट्यानें माझा मला दे (नामदेवाची ओढाताण करितात. परंतु तो जागा होत नाहीं.) कसें बहुरूप्यानें संन्यासाचें सोंग आणिलें आहे. जारिणी स्त्रीचें जसें जारावर प्रेम, परंतु घरची नांदणूक जपून नवऱ्याच्या डोळ्यांत धूळ टाकण्याकरितां करते, तशी तुझी दांभिक भक्ति लौकिकांत आतां दिसून आली.

कमळजा-यांना जागे करायला आतां एक युक्ति आहे. तेवढी करून पहावी. त्या युक्तीनें हे खातरीनें जागे होतील. यांची

तर ब्रह्मानंदीं टाळी लागली आहे. यांना देहाची शुद्धि नाहीं. पण मी ह्मणतें, एक करावा गळफांस आणखी आपण दोघांनीं दोन बाजूंला धरून ओढावा.

राजाई- मोठी शहाणी ! मी जिवंत असतां मी आपले नवऱ्याचे गळ्यास तुम्हांला फांस लावूं देईन होय ! तुमचा प्राण घेईन अगोदर (परशुराम व कमळजा ऊर बडवून घेतात. परीस परीस ह्मणून मोठ्यानें आक्रोश करितात. राजाई नामदेवांस उद्देशून बोलते.) तुह्माला पांडुरंगाची शपथ आहे. तुह्मी एकदां जागे होऊन या अधिऱ्यांचा परीस यांना देऊन टाका. कोठें आहे मेला तो परीस ? पहारा तरी आणल्यात का ?

नामदेव–समुद्रास्तृप्यंतु ! केव्हांच चंद्रभागेच्या डोहांत टाकून दिला. ज्याच्या संगतीनें परमार्थाचा नाश होतो तो आपल्याला कशाला पाहिजे ? ज्याच्या योगानें आपलें मन पांडुरंगीं जडेल असें साधन करीत जावें. बाबा, हा संसार नाशिवंत आहे. एक विठोबाचें नाम खरें आहे.

परशुराम–मला तुझा वेदांत नको आहे. तो तुझा तुला लखलाभ असो. माझा परीस मला आणून दे. नाहीं तर तुझीं शंभर वर्षे भरलीं ह्मणून समज. हा धोंडा तुझ्या टाळक्यांत घालून तुझा प्राण घेईन. कशाला पांडुरंगाचें नाम घेत आहेस. (डोक्यांत धोंडा घालण्याकरितां उचलतो.)

अभंग.

नामदेव—
मान तोडावया कर ते शस्त्राचे ॥ कठिण बहुतांचे उभारिले ॥ तरी नवदें नवदें जाण ॥ आन कांहीं या विठोबावांचून ॥१॥ विठोबा परतें दैवत आहे ह्मणती ॥ ऐसें श्रुति स्मृति जरी बोलती ॥ तरी ते अपशब्द कानीं पडो नेदावे ॥ पाषांडी ह्मणती तरी उगेंचि असावें ॥ ॥ २ ॥ ब्रह्मदेवेसी झालिया भेटी ॥ तोही जरी वदेल

ऐशी गोष्टी ॥ या विठोबापरतें दैवत आहे ह्मणेल सृष्टीं ॥ चळला पोटीं निभ्रांत जाणा ॥३॥ कोटि कोटी ब्रह्मांडें एक एका रोमीं ॥ व्यापूनी व्योमीं वर्ततसे ॥ तो हा माझा विठोबा सर्वांघटीं सम ॥ न संडावें वर्म नामा ह्मणे ॥ ४ ॥

मायापाशांत गुंतून गेला आहेस. हा परीस तुझ्या उपयोगी येणार नाहीं. तो जागचे जागीं राहील. त्यापासून उत्पन्न केलेलें सोनें जागचे जागीं राहील. विलासाचे केलेले पदार्थ गाद्या, गिरद्या आणखी उशा जागच्या जागीं राहून शेवटीं गोंवऱ्या कामाला येतील. तुझें प्रारब्ध तुझ्या आड येत आहे त्याला तूं काय करणार आहेस ? माझा उपदेश तुला गोड लागणार नाहीं. बरोबरच आहे. डुकराला आंब्याचा रस खायला घातला किंवा कोड्याला चंदनाचें उटणें लावलें, तर त्यांचा कांहीं उपयोग होणार आहे काय ?

परशुराम– मी डुकर आणखी तूं कोण ? हा धोंडा तुझ्या टाळक्यांत घालून मोक्ष करतों तुझा.

नामदेव– असे शंभर धोंडे माझ्या डोक्यांत घातलेस तरी काय होणार आहे ? काळाविषयीं म्हणशील तर आह्मीं नामधारक काळाच्या बापाला भिणार नाहीं. त्याच्या टाळक्यांत सोटे मारूं.

अभंग.

नामाचेनि बळें न भीये सर्वथा ॥ कळिकाळाचे माथां सोटे मारूं ॥ १ ॥ वैकुंठींचा देव आणूं या कीर्तनीं ॥ विठ्ठल गाऊनि नाचूं रंगीं ॥ २ ॥ सुखाचा सोहळा नित्यता दिवाळी ॥ प्रेमें वनमाळीं जीव धरूं ॥ ३ ॥ नामा ह्मणे ऐसा भक्तिमार्ग धरा ॥ सदा मुक्तिद्वारां वोळंगती ॥ ४ ॥

आह्मीं विठोबाचे दूत ॥ यमा आणूं शरणागत ॥ १ ॥ मुखीं नाम हातीं टाळी ॥ महापापा करूं होळी ॥ २ ॥

करूं हरीनामाचा घोष ॥ कुंभपाक पाडूं वोस ॥ ३ ॥
करूं हरीकथाकीर्तन ॥ तोडूं यमाचें बंधन ॥ ४ ॥
एवढा प्रताप नामाचा ॥ रिघ नोहे कळीकाळाचा ॥ ५ ॥
ऐसा नामा यशवंत ॥ विठोबाचा शरणागत ॥ ६ ॥

तुझा परीस मीं खरोखरच चंद्रभागेच्या डोहांत टाकिला. पाहिजे असल्यास डोहांत उडी घालून बघ.

परशुराम– आपल्याला विरक्त ह्मणवितोस, आणखी माझ्या परिसाचा अभिलाष करतोस. तूं आणखी तुझा देव दोघेही मैंद आहांत. गरीब ब्राम्हणाचें घर बुडविलेंस. तूं माझ्या परिसाचा खास खास अभिलाष केला आहेस. संतांना ही गोष्ट मानवणार नाहीं. ते तुझा उपहास करतील. मला डोहांत उडी घाल म्हणून सांगतोस, यांत तुझें कपट दिसून येतं. मीं ठार व्हावें म्हणजे परिसाची कांहीं भानगड राहिली नाहीं. हा तुझा मतलब मीं जाणिला. डोहांत उडी घालून हाताला काय येणार ? वाळूचे खडे ? परीस आणखी ते सारखेच. माझा परीस मला कसा ओळखितां येणार ? ज्या अर्थी माझा परीस तूं डोहांत टाकिला आहेस, त्याअर्थी आतां डोहांत उडी घालून तूंच तो काढून दे.

नामदेव– मला वाटलें तुह्मी विरक्त आहां, असें समजून मीं डोहांत परीस टाकून दिला. एकून तुह्मी आपल्यास बाह्यात्कारीच फक्त उदास ह्मणवितां ? चला डोहाकडे तुमचा परीस तुह्माला देतों. (डोहांत प्रवेश करतो. ओंजळभर खडे काढतो) ओंजळ भरून परीस आणिले आहेत. तुमचा परीस कोणता हें पाहून यांतला ओळखून घ्या.

परशुराम– एक ओंजळभर खडे घेऊन आला आहे माझ्या पुढें. गाढवा, तुला शरम नाहीं वाटत ?

नामदेव– प्रचीत बघ. निदान तुझ्या जानव्याला किल्ली असेल, ती यांतील वाटेल त्या खड्याला घासून बघ. सोनें

झालें नाहीं तर ह्मणशील तें ऐकेन. (परशुराम त्याप्रमाणें करतो. किल्ली सोन्याची होते.)

परशुराम– (एकीकडे) अहाहा ! हा प्रत्यक्ष पांडुरंगस्वरूपी आहे. व्यर्थ व्यर्थ मीं याचा छळ केला. आतां याला अनन्यभावानें शरण जातों. धिक्कार असो मला.

राजाई– ह्मटलें, आतां अनायासें योग आला आहे. इतके परीस आपल्याजवळ आहेत. एक आपल्याकरितां ठेवा, आणखी एक माझ्या बापाच्या घरीं आणखी एक माझ्या मावशीच्या घरीं यावयाला द्या. एवढा तरी माझा शब्द मोडूं नका. मी तुमची कोणी तरी असेन. याच माझ्या एवढ्या शब्दाला मान.

नामदेव– (हंसतो.) काय वेडी आहेस ! हें सर्व वाळवंट परिसाचें आहे. चंद्रभागेंतील प्रत्येक खडा परीस आहे. हें सर्व वाळवंट आपलें आहे. तूं तर माझी अर्धांगी ! तुला कांहीं कमी आहे काय ?

कमळजा–ह्मटलें, राजाई, मी कांहीं तरी मूर्खपणानें आणखी रागानें तुझ्याशीं बोललें असेन, तें मनांत ठेऊं नको. महाराजांनीं सर्व वाळवंट तुझ्याकरितां परीसमय केलें आहे ! आह्मी उभयतां रात्रंदिवस आतां तुमची सेवा करूं, ह्मणजे आह्मांस तुमच्या प्रसादानें एकादें मूलबाळ होईल. तुह्मी आह्मांला सद्गुरूच्या ठिकाणीं आहां. पांडुरंग पंढरपुरचे राजे, आणखी तुह्मी चंद्रभागेच्या वाळवंटीचे राजे.

राजाई– फक्त अन्नवस्त्र नाहीं. बाकी आह्मी राजेच आहों. दुसरें काय ? चल आतां घरीं. तांदूळ घाल एक पायलीभर उसने. (कमळजेचा हात धरून तिला घेऊन जाते.)

परशुराम– महाराज, आपल्यासारखा भक्त भूमंडळांत नाहीं. अगोदर नाम मग देव ह्मणून आपल्यास नामदेव ह्मणतात. रुखमाई मातेपासून मीं एक परीस घेतला, त्याच्याकरितां प्राण देत होतों. आपला महिमा मीं पामरानें जाणला नाहीं. आपला

हात लागल्याबरोबर चंद्रभागेचें सर्व वाळवंट परीस झालें. आपले चरण जेथें लागतात, तेथें सर्व ऐश्वर्य प्राप्त होतें. आतां मला परीस नको. आपण स्वयंभू परीसच आहां. या दासाचे मस्तकावर आपला वरदहस्त ठेवावा, एवढीच इच्छा आहे. मी आपल्यास शरण आहें महाराज. (नामदेव त्याच्या मस्तकावर हात ठेवतो. परशुराम भागवत हात जोडून स्तुति करितो.)

आरती.

जन्मतां पांडुरंगें ॥ जिव्हेवरी लिहिलें ॥ शतकोटी अभंग ॥ प्रमाण कवित्व रचिलें ॥ १ ॥ जयजयजी भक्तराया ॥ जिवलगा नामया ॥ आरती ओवाळितां ॥ चित्त पालटें काया ॥ ध्रु० ॥ घ्यावया भक्तिसुख ॥ पांडुरंगें अवतार ॥ धरूनियां तीर्थ मिषें ॥ केला जगाचा उद्धार ॥ २ ॥ जय० ॥ प्रत्यक्ष प्रचीती हे ॥ वाळंवट परीस केली ॥ हारपली विषमता ॥ द्वैतबुद्धि निरसली ॥ ३ ॥ जय० ॥ समाधि महाद्वारीं ॥ श्रीविठ्ठलचरणीं ॥ आरती ओंवाळितों ॥ परिसा करजोडूनि ॥ ४ ॥ जयजय० ॥

प्रवेश चवथा.

स्थळ– नामदेवाच्या घरापुढचें पटांगण.

(नामदेव प्रवेश करतो.)

नामदेव–वाल्मिकानें शतकोटी रामायण केलें, हें ऐकून मला फार वाईट वाटलें. मला वाटलें मीं आपलें आयुष्य व्यर्थ गमावलें. पांडुरंगाला मीं ह्मटलें, देवा, तुझा मी दास असेन तर शंभर कोट अभंग करीन. नाहीं तर जीभ छाटून टाकीन. देव ह्मणाले, नामदेवा, कृतयुगीं लाख लाख वर्षें आयुष्य होतें. आतां शंभर वर्षें आयुष्य

आहे. तुझें बरेंच आयुष्य गेलें आहे. मी ह्मणालों, माझा पण सिद्धीस नेण्याचें काम आपलें आहे. देव ह्मणाले, बरें. एवढ्या तुझ्या मागण्यानें तरी मी अंशतः तुझा उतराई होईन. असें म्हणून त्यांनीं सरस्वती देवीस आज्ञा केली कीं, माझे जिव्हाग्रीं बसावें. आपण स्वतः वह्या बांधून मीं केलेले अभंग लिहूं लागले. चौपन कोटी एकुणहत्तर लक्ष अभंग मीं स्वतः केले. बाकीचे माझ्या आईबापांनीं, मुलांनीं, सुनांनीं, जनाबाईनें, प्रत्यक्ष पांडुरंगानें व रुक्मिणीमातेनें केले. इतकें जरी झालें तरी पांच कोटी एकावन लक्ष अभंग करावयाचे बाकी राहिले आहेत. ते पांडुरंग मजकडून अवतार घेऊन करवून घेईल. आतां या देहाचा मला कंटाळा आला आहे. आज आषाढ वद्य त्रयोदशी आहे. आज समाधीचा योग घडून यावा ह्मणून मीं देवाजवळ विनंति केली आहे. अभंगांचा हेतु शेवटास गेला. ज्ञानेश्वराच्या संगतीनें यात्रेचें निमित्त करून जगाचा उद्धार केला. जगाला भक्तिमार्गाला लावलें. महाद्वारीं समाधि घेण्याचें कारण, तेथें संतांचे चरणरज लागतील. संतांचे चरणरज लागले ह्मणजे ब्रह्मसुखांत निमग्न होईन. देव मला म्हणतात, चार दिवस दम काढ. मी तुला वैकुंठीं घेऊन जातों. मला वैकुंठ नको. पंढरी भुवैकुंठ आहे. मी येथेंच राहतों. वैकुंठीं जाऊन उगेचच बसायचें कीं नाहीं ? त्या जुन्या झोंपडींत जातो कोण ? (पडदा वर जातो. पांडुरंगाच्या देवालयाचा देखावा दिसतो. दिंडींतील लोक प्रवेश करतात. विठ्ठलनामाचा गजर करतात. दामाशेट, गोणाई, राजाई, जनाबाई प्रवेश करतात.)

दामाशेट– नामदेवा, आमच्या अगोदर तूंच कसा समाधि घेणार ? अगोदर आमची व्यवस्था कर. नंतर समाधि घे. तुझ्याशिवाय आह्मांला या जगांत आधार नाहीं. तुझ्या कुटुंबांत चौदा माणसें खावयाचीं ! तूं गेल्यावर अन्नासाठीं त्यांनीं दाही दिशा भीक का मागावी ?

गोणाई–(गहिंवर येऊन) अगोदर आईबापांनीं मरावें. पुत्रानें मागें रहावें. असें असून तूंच आमच्या अगोदर जातोस ! हें तुला योग्य नाहीं. आम्ही दीडदीडशें वर्षांचीं म्हातारीं पिकलीं पानें झालों आहोंत. आमची तुला कांहींच का दया नाहीं ! इतका कंटक कशानें झालास ? (देवाकडे पाहून) देव मेला निर्दय, दुष्ट ! त्यानें एवढे माझे डोळे अगोदर मिटले असते, म्हणजे सो-न्याहून पिंवळें झालें असतें. आपण विटेवर उभा राहून खुशाल हंसतो आहे ! आम्हीं धाय धाय रडतों आहों. ध्रुवबालक तुझा बाप होता का ? त्याचा बरा उद्धार केलास ? अहिल्या तुझी आई होती का ? तिचा बरा उद्धार केलास ? द्रौपदीचे जोडे काखेंत घेऊन भीष्माचे दारांत उभा राहिलास. ती तुझी अगदीं सख्खी बहीण म्हणून तिला तारलेंस होय ? आणखी आम्हांला मारतोस ?

राजाई–(सासूस उद्देशून) अहो, तुम्ही म्हातारे झाला आहां. उर्या निघून जाल. पण माझीं मुलेंबाळें अजून नवींतरणीं आहेतना ? त्यांना कांहीं यांनीं जोडून ठेविलें आहे का ? सांगा. का आतां चारचौघांत पदराला धरूं ? बाकी धरायला काय भीति आली ! नाहीं, पण या वेळीं जर गोडीनें घेतलें, तरच काम होईल. आजपर्यंत शेंकडों वेळां भांडलें. पण आतां समाधि घेतल्यावर कोणाशीं भांडूं ? (देवास उद्देशून) देवा, तूं तर माझ्याशीं कधीं गोडीनें बोलला नाहींस. आतां अखेर तरी मजवर दया कर. राग येऊं देऊं नको माझ्या बोलण्याचा. पण पांडव तुझे बाप होते म्हणून त्यांचे घोडे धुतलेस. त्यांचा उद्धार केलास. तूं निला-जरा चोरटा शिंदळ मला ठाऊक आहेस. तूं माझा उद्धार कर-शील म्हणून मीं व्यर्थ व्यर्थ तुझी आशा केली. जों जों मी तुला शिव्या देतें तों तों तूं हंसतोस. अरे निर्दया, ही वेळ हंसण्याची आहे कारे ? (नामदेवास उद्देशून) म्हटलें, गरिबीच्या संबंधानें मी आपल्यास वाईट वाईट बोललें, त्याचा आपल्याला राग येऊन मला टाकून आपण जात आहां. आपल्या हातानें माझी

अगोदर व्यवस्था लावा. मग जा. मला आपल्यावांचून दुसरी गति नाहीं.

जनाबाई– (गहिंवरून नामदेवास उद्देशून) मीं जन्मापासून आपल्या घरीं आपल्या चरणांची सेवा केली. अखेर मला अनाथाला आपण असे सोडून जातां ! हें पाहून माझें हृदय फुटतें आहे. आपण माझे आईबाप. मी आपलें लेंकरूं आहें. माझा त्याग करूं नका.

नामदेव– पांडुरंगा, आतां या संकटाला काय करूं ! (देवाजवळ जाऊन) देवा, हे आईबाप जीव सोडतील. ही बायको माझें कांहीं ऐकणार नाहीं. यांना ब्रम्हज्ञान सांगून पालथ्या घागरीवर पाणी. यांची आपण वाटेल तशी व्यवस्था करा. हीं मुलेंबाळें हा सर्व परिवार तुमचाच आहे. याची व्यवस्था तुम्हीच करा. ही जनाबाई तुमची फारच प्रेमळभक्त ! इच्याविषयीं पांडुरंगा, तुह्मांला मी अधिक काय सांगूं ? (ऐकलेंसें करून) थांबा भिऊं नका. देव ह्मणतात, तुह्मां सर्वांला नामदेवाच्या सन्निध समाधीस बसवितों. फार उत्तम झालें ! पांडुरंगानें विश्वकर्म्याकडून महाद्वाराच्या पायरीखालीं आपल्या सर्वांकरितां उत्तम आसनें करून ठेविलीं आहेत. तेथें अखंड प्रकाश असावा म्हणून पांच रत्नदीप लावले आहेत. आपण केलेल्या अभंगांच्या वह्या ठेविल्या आहेत. (पुढें येतो.)

अभंग.

वतन आमुचे मिरास पंढरी ॥ विठोबाचें घरीं नांदणूक ॥ १ ॥ सेवा करूं तेथें नित्य महाद्वारा ॥ नामाचे उजरी जागवून ॥ २ ॥ साधूसंता शरण जाऊं जिवें भावें ॥ प्रसाद स्वभावे देती घेती ॥ ३ ॥ नामा ह्मणे आह्मी पायरीचे चिरे ॥ संत पाय हिरे वरी देतां ॥ ४ ॥

(विठोबाच्या सन्निध जातो.) पांडुरंगा, मुलगी सासरीं जायला निघाली ह्मणजे बापाचे डोळे जसे पाण्यानें भरून येतात,

तसे तुमचे डोळे पाण्यानें भरून आले आहेत! काल तुह्मी कंठ सद्गदित होऊन मला ह्मणालांत, "माझ्या नामदेवा, आज तूं समाधिस्थ होणार! अर्थात यापुढें आह्माला तुझ्या सगुणरूपाचें दर्शन अंतरणार!" पण देवा देहासंबंधानें मी गेलों म्हणजे मी स्वरूपासंबंधानें गेलों नाहींना? मातीच्या घटाचा नाश केला ह्मणून त्यांत प्रतिबिंब पडलेल्या आकाशाचा नाश तर होत नाहींना? तुह्मी म्हणालांत, "नामदेवा, आपलें मुख पाहून जो आपल्यास आनंद व्हावयाचा तो आरशावांचून होत नाहीं. तूं माझा आरसा आहेस. तूं नाहींसा झाल्यावर मला माझ्या सगुणरूपाच्या दर्शनाचें सुख घेण्याचा मार्गच नाहींसा झाला."! देवा, आतां मीं बालकानें यावर काय बोलावें तें सुचत नाहीं. पांडुरंगा, थट्टेनें, खेळतां खेळतां, एका ताटांत भोजन करीत असतां, एकांतीं किंवा लोकांतीं मी जें तुह्माला वाईट बोललों, तुम्हांला अयोग्य अशीं कामें तुमच्याकडून करून घेतलीं, आईबापांनीं, बायकोनें माझ्याकरितां तुह्मांला जीं जीं दूषणें दिलीं, त्या सर्वांची मी क्षमा मागतों. कांहीं एक मनांत ठेवूं नका. मजवर कृपा करा. देवा, आजपर्यंत तुह्माजवळ कांहीं मागितलें नाहीं, पण आतां अखेर इतकेंच मागतों कीं–

अभंग.

आकल्प आयुष्य व्हावें तयाकुळां ॥ माझिया सकळा हरिच्या दासां ॥ १ ॥ कल्पनेची बाधा नहो कदाकाळीं ॥ हीं संतमंडळीं सुखी असो ॥ २ ॥ अहंकाराचा वारा न लागो राजसा ॥ माझ्या विष्णुदासां भाविकांसी ॥ ३ ॥ नामा ह्मणे तया असावें कल्याण ॥ ज्यामुखीं निधान पांडुरंग ॥ ४ ॥

सुजनहो, पंढरी अठ्ठावीस युगांच्या पूर्वींची आहे. आधीं पंढरपुरी, मग वैकुंठनगरी. जेव्हां चराचर नव्हतें, तेव्हां पंढरपूर होतें. ब्रह्मांडगोलाचा नाश झाला, तरी पंढरपूर उरणार आहे. कारण तें सुदर्शनावर आहे. पंढरी कामधेनू आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष येथें साध्य होतात. येथें आलांत तर देव तुह्मांला चतुर्भुज करील.

तुमच्या कोटिकुळांचा उद्धार होईल. आषाढीकार्तिकी चुकूं नका. त्रिभुवनींचीं तीर्थें मलीन होऊन येथें पावन होण्याकरितां आलीं आहेत. चंद्रभागेला लाजून मंदाकिनी स्वर्गांत गेली. भोगावती पाताळीं गेली. भागीरथीचे हजार विभाग झाले. त्रिभुवनांत असें तीर्थ दाखवा कीं, जेथें हरिकथेचा असा समारंभ आहे. आह्मां दीनांचें हें माहेरघर आहे. माझा विठ्ठल दीनांची माउली आहे. धन्य धन्य पंढरीक्षेत्र! नामघोषानें रात्रंदिवस दुमदुमून गेलें आहे. येथें नित्य दिवाळी आहे. येथें कृमिकीटक होऊन येतात त्यांचा आषाढी कार्तिकीला येणाऱ्या वारकऱ्यांचे चरणरज अंगाला लागून उद्धार होतो.

अभंग.

अवघाची संसार सुखाचा करीन ॥ आनंदें भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥ जाईन गे माये तया पंढरपुरा ॥ भेटेन माहेरा आपुलिया ॥ ध्रु० ॥ सर्व सुकृताचें फळ मी लाहीन ॥ क्षेम मी देईन परब्रह्मीं ॥ २ ॥ बापरखुमा देविवरा विठ्ठलाची भेटी ॥ आपुलिया संवसाटीं घेऊनि राहे ॥ ३ ॥

जन्मजन्मांतरीं पुण्यसामुग्री असेल तरच विठ्ठलनाम मुखांत येईल. विठ्ठलनामापुढें मुक्तीची किंमत नाहीं, तिला फुकट कोणी विचारीत नाहीं. दीनरूपानें भिकाऱ्याप्रमाणें वाळवंट हिंडत आहे. विठ्ठलनामापुढें ऋद्धिसिद्धि काकुलती येत आहेत. आह्मांला गतीला लावा ह्मणतात. विठ्ठलनामाच्या जोरावर मोक्षाला तुह्मी लाथा मारा. हा मायेचा गुंडाळा तुमच्यानें उकलणार नाहीं. मोहाचें बिरडें सुटणार नाहीं. सुंदर स्त्रीचा समागम, एकांतांतील तिचीं मनोहर भाषणें, बोबडें बोबडें कोमल भाषण करणारीं मुलें, संपत्तीनें भरलेलीं घरें तुह्मांला सोडवणार नाहींत, ह्मणून संसारांत असून तुम्ही वेडे वांकडे अबद्ध, येईल तसें, तालसुराची काळजी न घेतां विठ्ठलाचें नाम घ्या, नामाचा टाहो फोडा, विठ्ठलनामाच्या छंदानें नाचा, म्हणजे तुम्ही विठ्ठलच व्हाल. सर्व मंत्रांचें बीज विठ्ठलनाम आहे. तुमच्यानें व्रतें, तपें, दानें करवणार नाहींत, तीर्थाटण, पुराणश्रवण

होणार नाहीं, एकनिष्ठपणें देवपूजा होणार नाहीं, म्हणून तुम्ही नेहमीं विठ्ठल, विठ्ठल हा सोपा मंत्र जपा, म्हणजे तुम्ही विजयश्रीचीं निशाणें फडकवीत वैकुंठाला जाल. भवसिंधु पायवाट कराल. यम तुम्हांला शरण येईल. महापापाची होळी कराल. कुंभपाक ओस पाडाल. अशी मला पांडुरंगानें भाक दिली आहे. सुजनहो, मी तुमचें सर्वांचें लेकरूं आहें. जसे आई लहान मुलाचे अपराध पोटांत घालते तसे तुह्मी माझे अपराध पोटांत घाला. येतों मी आतां. शेवटीं इतकेंच सांगतों.

अभंग.

देह जावो अथवा राहो ॥ पांडुरंगीं दृढ भावो ॥ १ ॥
चरण न सोडीं सर्वथा ॥ तुझी आण पंढरीनाथा ॥ २ ॥
वदनीं तुझें मंगल नाम ॥ अखंड सदोदित प्रेम ॥ ३ ॥
जैसा जैसा असेल भोग ॥ तैसा तैसा घडेल योग ॥ ४ ॥
नामा ह्मणे केशवराजा ॥ केला नेम चालवी माझा ॥५॥

यारे नाचूं प्रेमा प्रेमानंदें ॥ विठ्ठलनामाचेनि छंदें ॥ १ ॥
जाऊं ह्मणतां पंढरी ॥ यम त्याची सेवा करी ॥ २ ॥
धरितां पंढरीची वाट ॥ कळिकाळा भय वाटे ॥ ३ ॥
चंद्रभागे करितां स्नान ॥ यमलोकीं पडली हान ॥ ४ ॥
झाली पुंडलीकाची भेटी ॥ पूर्वजां आनंद वैकुंठीं ॥ ५ ॥
राऊळासी जातां ॥ झाली जीवाची मुक्तता ॥ ६ ॥
विष्णुदास नामा ह्मणे ॥ आतां नाहीं येणें जाणें ॥ ७ ॥

(दिव्य प्रकाश पडतो. सुरगण विमानांतून पुष्पवृष्टि करतात. विठ्ठलनामाचा गजर होतो. जनाबाई, गोणाई, दामाशेट, राजाई व अखेर नामदेव, वगैरे सर्व समाधीच्या स्थळीं प्रवेश करतात. पडदा पडतो.)

समाप्त.